नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

### एआयच्या विमानाचे थायलंडमध्ये आपत्कालीन लँडिंग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
थायलंडमधील फुकेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर इंडियाच्या विमान अक्र379 चे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात बॉम्ब असल्याची माहिती मिळाली होती. विमानात 156 लोक होते. हे विमान फुकेतहून दिल्लीला येत होते.

एअर इंडियाच्या विमानाने भारतीय वेळेनुसार सकाळी 9.30 वाजता (स्थानिक वेळेनुसार दुपारी 2.30 वाजता) फुकेत विमानतळावरून उड्डाण केले. विमान अंदमान समुद्रावर एक मोठे वर्तुळ करत फिरले आणि नंतर फुकेतमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. बॉम्बची धमकी मिळताच, फुकेत विमानतळाने विमानतळ आकस्मिकता योजना सक्रिय केली. धोक्याबाबत सर्व आवश्यक पावले उचलण्यात आली आहेत.

* वर्ष ५५ * अंक ७६ * * नागपूर * शनिवार, दिनांक १४ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रग्रलेख

## खरीखरी...

## कडूपणा घालवा, गोडवा वाढवा

बच्चू कडू या नावाचे कोडे केवळ बच्चू कडूच सोडवू शकतात. सर्वसामान्य जनतेसाठी सदैव उभ्या असलेल्या बच्चू कडू यांनी गेल्या सहा दिवसांपासून उपोषण सुरू केलेले आहे. कडू यांची स्वतःची कोणतीही मागणी नाही. हे आम्ही मुद्दाम नमूद करत आहोत. त्यांचे मागणे एकच आहे, सरकारने निवडून यापूर्वी जीजी आश्वासने दिली होती. ती आता पूर्ण करावीत. हे सरकार सत्तेत येण्यापूर्वी त्यांनी जी काही आश्वासने दिली होती. त्याच वेळी काँग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची तीन लाखांची किंवा तीन लाखापर्यंतची कर्जे माफ करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. त्याला तोड म्हणून आपण सर्व शेतकऱ्यांचा संपूर्ण 7-12 कोरा करू. असे आश्वासन महायुतीने दिले होते. मग त्यानंतर आम्ही महायुतीपेक्षा लाडक्या बहिणींना आणि त्यासोबतच इतर योजनांना जास्त निधी देऊ. असे महाविकास आघाडीने म्हटल्याबरोबर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी आपण निवडून आल्यावर दरमहा 2100 रुपये देऊ असे आश्वासन लाडक्या बहिणींना दिलेले होते. याशिवाय शेतक?यांना मोफत वीज, रात्रीच्या वेळी वीज, आणि इतर अनेक सोयी सवलती देण्याचे त्यावेळी बोलण्यात आले होते. तसा जाहीरनामाही प्रसारित करण्यात आला होता. मग तेव्हा म्हणजेच निवडणुकीपूर्वी जी आश्वासने दिली ती पूर्ण करा. असा साधा मागणीचा एक कलमी कार्यक्रम घेऊन बच्चू कडू यांनी उपोषण सुरू केलेले आहे. इकडे सध्याच्या परिस्थितीमध्ये आर्थिक दृष्ट्या पोकळपणा असल्याने, दिलेली आश्वासने पाळली जाण्याची शक्यता कमी झालेली आहे. उद्या लाडक्या बहिणींची धर्माची आणि दरमहाची ओवाळणी देता-देताच सरकारच्या नाकीनऊ आलेले आहेत. प्रत्येक गोष्टींचा इव्हेंट करणे. त्यासाठी नवनवीन घोषणा करणे हे सर्व खेळ आता जनतेला चांगलेच ठाऊक झालेले आहेत. त्यामुळे सरकारने जीजी आश्वासने दिली. ती पूर्ण करण्यासाठी बच्चू कडून यांनी सुरु केलेले उपोषण सरकारला खूपच महागात पडू शकते. एका सत्ताधाऱ्यांच्या छत्रछायेतील अति शहाण्याने बच्चू कडू यांच्या या उपोषणावर टीका केलेली आहे. निवडणूक हरल्यामुळे आणि जनतेत त्यांचे वजन शिल्लक नसल्यामुळे त्यांचे उपोषण आहे, असे ते म्हणतात. त्यात त्यांनी गुवाहाटीला जाण्याच्या आणि खोक्याचाही उल्लेख केलेला आहे. बच्चू कडू यांना जे जे ओळखतात. त्यांना अशा मूर्खपणाच्या आरोपांवर चर्चाही करावीशी वाटत नाही. आता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कर्मभूमी येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सर्व राज्यभरातून बडे बडे नेते दररोज येत आहेत. बच्चुभाऊ यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. त्यांचा मोलाचा जीव वाचवणे हे सरकारच्या हातात आहे. आमदार असताना हे बच्चू कडू भाऊही अचानक आत्ताच्या सरकारमध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांच्या स्वभाव आणि त्यांच्या निधार्राबाबत त्यांचा असलेला चिवटपणा सरकारमधील सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळेच आता अधिक ताण न देता बच्चुभाऊंचे उपोषण त्वरित थांबवण्यासाठी सरकारला म्हणजेच मुख्यमंत्र्यांना पुढाकार घ्यावा लागेल. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अतिशय मुत्सद्दी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेतले जाते. कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आणि तो प्रश्न अधिक न चिघळू देण्यासाठी, जे काही शक्य असते ते देवेंद्र फडणवीसच करतात. असे जनतेला वाटते तेव्हा आता त्यांनी आपली मुत्सद्देगिरी पणाला लावून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनीच ही आघाडी सांभाळावी. असे त्यांना यावेळी सुचवावेसे वाटते. दरवेळी फोन डिप्लोमसी कामाला येतेच असे नाही. त्यामुळेच हा विषय अत्यंत गंभीरतेने घेऊन मुख्यमंत्री आपल्या मुत्सद्देगिरीचा परिपाठ देतील आणि परिस्थिती गुंतागुंतीची होऊ नये. म्हणून यशस्वी शिष्टाई करतील. असा आम्हाला विश्वास वाटतो. बच्चुभाऊ यांनाही आमच्या खूप खूप शुभेच्छा आहेत. अत्यंत जिव्हाळ्याच्या म्हणजेच शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन असले. तरीही त्यांचा जीव लाखमोलाचा आहे. हे ही त्यांनी लक्षात घ्यावे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023




# २७० मृतदेह सापडले !

### ७ जणांची ओळख पटली : वसतिगृहाच्या छतावर सापडला ब्लॅक बॉक्स : डेटा सांगेल अपघाताचे कारण

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १३ :**
अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान एआय-१७१ अपघाताच्या २७ तासांनंतर, शुक्रवारी विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ने ब्लॅक बॉक्स जप्त केला. ते वसतिगृहाच्या छतावर सापडले. याद्वारे आपल्याला अपघातापूर्वीच्या शेवटच्या क्षणांमध्ये काय घडले हे कळू शकेल.

एअर इंडियाच्या विमानात १२ क्रू मेंबर्ससह २४२ लोक होते. यातून एका प्रवाशाचे प्राण वाचले. मृतांमध्ये राजस्थानमधील १३, मध्यप्रदेश, हरियाणा आणि बिहारमधील प्रत्येकी एका व्यक्तीचा समावेश आहे. दुसरीकडे, माजी मुख्यमंत्री रुपाणी यांच्या मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतांच्या नातेवाईकांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी केली जात आहे.

बचाव पथकाने २७० लोकांचे मृतदेह बाहेर काढले आहेत. त्यापैकी ७ जणांचे मृतदेह डीएनए चाचणीनंतर त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले आहेत. मृतांमध्ये २४१ जण विमानातील प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते. विमान कोसळलेल्या बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहातील ५ मृत आहेत. अपघाताच्या वेळी वसतिगृहात ५० हून अधिक लोक उपस्थित होते.

एमबीबीएसचे चार विद्यार्थी आणि एका डॉक्टरची पत्नी यांचा मृत्यू झाला, तर ४५ हून अधिक विद्यार्थ्यांना वसतिगृहातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. गुजरात आयएमएचे अध्यक्ष डॉ. मेहुल शाह यांनी ही माहिती दिली.

त्याच वेळी, विमान वाहतूक मंत्रालयाने सांगितले की, विमानाचा ब्लॅक बॉक्स इमारतीच्या छतावर सापडला आहे. अपघाताच्या तपासात एनआयएसह ७ एजन्सी सहभागी आहेत. माजी मुख्यमंत्री रुपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटताच राजकोटमध्ये त्यांचे अंत्यसंस्कार केले जातील. त्यांचा मुलगा उद्या अमेरिकेहून परत येईल.

तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी शुक्रवारी सकाळी अहमदाबादला पोहोचले. सर्वप्रथम त्यांनी घटनास्थळाला भेट दिली. यानंतर ते सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गेले, जिथे ते सुमारे १० मिनिटे पीडितांना भेटले.

एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान एआय-१७१ गुरुवारी दुपारी १:३८ वाजता अहमदाबादहून लंडनसाठी उड्डाण केले. विमानात एकूण २३० प्रवासी होते, ज्यात १६९ भारतीय, ५३ ब्रिटन, ७ पोर्तुगीज आणि एका कॅनेडियन नागरिकाचा समावेश होता. विमान अवघ्या दोन मिनिटांतच कोसळले. त्यापैकी १०३ पुरुष, ११४ महिला, ११ मुले आणि २ नवजात बालके होती. उर्वरित १२ जण क्रू मेंबर्स होते. मृतांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा समावेश होता, तर फक्त एकच प्रवासी बचावला.

■ विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या लोकांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचण्या केल्या जात आहेत.
■ एनएसजी टीम चौकशीसाठी विमान अपघातस्थळी पोहोचली आहे.
ढिगाऱ्याखाली दबलेल्या इतर वाचलेल्यांचा शोध घेण्यासाठी अहमदाबाद पोलिस स्निफर डॉगसह अपघातस्थळी पोहोचले आहेत.
■ मृतांच्या नातेवाईकांना मदत करण्यासाठी एअर इंडियाने अहमदाबाद, मुंबई, दिल्ली आणि गॅटविक विमानतळांवर मदत केंद्रे उघडली आहेत. भारतासाठी,१८०० ५६९१ ४४४ वर संपर्क साधू शकता आणि भारताबाहेरून, तुम्ही ८०६२७७९२०० वर संपर्क साधू शकता.

एअर इंडियाच्या सर्व बोईंग ड्रीमलायनर विमानांची तपासणी केली जाईल
डीजीसीएने शुक्रवारी एअर इंडियाच्या बोईंग ७८७ ड्रीमलायनर फ्लीटचे सेफ्टी ऑडिट करण्याचे आदेश दिले. १२ जून रोजी अहमदाबाद विमान अपघातात २४१ जणांचा मृत्यू झाल्यानंतर एका दिवसानंतर हा आदेश जारी करण्यात आला आहे. त्यात म्हटले आहे की, बोईंगच्या ७८७-८ आणि ७८७-९ विमानांची प्रत्येक उड्डाणपूर्वी तपासणी केली जाईल. सर्व अहवाल डीजीसीएला सादर केले जातील. डीजीसीएने एअर इंडियाला जेनएक्स इंजिन असलेल्या बोईंग ७८७-८ आणि ७८७-९ विमानांची अतिरिक्त देखभाल करण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश १५ जूनपासून लागू होईल. टाटा समूहाच्या एअर इंडियाच्या ताफ्यात २६ बोईंग ७८७-८ आणि ७ बोईंग ७८७-९ आहेत.

अपघाताचे कारण तांत्रिक बिघाड असल्याचा संशय
जयपूरचे सर्व्हिंग पायलट केसरी सिंह राठोड यांनी अहमदाबाद विमान अपघातावर सांगितले की, अपघातात सहभागी असलेले विमान बोईंग ७८७ ड्रीमलायनर होते, जे जुन्या ७४७ मॉडेलच्या जागी आणण्यात आले होते. पहिल्या दृष्टीक्षेपात, अपघाताचे कारण तांत्रिक बिघाड असल्याचे दिसते. कदाचित उत्पादन किंवा देखभालीची चूक असू शकते. ते म्हणाले, २०१३ मध्ये अमेरिकेनेही अशाच कारणांमुळे बोईंग विमाने ग्राउंड केली होती. त्यांचा असा विश्वास आहे की, ही मानवी चूक नव्हती, तर लँडिंग गियर न उघडणे, विद्युत बिघाड किंवा सिस्टम बिघाड असू शकते. राठोड यांनी टाटाकडून देखभाल प्रणालीची दुरुस्ती करण्याची मागणी केली.

### माजी मुख्यमंत्री रुपाणी यांना श्रद्धांजली
### राजकोटमधील ६५० शाळा उद्या बंद राहणार

गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राजकोट शहरातील खासगी शाळा व्यवस्थापन मंडळाने शनिवारी ६५० शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.
याशिवाय, राजकोट महानगरपालिकेच्या ९० शाळा देखील बंद राहतील. रुपाणी यांचे मूळ गाव



राजकोट आहे. त्यांचे वडील व्यवसायानिमित्त रंगूनला गेले होते. रुपाणी यांचा जन्म २ ऑगस्ट १९५६ रोजी म्यानमारची (तेव्हाची बर्मा) राजधानी रंगून येथे झाला. १९६० मध्ये वडील राजकोटला परतले. गुजरातमध्ये आल्यानंतर रुपाणी यांनी राजकोटमध्येच शिक्षण घेतले.
त्यांच्या मृतदेहाची ओळख अद्याप पटली नसल्याचे सांगण्यात येते.

## गॅस गळती २५ महिला बेशुद्ध

■ **मुंबई, दि. १३ :**
नवी मुंबईतील एका कंपनीमध्ये गुरुवारी सकाळी गॅस गळतीची घटना घडली आहे. कार्बन मोनॉक्साईडच्या गळतीमुळे कंपनीतील तब्बल 25 महिला कामगार बेशुद्ध झाल्या असून, एकूण 27 जणांवर या विषारी वायूचा परिणाम झाला आहे.

सर्व बाधितांना तात्काळ उपचारासाठी वाशी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

## इराणचा इस्त्रायलवर १०० ड्रोनने प्रत्युत्तराचा हल्ला

### इराणचे ४ आण्विक, २ लष्करी स्थळ उद्ध्वस्त

■ **वृत्तसंस्था, तेहरान/तेल अवीव, दि. १३ :**
इराणने इस्त्रायलवर केलेल्या ड्रोन हल्ल्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, जो इराकच्या आकाशात उडताना दिसत आहे. इस्त्रायलला प्रत्युत्तर म्हणून इराणने १०० हून अधिक ड्रोन डागले आहेत. इस्त्रायल संरक्षण दलांनी म्हटले आहे की हे ड्रोन पुढील १ ते २ तासांत इस्त्रायलपर्यंत पोहोचू शकतात. सध्या हे ड्रोन इराक आणि जॉर्डनच्या हवाई हद्दीत आहे. जॉर्डनची राजधानी अम्मानमध्ये सायरन वाजू लागले आहेत.

टाइम्स ऑफ इस्त्रायलच्या वृत्तानुसार, आयडीएफने इशारा दिला आहे की इराण लवकरच एक मोठा क्षेपणास्त्र हल्ला करू शकतो.

आज सकाळी इस्त्रायलने २०० लढाऊ विमानांनी इराणवर हल्ला केला. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, इस्त्रायली सैन्याने तेहरानभोवती असलेल्या किमान ६ लष्करी तळांना लक्ष्य केले आहे. या ६ पैकी ४ ठिकाणी आण्विक तळदेखील आहेत.

इराणच्या सरकारी माध्यमांनी इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे कमांडर हुसेन सलामी इस्त्रायली हल्ल्यात मारले गेल्याची पुष्टी केली आहे. अल-जझीराच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात इराणचे दोन प्रमुख अणुशास्त्रज्ञ, मोहम्मद मेहदी तेहरानची आणि फरदून अब्बासी यांचाही मृत्यू झाला. या हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख मोहम्मद बघेरी, इतर वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि काही वरिष्ठ अणुशास्त्रज्ञांचाही मृत्यू झाल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे.

## नागपूरमध्ये हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**
ागपुरात सुमारे ८ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभारण्यात येणार आहे. शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मॅक्स एरोस्पेस अँड एव्हिएशन प्रा. लि. आणि महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरमधील संरक्षण उत्पादन क्षेत्राला यामुळे गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात आयोजित कार्यक्रमात उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी उपस्थित होते. अन्बलगन आणि मॅक्स एरोस्पेसचे अध्यक्ष भरत मलकानी यांच्यात हा सामंजस्य करार झाला.

या करारानुसार मॅक्स एरोस्पेस नागपूर येथे हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना उभारणार असून त्याचे प्रत्यक्ष काम २०२६ पासून सुरू होणार आहे. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये सुमारे ८ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे.



मॅक्स एरोस्पेसशी करार

हा करार भारताच्या मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेला चालना देणारा टप्पा ठरणार आहे. हेलिकॉप्टरचे कस्टमायझेशन आणि पूर्ण उत्पादन यासाठी समर्पित असलेला हा महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प असेल. या उपक्रमामुळे महाराष्ट्र हे एरोस्पेस उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येणार आहे.

या प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञानाचा समावेश असून, रोटरी-विंग प्लॅटफॉर्म्सचे कस्टमायझेशन, इंटिग्रेशन आणि फ्लाइट टेस्टिंग यासाठी हे उत्कृष्टता केंद्र (सेन्टर ऑफ एक्सलन्स) म्हणून कार्य करणार आहे. नागपूर विमानतळाजवळ हे केंद्र असल्यामुळे विद्यमान पायाभूत सुविधा आणि लॉजिस्टिक सपोर्टचा लाभ घेता येणार आहे. यामुळे भारताच्या वाढत्या एरोस्पेस पुरवठा साखळीतही योगदान मिळणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मॅक्स एरोस्पेसने हेलिकॉप्टर उत्पादनासाठी महाराष्ट्र विशेषतः नागपूरची निवड केल्याचा आनंद आहे. मॅक्स एरोस्पेसच्या व्यवसायाच्या प्रवासात राज्य शासनही सहभागी आहे.

## विदर्भात १५ जूनपासून मान्सून सक्रिय होणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**
नागपूर आणि विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात मोसमी पावसाची स्थिती ही एक ते १४ जूनपर्यंत फारशी चांगली नाही. मात्र, १५ ते ३० जून दरम्यान मान्सून सक्रिय होऊन चांगला पाऊस पडणार असल्याची माहिती ख्यातनाम हवामान वैज्ञानिक अक्षय देवरस यांनी दिली आहे.

अक्षय देवरस हे एक प्रसिद्ध वैज्ञानिक असून सध्या इंग्लंडमध्ये राहतात. ते महाराष्ट्रातील पावसाच्या वर्तनावर आणि हवामानावर संशोधन करतात.केरळ किनाऱ्यावर लवकर पोहोचल्यानंतर गेल्या १६ वर्षांत पहिल्यांदाच नैऋत्य मान्सून अचानक थांबला आहे.

२९ मे पासून, देशाच्या पश्चिमेकडून येणाऱ्या कोरड्या हवेमुळे संपूर्ण भारतात त्याची वाटचाल थांबली आहे. मात्र अक्षय देवरस यांच्या मते, विदर्भात १५ जूनच्या आसपास मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, १५ ते ३० जून दरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात चांगला पाऊस पडेल असे ते म्हणाले.

देशात दक्षिण गोलार्धातून कोरडे वारे येतात. हे वारे मान्सूनच्या वाऱ्यांना पुढे जाऊ देत नाही. परिणामी मान्सून थांबतो. आता मात्र परत मान्सूनला अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. मान्सूनचे वारे गती पकडत आहे. १४ तसेच १५ जूनपासून ते पुढे सरकायला लागेल. रवीवारपासून उष्णता कमी होत जाईल. १५ नंतर पावसाळी आणि ढगाळ वातावरण राहिल. त्यामुळे उष्णतेपासून दिलासा मिळेल.

## बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांची माहिती लवकरच जाहीर

### राज्यभरात शोधमोहीम सुरू : मुख्यमंत्री फडणवीस

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :**
महाराष्ट्रात बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या परदेशी नागरिकांची संकलित केलेली माहिती सरकार लवकरच सर्वांसमोर ठेवणार आहे. अशा लोकांना शोधण्याची आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया अजूनही सुरू असल्याने,



सरकार जाणूनबुजून ही माहिती सार्वजनिक करत नाही, अशी महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या प्रत्येक परदेशी नागरिकाचा शोध घेऊन त्यांना बाहेर काढले जात आहे. ही कारवाई अतिशय वेगाने होत आहे. यामध्ये बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांचाही समावेश आहे. कोणत्याही परदेशी नागरिकाला महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे राहू देणार नाही, असेही ते म्हणाले.

मिठी नदी घोटाळ्याबाबत आमदार प्रसाद लाड यांनी एका विशेष प्रकारची मोडस ऑपरेंडीबद्दल मला माहिती दिली आहे. मी ही माहिती मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेला देण्यास त्यांना सांगितल्याचे ते म्हणाले.

राज्यातील अनेक नद्यांच्या काठांवर गेल्या अनेक वर्षांत पूरस्थिती उद्भवलेली नसतानाही, जुन्या पूर नियंत्रण रेषांच्या आधारे विकासकामांना मर्यादा येत आहेत. त्यामुळे ज्जिथे पूर येत नाही, तिथे नव्याने सर्वेक्षण करून पूर नियंत्रण रेषा निश्चित करा, असा स्पष्ट आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाला दिला आहे.

## निर्णय घ्या, नाहीतर आमची अंत्ययात्रा काढा...

### बच्चू कडूंचा निर्वाणीचा इशारा : मंत्री संजय राठोडांची विनंती धुडकावली

■ **महासागर प्रतिनिधी,अमरावती, दि. १३ :**
शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर गेल्या ८ जूनपासून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

उपोषणाच्या सहाव्या दिवशी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी गुरूकूंज मोझरी येथे उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी बच्चू कडू यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली, पण ती धुडकावून जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.

बच्चू कडू म्हणाले, संजय राठोड यांनी जी सहानुभूती दाखवली त्याचा मी आदर करतो. मात्र, शेतकरी, शेतमजुरांसोबत आम्ही विश्वासघात करू शकत नाही. मागण्यांवर एकत्र निर्णय घ्या नाही तर आमची अंत्ययात्रा



काढा, तशी व्यवस्था करा. या दोन्ही पैकी काही जरी केले तरी ते आम्हाला मान्य आहे.

आम्ही कर्तव्यात कुठेही कसूर करणार नाही. रोज १५ ते २० शेतकरी आत्महत्या करत असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले.

यावेळी संजय राठोड म्हणाले, आज त्यांची भेट घेत त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली. महिन्यातील दर मंगळवारी कॅबिनेट बैठक होते. त्यामध्ये आपल्या मागण्यांचा विषय मी विशेष म्हणून मांडणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषद सदस्य संजय खोडके व अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी उपोषण मंडपाला भेट दिली. संजय खोडके यांनी बच्चू कडू व त्यांच्या समर्थकांशी चर्चा केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडूनही बच्चू कडूंच्या प्रकृतीची विचारणा करण्यात आली.

## एअर इंडियाचे खासगीकरण केले अपघाताची जबाबदारीही सरकारचीच

संजय राऊतांचा निशाणा



**मुंबई :** अहमदाबाद येथील विमान अपघातामध्ये जवळपास २६५ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. त्याला केवळ अपघात म्हणून सोडून देता येणार नाही. त्याची जबाबदारी घ्यावी लागेल. एअर इंडियाचे खासगीकरण सरकारनेच केले आहे. त्यामुळे याची जबाबदारी देखील सरकारलाच घ्यावी लागेल, अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे.

अहमदाबाद विमान अपघाताची चौकशी होईलच. मात्र सत्य समोर येणार नाही. मात्र, यूपीए सरकार मध्ये 'ड्रीमलाईनर' विमानाचा सौदा झाला, त्यावेळी प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे भारतीय जनता पक्षच होता. या खरेदीमध्ये काहीतरी गडबड असल्याचा आरोप भाजपने केला होता. मग आता गडबड संपली का? असे देखील राऊत यांनी विचारले आहे. रेल्वे अपघात टाळता येत नाही? दहशतवादी हल्ला टाळता येत नाही? विमान अपघात टाळता येत नाही? मणिपूरमधील दंगा टाळता येत नाही? मग यांना काय टाळता येते? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला.

## इम्तियाज जलील यांच्यावर ॲट्रॉसिटी



**छत्रपती संभाजीनगर :** संजय शिरसाट यांच्यावर औद्योगिक वसाहतीमधील जमिनीवरून आरोप करताना एका समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याच्या तक्रारीवरून माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर क्रांती चौक पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मण हिवराळे यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

वास्तविक पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या विरोधात माजी खासदार इम्तियाज जलील यांनी अनेक पुरावे गोळा केले आहेत. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप देखील केले. मात्र, यातच औद्योगिक वसाहतीमधील जमिनीवरून आरोप करताना एका समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यांच्या याच वक्तव्यावरुन आता त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला असल्याचे वृत्त समोर आले आहे.

पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या विरोधातील पुरावे घेऊन माजी खासदार इम्तियाज जलील यांनी गुरुवारी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची भेट घेतली. या भेटीला दानवेंनी सकारात्मक प्रतिसादही दिला. इम्तियाज जलील यांनी अंबादास दानवे यांना राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांना निवेदन देण्यासाठी वेळ घ्यावा, अशी मागणी देखील केली. जलील यांच्या विनंतीनंतर दानवे यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासनही दिले. पालकमंत्री शिरसाट यांच्या विरोधातील व्हिट्स हॉटेल, एमआयडीसी मधील जागा, मागासवर्गीय शेतकऱ्यांकडून केलेला व्यवहार, मुंबई व छत्रपती संभाजीनगरातील घर आदींसंबंधी कागदपत्रे इम्तियाज यांनी दानवेंच्या स्वाधीन केली. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शिरसाटांवर शेंद्रा एमआयडीसीमधील ६ कोटी रुपये किमतीची जागा नियम डावलून मिळवल्याचा गंभीर आरोप केला आहे. जलील यांनी पत्रकार परिषद घेत शिरसाट यांच्यावर ताशेरे ओढले. शिरसाट यांनी जी कागदपत्रे सादर केली आहे त्यामध्ये काही तरी गोंधळ आहे. स्पिरिट किंवा अल्कोहोल फूड प्रॉडक्टमध्ये कुठे आणि कसे वापरले जाते, हे समजत नाही. हे दस्तऐवजांतील माहितीमध्ये गोंधळ स्पष्टपणे दिसतो, असेही जलील यांनी म्हटले होते.

## ट्रकची टेम्पोला मागून धडक १ ठार, १५ जण जखमी

**मोहोळ :** सोलापूर ते पुणे महामार्गावर टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार तर १५ जण जखमी झाल्याची घटनागुरुवारी दुपारी तीन वाजता हिवरे फाट्याजवळ घडली. विक्रम हुरमुशा काळे (वय ४९ रा. हिवरे ता. करमाळा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. करमाळा तालुक्यातील देवळाली येथील पारधी समाजाचे लोक मोहोळ तालुक्यातील वन विभागाची गायरान जमीन मागणीच्या कामासाठी छोटा हत्ती वाहनाने आले होते. हिवरे फाट्यावरून परत वळून वनविभाग ऑफीसकडे जात असताना पाठीमागून मोहोळकडून भरधाव वेगात आलेल्या मालट्रकने जोरात धडक दिली. यात तोगराबाई काळे (वय. ४५ रा.हिवरे) अर्चना काळे रा.निर्ले, अजिनाथ काळे, सुरेश काळे (रा.मांगी) जेयब्या हुनाजी पवार (रा.विट), संतोष घनश्याम मुरकुटे (रा.मांगी) यांच्यासह १५ जण जखमी झाले आहेत. यातील एक जणांची प्रकृती गंभीर आहे .

जखमींवर मोहोळ येथील खासगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत . याबाबत किरण विक्रम काळे यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात दिलेल्या फियार्दीनुसार ट्रक चालक गुजेश्वरसिंह कौशल सिंग झाकलवार मध्य प्रदेश याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास मोहोळ पोलिस करत आहेत.

# पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी चरणसेवा

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता विभागाचा उपक्रम : ५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची टीम सज्ज

■ **वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. १३ :**
पंढरपूला जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांमधून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहाभगी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि चरणसेवा करण्यासाठी जवळपास ५ हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची टीम तैनात करण्यात आली आहे.

**चरणसेवा उपक्रम**

महाराष्ट्रात आषाढी वारीला खूप महत्त्व आहे तसेच या वारीला एक परंपरा आहे, जी आजही जोपासली जाते. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून भाविक तसेच वारकरी मंडळी भक्तिभावाने पंढरीच्या दिशेने चालत निघतात. पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष सज्ज करण्यात आला आहे. त्यांच्याद्वारे चरणसेवा उपक्रम राबवला जात आहे.

चरणसेवा या उपक्रमाच्या माध्यमातून पायी चालून थकलेल्या वारकऱ्यांच्या पायांना शास्त्रोक्त पद्धतीने व फिजिओथेरपीच्या मदतीने पायांवर उपचार केले जाणार आहेत. पायी चालताना अनेकदा वारकऱ्यांच्या पायांना सूज येते तसेच तळपायालाही वेदना होतात, यावर तत्काळ उपचार मिळावेत यासाठी आरोग्य पथक तैनात करण्यात आले आहे.



**४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था**

वारकऱ्यांच्या या दिंडीसाठी एकूण ४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. या मुक्कामाच्या ठिकाणी चरणसेवा दिली जात आहे. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी कक्ष देखील स्थापन करण्यात आले आहेत. स्थानिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन, स्वयंसेवी संस्था तसेच शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या समन्वयाने ही सेवा दिली जात आहे.

**६ जुलै रोजी आषाढी एकादशी**

दरम्यान, संत तुकाराम महाराजांची पालखी देहू वरून १८ जून रोजी निघणार आहे. तर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदी वरून १९ जून रोजी निघेल. तसेच ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असेल.

आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरात वैष्णवांचा मेळा भरतो, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण बघायला मिळते. या दिवशी केलेले व्रत महत्त्वाचे मानले जाते.

या आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हणतात. देवशयनी या शब्दाचा अर्थ म्हणजे 'देव' भगवान विष्णू 'शयनी' अवस्थेत ज्यावेळी प्रवेश करतात ती एकादशी म्हणजे आषाढी किंवा देवशयनी एकादशी होय. या दिवशी भगवान विष्णू शेष सर्पावर गाढ निद्रा अवस्थेत प्रवेश करतात त्यामुळे या दिवसाचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व खूप मोठे आहे.

## संभाजीराजेंचे कोकाटेंना खडेबोल

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १३ :**
बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसाठी अन्न त्याग आंदोलन सुरु केलंय त्याचा पाच दिवस आहे. बच्चू कडू यांची तब्येत खालावत चालली आहे.

कोल्हापूरचे संभाजीराजे यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली. त्यांनी येथून कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी थेट फोन तरुन कानउघाडणी केली. बच्चू कडू यांच्या मागण्या मान्य करा नाही तर मी पण इथे उपोषनाला बसतो असा दमच संभाजीराजे यांनी यावेळी दिला.

अमरावतीत प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी अन्नत्याग उपोषण सुरु केले आहे. आज उपोषणाचा सहावा दिवस आहे. आज संभाजीराजे यांनी उपोषण स्थळी जाऊन बच्चू कडू यांची चौकशी केली.

यावेळी त्यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना उपोषणस्थळावरुनच फोन केला आणि त्यांना दोन बोल सुनावले. ते म्हणाले की शेतकरी आपला केंद्रबिंदू आहे. सरकार म्हणते सर्वसामान्य लोकांचे सरकार आहे. मग शेतकरी कोण?

बच्चू कडू यांनी ज्या मागण्या केल्या त्या रास्त आहेत. कोकाटेच्या जिभेला हाड नाही.



आम्ही कृषीमंत्री कोकाटे सोबत फोनवर बोललो आहोत पण, फोनवर बोलून फायदा नाही.. उपाय योजना करा, मागण्या मान्य करा असेही संभाजीराजे यावेळी म्हणाले.

संभाजीराजे म्हणाले की सरकारने निवडणुकीत आश्वासन दिलं ते पूर्ण करावे. सरकारला माझे आवाहन आहे. बच्चू कडूंची तब्बेत खालावल्यास सरकार जबाबदार राहणार, सरकारने लवकर निर्णय घावा, अन्यथा परिस्थिती हाताबाहेर गेल्यास सरकार जबाबदार राहील असा इशाराच त्यांनी यावेळी दिला.

दरम्यान, बच्चू कडू यांच्या अन्नत्याग उपोषणाला समर्थन म्हणून पश्चिम विदर्भात प्रहारच्यावतिने ठिकठिकाणी तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जात आहे.

### प्रेम प्रकरणात बापाचा अडसर

## प्रियकराच्या मदतीने मुलीने काढला काटा

**मुंबईतील भयंकर घटना**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
प्रेम प्रकरणाला विरोध करणाऱ्या एका व्यक्तीची त्याच्याच मुलीने हत्या केल्याची भयंकर घटना मुंबईच्या अंधेरी एमआयडीसी परिसरात घडली आहे. प्रकरणी पोलिसांनी आरोपींवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. दुसऱ्या एका घटनेत प्रियकराने प्रेयसीला डोक्यात हातोडा घालून संपवले आहे. कोल्हापूरच्या एका लॉजवर ही घटना घडली.

माहितीनुसार, मुंबईतील कुर्ला रोड परिसरातील सागबाग येथे शंकर कांबळे आपल्या कुटुंबासह राहत होते. त्यांची मुलगी सोनाली हिचे पहिले लग्न झाले होते. पण ती नवऱ्याला सोडून महेश पांडे नामक व्यक्तीसोबत पळून गेली होती.

या दोघांच्या प्रेमसंबंधांना शंकर कांबळे यांचा विरोध होता. याच कारणावरून आरोपी मुलगी सोनाली व तिचा प्रियकर महेश पांडे यांनी शंकर यांना मारहाण केली होती. त्यात गंभीर जखमी झालेल्या शंकर यांचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी शंकर यांचा मुलगा राहुल याच्या तक्रारीनुसार, अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी सोनाली व महेश या दोघांवर गुन्हा दाखल केला असून, दोघांनाही अटक केली आहे.

**प्रेयसीची हातोड्याने हत्या**

दुसरीकडे, कोल्हापुरात प्रियकराने प्रेयसीची डोक्यात हातोडा घालून हत्या केल्याची भयंकर घटना घडली आहे. सांगली - कोल्हापूर रोडवरील रूकडी फाटा येथील सागरीका लॉजवर ही घटना घडली आहे. सुमन सुरेश सरगर असे मृत महिलेचे, तर आदमगौस पठाण असे आरोपीचे नाव आहे. हे दोघेही सागरीका लॉजवर वेळ घालवण्यासाठी गेले होते. तिथे काही कारणावरून त्यांच्यात वाद झाला. हा वाद एवढा टोकाला गेला की, आरोपीने सुमनच्या डोक्यात थेट हातोड्याचे घाव घालून तिचा खून केला.

या घटनेतील आरोपी आदमगौस पठाणवर आपल्या पत्नीचाही क्रूरपणे खून केल्याचा आरोप आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर त्याचे सुमन सरगरशी सूत जुळले होते. पण त्याने आता तिचीही हत्या केली आहे. या घटनेमुळे कोल्हापुरात एकच खळबळ माजली आहे.

मुंबईच्या मीरा भाईंदर परिसरातील मुदार्खाडी झोपडपट्टीतही मित्राने मित्राचा काटा काढल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी संजय शर्मा नामक आरोपीच्या अवघ्या 36 तासांतच लोणावळ्यातून अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संजय शर्मानें आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. आरोपी मूळचा बिहारचा आहे. तो मीरा भाईंदरमध्ये पेंटिंगचे काम करतो.

## मंत्र्याच्या गाड्यांना मंदिर परिसरामध्ये प्रवेशबंदी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**
आषाढी यात्रा कालावधीत व्हीआयपी लोकांचा भाविकांना कसलाही त्रास होणार नाही, मंदिर परिसरात मंत्र्यांच्याही गाड्या सोडल्या जाणार नाहीत. शासकीय महापूजेच्या वेळी मुखदर्शन सुरू राहील, तसेच आषाढी यात्रेच्या एक महिन्याच्या काळात चंद्रभागा स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणेला ठेका देऊन स्वच्छता राखली जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

आषाढी यात्रा पूर्व नियोजनाबाबत मंदिर समितीची श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होते. बैठकीस आमदार समाधान आवताडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासकीय महापूजेच्या वेळी मुखदर्शन व्यवस्था सुरू ठेवावी तसेच शासकीय महापूजा संपताच तात्काळ रांगेतील भाविकांची दर्शन व्यवस्था पूर्ववत करावी. शासकीय महापुजेवेळी मंदिरात गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन महापूजेला उपस्थितांची संख्या मर्यादित राहील याची दक्षता घ्यावी, भाविकांचे दर्शन लवकर व्हावे यासाठी व्हिआयपी दर्शन व्यवस्थेवर निर्बंध आणावेत. मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम २४ जून पर्यंत व्यवस्थित करून थांबवण्यात यावे. मंदिर व मंदिर परिसरातील इलेक्ट्रिक ऑडिट, फायर ऑडिट करावे, असे निर्देश दिले.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पालखी मुक्कामाची ठिकाणी, विसावा ठिकाणी तसेच पालखी मार्गावर करण्यात आलेल्या कामांची पाहणी केली.

पालखी तळावर आवश्यक त्या ठिकाणी मुरमीकरण, सपाटीकरण याची पाहणी केली. तसेच मुक्काम व विसावा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाऊस आल्यानंतर जलावरोधक मंडप कोणत्या ठिकाणी उभे केले जाणार आहेत या अनुषंगाने माहिती घेऊन वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाही यासाठी प्रशासनाने काळजी घेण्याबाबत त्यांनी सूचित केले.

## एका पत्रकारामुळे फुटली युती!

### १२ वर्षांपूर्वीच जुळली असती अन्यथा भाजप-मनसेची जोडी



■ **दीपक कैतके**
**मुंबई, दि. १३ :**
सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीनंतर भाजप-मनसे युतीचे संकेत पुन्हा एकदा गडद झाले आहेत. मुंबईतील ताज लँड्स एन्ड हॉटेलमध्ये ही बैठक झाली असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीसंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात आज चर्चेचा केंद्रबिंदू असलेली भाजप-मनसे जवळीक, प्रत्यक्षात 12 वर्षांपूर्वीच साकार होणार होती. मात्र एका पत्रकाराच्या ह्यस्कूपह्णमुळे ती ऐतिहासिक युती मोडीत निघाली होती, असा गौप्यस्फोट खुद्द राज ठाकरे यांनीच केला आहे.

याआधीही लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपूर्वी अशाच चर्चांना उधाण आले होते. मात्र अधिकृत युती शक्य झाली नव्हती. राज ठाकरे यांनी त्या वेळी महायुतीला बाहेरून पाठिंबा दिला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र मनसेने स्वतंत्र लढत दिली होती. परंतु यंदा परिस्थिती वेगळी आहे. अधिकृत युतीची चर्चा फडणवीस-ठाकरे भेटीत स्पष्टपणे समोर आली आहे.

परंतु या पार्श्वभूमीवर एक जुना घटनाक्रम पुन्हा आठवला जात आहे, जो 12 वर्षांपूर्वी भाजप-मनसे युतीच्या अडथळ्याचं कारण ठरला होता. ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्या The Election That Changed India 2014 या पुस्तकात याबाबतचा उल्लेख आहे.

पुस्तकानुसार, 2014 लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान पदासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांची जबाबदारी नितीन गडकरी यांच्याकडे होती. भाजपमध्ये मनसेसोबत युती करण्याचा विचार प्रबळ होत होता. कारण 2009 मध्ये मनसेच्या उमेदवारांनी महायुतीच्या विजयावर मोठा परिणाम केला होता. मात्र शिवसेनेचा या युतीला तीव्र विरोध होता.

या पेचातून मार्ग काढण्यासाठी नितीन गडकरी आणि राज ठाकरे यांच्यात गुप्त बैठक आयोजित करण्यात आली होती. पण ही गोपनीयता फार काळ टिकली नाही. राज ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार, ह्लआम्ही दोघं हॉटेलच्या लिफ्टमध्ये होतो. पण एका पत्रकाराने आम्हाला पाहिलं. आणि दुसऱ्याच दिवशी मीडियामध्ये ही बातमी फोडली गेली. त्यामुळे नियोजित युती पूर्ण होण्याआधीच धुळीस मिळाली. परिणामी, राज ठाकरे यांनी त्या वेळी उमेदवार उभे न करता नरेंद्र मोदी यांना पाठिंबा दिला, पण युती झाली नाही.

आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. त्या वेळी मनसेविरोधात उभी असलेली शिवसेना आता भाजपसोबत नाही. उलट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना, मनसेला महायुतीत सामावून घेण्यास उत्सुक आहे. भाजपसह इतर घटक पक्षही सकारात्मक आहेत. त्यामुळेच आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप-मनसे युती प्रत्यक्षात आली, तर त्याचा थेट फायदा महायुतीला होईल, असा विश्वास राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

### १५ महानगरपालिकांच्या जागा वाटपात

# भाजप, शिंदेसेनेचा असेल वरचष्मा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
जवळपास सात ते आठ वर्षाच्या कालखंडानंतर राज्यातील महापालिकांच्या निवडणूका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी फेब्रुवारी २०१५ ते डिसेंबर २०१८ या काळात निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळचे पक्षीय बलाबल पाहिले तर आज महायुती निश्चित झाली तर १५ महापालिकात जागा वाटपात भाजपचा तर मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवलीत शिंदेसेनेचा वरचष्मा असेल. पुण्यात अजित पवारांचा प्रभाव असेल.

प्रभाग रचनेच्या आदेशानंतर आता राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यावर प्रभागांचे प्रारूप जाहीर होतील. अंतिम रचना आयोग मान्य करेल. जवळपास अडीच-तीन महिन्यांचा कालावधी या प्रक्रियेस लागेल. त्यानंतर आरक्षण सोडत होईल. दरम्यान महायुती करायची की नाही, महाआघाडी होणार की नाही यावरून राजकारण शिगेला पोहोचले आहे.

महायुती केली तर आपल्याला कमी जागा मिळतील, कार्यकर्ते नाराज होतील ही भिती सर्वच पक्षांना भेडसावते आहे. पण मावळत्या महापालिकेतील संख्याबळ पाहिले तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला माघार घ्यावी लागेल असे चित्र आहे.

**गेल्या निवडणुकीतील नगरसेवक संख्येच्या आधारावर जागावाटप**



**भाजप १५, शिवसेना ५ ठिकाणी नंबर १**

राज्य निवडणूक आयोगाने २०१७ ची आकडेवारी दिली, त्यानुसार २७ महापालिकेत २७३६ जागा आहेत, त्यापैकी १०९९ भाजपकडे, ४८९ शिवसेनेकडे (एकत्र), ४३९ काँग्रेस व २९४ नगरसेवक राष्ट्रवादी (एकत्र) यांच्याकडे आहेत. त्यातील १५ ठिकाणी भाजप क्रमांक एकचा पक्ष आहे. मुंबईत तेव्हा शिवसेनेने सर्वाधिक ८४ व ठाण्यात ६७ जागा मिळवून क्रमांक एक मिळविला. तर काँग्रेसने ५ महापालिकेत सत्ता मिळविली होती.

**कोणत्या मनपात कोणता पक्ष नंबर वन**

भाजप : उल्हासनगर, पणवेल, मिरा-भाईंदर, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, सोलापूर, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर.

काँग्रेस : भिवंडी-निजामपूर, मालेगाव, कोल्हापूर, परभणी, नांदेड.

शिवसेना (एकत्र) : मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबविली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर

राष्ट्रवादी काँग्रेस (एकत्र) : नवी मुंबई.

**मुंबई, पुणे, ठाण्यात तेढ**

मुंबईत २२७ पैकी भाजपकडे १३० तर शिंदेसेना १०० जागा मागू शकते, ठाण्यात १३१ पैकी शिवसेनेच्या ६७ जागा आहेत, तेथे भाजपही ताकत दाखविण्याच्या तयारीत आहे. पुण्यात १६२ पैकी ९७ जागा भाजपकडे तर राष्ट्रवादीकडे ३९ जागाच आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये १२८ पैकी ७७ भाजपच्या तर ३६ राष्ट्रवादीकडे आहेत. मात्र आता तेथे अजित पवारांनी जोर लावला आहे. तेथे भाजप कमी जागा घेण्यास तयार होणार नाही.

# वन विभागाच्या राखीव वनात अवैधरीत्या उत्खनन करणाऱ्या पाच जणांना अटक

## चार ट्रॅक्टर, ट्रॉली, जेसीबीसह ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
अकोट , दि. १३ :

अकोट वतुर्ळ क्षेत्रातील राखीव वनात अवैध गौण खनिज उत्खनन करताना आढळून आलेल्या पाच जणांसह ट्रॅक्टर व जेसीबीसह वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे. यावेळी कारवाईत त्यांच्याकडून चार ट्रॅक्टर, ट्रॉली,एक जेसीबीसह ७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वन विभागाची ही सर्वांत मोठी कारवाई आहे. अकोला (प्रादेशिक)वन परिक्षेत्र अंतर्गत अकोट वतुर्ळ क्षेत्रातील शहानूर नियतक्षेत्रात प्रवेश करून अवैधरीत्या गौण खनिज उत्खनन होत असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती.या माहितीवरून वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी ११ जून रोजी सकाळी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने अवैध उत्खनन करून ट्रॅक्टर आणि ट्रॅक्टर टॉलीद्वारे दगड, माती, मुरूम, वाहतूक



केली जात असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या प्राथमिक तपासात पुढे आले. अकोट वन परिक्षेत्रातील वन विभागाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैधरीत्या उत्खनन करून जेसीबीच्या साह्याने मुरुम,दगड,मातीची विल्हेवाट लावली जात असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिसून आल्याने जेसीबी व ट्रॅक्टर जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे महसूल विभागाचे पितळच उघडे पडले आहे. पाच आरोपी ताब्यात विना परवाना उत्खनन करून त्यामधील माती,मुरुम व दगडांची वाहतूक केल्या प्रकरणी बिस्मिल्ला रेहान खान रा.अडगाव (ता.तेल्हारा), निखिल नाना बगाळे रा.बोचरा (ता.अकोट), शेख रेहान शेख निसार,रा.अडगाव (ता.अकोट), संदीप बाबाराव सोनोने रा.आबाडी (ता.अकोट) व शेख अजर शेख हुसेन रा.अडगाव (ता.तेल्हारा) हे पाच आरोपी वन विभागाच्या तावडीत सापडले. याप्रकरणी कक्ष क्र.सी ३ मध्ये वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपवनसंरक्षक एस.आर. कुमारस्वामी तसेच सहाय्यक वनसंरक्षक (वने) नम्रता ताले, अकोला वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) व्ही.आर.थोरात, वन परिक्षेत्र अधिकारी रोहित बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट वतुर्ळ वनपाल एस.पी.राऊत वनपाल, वनरक्षक (शहापुर बिट) पी.ए. तुरुक, बोर्डी बिटचे वनरक्षक अतिफ हुसेन, अनुराधा फुकट,दीपक मेसरे यांनी ही कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सुनील राऊत हे करत आहेत.

## महागावात पावसाची दमदार हजेरी

**महागाव:** मृग नक्षत्राच्या पहिल्याच चरणात पावसाचे दमदार आगमन झाल्याने बळीराजा सुखावला आहे. महागाव तालुक्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली असून, शेतांमध्ये पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांनी आता पेरणीच्या तयारीला वेग दिला आहे.

यंदाच्या हंगामात मृगाच्या नक्षत्रात बरसलेल्या या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. अनेक ठिकाणी शेतात पाणी साचले असून, जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली आहे. या पावसामुळे शेती कामांना गती मिळाली आहे. कपाशी, सोयाबीन, तूर यांसारख्या प्रमुख पिकांच्या पेरणीसाठी शेतकरी लगबग करत आहेत. काही ठिकाणी तर पेरणीला सुरुवातही झाली आहे. बियाणे आणि खतांची दुकाने शेतकऱ्यांच्या गर्दीने फुलून गेली आहेत. कृषी विभागाकडूनही शेतकऱ्यांना योग्य बियाणे आणि खतांचा वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. मागील काही वर्षांपासून अनियमित पावसामुळे शेतकरी मोठ्या नुकसानीला सामोरे गेले होते. त्यामुळे यावर्षी चांगला पाऊस झाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.

## १लाख ५६ हजार विद्यार्थ्यांना ७ कोटी ३५ लाख रूपयांचा निधी

### पहिल्याच दिवशी विद्यार्थी गणवेश, बूट, सॉक्समध्ये उपस्थित राहतील

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. १३ :

राज्यातील शाळांप्रमाणेच बुलडाणा जिल्ह्यातील शाळांमध्येही २३ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार आहे. यंदा पहिल्याच दिवशी विद्यार्थी नव्या गणवेशात, बूट व सॉक्ससह शाळेत हजर राहणार आहेत. गणवेश, बूट, सॉक्ससाठी शिक्षण विभागाच्या वतीने तब्बल ७ कोटी ३५ लाखांचा निधी वितरित करण्यात आला असल्याची माहिती मिळाली आहे. बुलडाणा जिल्ह्यात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात यंदा खास ठरणार आहे. जिल्ह्यातील एकूण २ लाख ४४ हजार विद्यार्थी पहिल्याच दिवशी शाळेत हजर होणार आहेत.

शाळेतील विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी शासनाच्यावतीने विविध योजना राबवण्यात येत आहे. यात गणवेशासह बुट, सॉक्स व पुस्तकांचे वितरण केले जाणार आहे. यात समग्र शिक्षा योजने अंतर्गत एकूण १ लाख ४४ हजार ७५९ विद्यार्थांना लाभ मिळणार आहे तर यात पीएमश्री योजनेचे ११ हजार ७५० विद्यार्थांचा समावेश करण्यात आला आहे. ही योजना समग्र शिक्षण अभियानांतर्गत राबवण्यात येत




असून, शिक्षणाचा दर्जा उंचावणे, गळतीचे प्रमाण कमी करणे आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दरम्यान, जिल्हयातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, तसेच खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना एकात्मिक पुस्तक संच शासनामार्फत विनामूल्य प्रदान केला जाणार आहे. संबंधित विभागाच्या वतीने जिल्ह्यातील २ लाख ४४ हजार २३८ विद्यार्थ्यांसाठी सुमारे १५ लाख १७ हजार पुस्तकांची मागणी करण्यात आली होती. यातील तब्बल १४ लाख ११ हजार ५ पुस्तके उपलब्ध झाली असून शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके उपलब्ध होणार असल्याने पालकांची चिंता मिटली आहे.

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत प्रति विद्यार्थी यंदा ३०० रुपये गणवेशासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तर बुट, सॉक्ससाठी प्रति विद्यार्थी १७० रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहे. जिल्ह्यात एकूण योजने अंतर्गत पात्र विद्यार्थी संख्या १ लाख ५६ हजार ५०९ अशी आहे. या विद्यार्थाच्या बुट, सॉक्ससाठी एकूण २६६०६५३० अशी रक्कम वितरित करण्यात आली आहे, तर गणवेशासाठी एकूण ४ कोटी ४४ लाख ९४ हजार २०० रुपये अशी एकूण ७ कोटी ३५ लाख ५९ हजार २३० रुपयाचे वितरण करण्यात आले आहे.

# विकसित कृषी अभियानांतर्गत जनजागरण

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. १३ :

पिकामध्ये फेरपालट करा, उत्पन्न वाढवा जिल्हाभरात सध्या खरिपाची तयारी सुरु आहे. या दरम्यान शेतकऱ्यांनी कशा पध्दतीने पेरणी करावी, किती पावसानंतर पाणी जमिनीत मुरते, पेरणी कधी करावी या सह विविध विषयावर जिल्हयातील समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगावराजाचे विद्यार्थी गावागावात जनजागरण करत आहेत.

शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार,भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र बुलडाणा,कृषी विभाग आत्मा बुलडाणा तसेच कृषी विभाग देऊळगावराजा यांच्या वतीने सुरू असलेल्या विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत विविध खेड्यामध्ये खरीप पीक, पाणी देण्याच्या पद्धती, खत व्यवस्थापन व पीक बदल यावर विद्यार्थी हे गावकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. हा कार्यक्रम परिसरातील पिंपळगाव चिलमखा, गिरोली बुद्रुक, निमखेड,गोळेगाव आसोला , तुळजापूर व जांभोरा या खेड्यामध्ये घेण्यात आले. दरम्यान, आयोजित कार्यक्रमात शास्त्रज्ञ डॉ. दास, डॉ.सुरेंद्रन, डॉ. निर्मल कुमार कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. अमोल झापे, प्रा.देशपांडे, प्रा.करडे, अनुराधा जाधव, अनिल जाधव, नंदकिशोर ढोरे, समर्थ कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन



मेहेत्रे, प्रा.चगदळे तसेच कृषी विभागाचे समाधान गाडेकर, दिलीप शिंगणे व श्रीकांत पडघान, अनंता देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी सिंदखेडराजाचे आमदार मनोज कायंदे यांनी शास्त्रज्ञ डॉ. दास यांचा सत्कार केला.

यावेळी संस्थेचे सचिव सतीश कायंदे यांनी कृषी अभियानाबद्दल माहिती दिली. यामध्ये शास्त्रज्ञांनी पाण्याची बचत, अन्न द्रव्याचा वापर केल्यामुळे हातावरील खर्च कसा कमी होतो हे सांगितले. त्याचप्रमाणे मजुरावर असलेले अवलंबन कसे कमी करता येईल व भविष्यातील शेती तांत्रिक पद्धतीने करावी याबाबत मार्गदर्शन केले. पाणी बचत करून जमिनीमध्ये पाण्याचा साठा कसा वाढला पाहिजे, पाण्याचे नियोजन करून शेतीसाठी त्याचा योग्य पद्धतीने वापर करण्यासाठी ड्रीप, तुषार सिंचन या पद्धतीचा वापर तसेच मल्चिंग पेपर याचा वापर करून उत्पन्न वाढवता येईल असे सांगितले. शेतकऱ्यांनी नियमित पीक पद्धतीमध्ये बदल करावे याबद्दल मार्गदर्शन केले. मुख्यत ग्रामीण भागात कापूस,ोयाबीन मिरची, तूर व इतर भाजीपाला पिके याचे उत्पादन घेतले जाते. परंतू पिकामध्ये फेरपालट केल्यास उत्पन्न वाढू शकते व मक्याचे उत्पादन वर्षभरातून तीन वेळेस घेऊ शकतो, अशी माहिती निर्मल कुमार शेतकऱ्यांना दिली. तर यावेळी प्रा.देशपांडे यांनी रोग-किडी नियंत्रण, लाईट ट्रॅप, हुमणी अळीचे नियंत्रण कसे करावे यावर सविस्तर माहिती दिली.

डॉ. नितीन मेहेत्रे यांनी पाण्याचा वापर हा योग्य पद्धतीने करून पाण्याची बचत कशी होईल त्यानंतर पाऊस द्वारे पडलेले पाणी हे जमिनीमध्ये कशा पद्धतीने मुरवता येईल व कापसावर कापूस मक्यावर मका पिकवू नका. अशा प्रकारच्या एकाच पिकाच्या लागवडी मुळे विशिष्ट रोगांचा प्रादुर्भाव वाढतो आणि जमिनीची पोषण शक्ती कमी होऊन उत्पादन घटते, त्यामुळे पिकांचा फेरपालट केल्यामुळे सर्व प्रकारची अन्नद्रव्ये जमिनीत संतुलित राहतात असे सांगितले.

# जनसेवा फाउंडेशनतर्फे वटपौर्णिमा



■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ , दि. १३ :** सर्वत्र वटपौर्णिमा हा महिलांचा सण साजरा करीत असताना गोधनी या अति दुर्ग आदिवासी गावात संस्थेच्या प्रसिद्धीप्रमुख योगशिक्षिका मिनाक्षी खत्री यांनी गावातील महिलांना एकत्र करून हळदीकुंकू देऊन वटपौर्णिमा का साजरी केल्या जाते, या सणाचे महत्त्व सर्व परिसरातील महिलांना समजावून सांगितले व वटपौर्णिमा हा सण साजरा केला. मारेगाव तालुक्यातील कानडा येथील सरपंच सुषमा ढोके यांनी गावातील महिलांना वटपौर्णिमा हा सण साजरा कसा करावा याचे महत्त्व सांगितले. सर्व महिलांना हळदी कुंकू लावून सन्मानाने सर्वांनी जगावे. आपण सर्व समाज एक आहोत, यावेळी निराधार, विधवा महिलांचा समावेश होता. सर्वांचे आभार मानून कार्यक्रम पार पडला. पोफळणी येथील अर्चना चचाने या संस्थेच्या महिलांना एकत्र करून वटसावित्री पौर्णिमा हा सण सर्व महिलांनी एकत्र येऊन साजरा करण्याचे आवाहन करून वटवृक्षाचे पूजन केले व हळदीकुंकू हा कार्यक्रम घेण्यात आला. आंबेझरी पारधी बेडा या पारधी बेडा सेवा वस्तीमध्ये जनसेवा फाउंडेशनच्या महिला मंडळच्या अध्यक्ष वंजु घोसले या महिलेंनी पुढाकार घेऊन पारधी समाजात वटपौर्णिमा या सणाचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमाला विधवा, निराधार महिलांचा समावेश करून सर्व महिलांना हळदीकुंकू लावून कार्यक्रम पार पडला. गंधा हिरडी या गावात वटवृक्षाचे पूजन करून सरस्वती या महिलेने सर्व महिलांना वृक्षपूजन करण्याकरिता एकत्र आणून वटपौर्णिमा हा सण साजरा करण्यात आला व सर्व महिलांनी वटवृक्षाचे मनोभावे पूजन केले.



## श्री संत गजानन महाराजांची पालखी, वारकरी दिंडी पंढरपूरकडे रवाना

**पुसद :** प्रतिवर्ष प्रमाणे याही वर्षी श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने, आषाढी एकादशीनिमित्त पुसद ते पंढरपूर श्रींची पालखी व वारकऱ्यांची पायी दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. रविवारी दि. ८ जून ला सकाळी ९ वाजता संस्थानचे अध्यक्ष राधेश्याम जोगीड, सचिव ॲड. भालचंद्र जिल्लावार, सदस्य डॉ. विजय जाजू, डॉ. अरुण तंगलापल्लेवार यांनी पादूकाची पूजा आरती केली. सर्व वारकरी महिला, पुरुष भक्त मंडळी दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला. पालखी श्रीरामपूर, गोविंदनगर काकडदाली मार्गे शेलूकडे रवाना झाली. या वर्षी पालखीचे निरंतर २० वे वर्ष आहे. दरवर्षी वारीमध्ये बाहेरगावाकडील बरेच महीला व पुरुष पालखीमध्ये सामील होउन संत दर्शनाचा लाभ घेतात. पुसद ने पेढरपूर पालखीचा अरूण २७ दिवसाचा प्रवास असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत वारकरी १९ ते २० कि मिटर चालत असून आहे. ४९० कि. मि. प्रवास आहे. मार्गामध्ये दुपारचे भोजन व सायंकाळचे भोजन व विसाव्याकरिता पालखी थांबत असून तेथील सर्व गावकरी मुख्य यजमान पालखीचे स्वागत व सर्व वारकऱ्यांची जेवन व निवास व्यवस्था अत्यंत मनोभावे करीत आहेत. पालखी जलाराममठ सोलापूर रोड येथे पोहचत असून दि. ७ जून रोजी पालखी वारकरी पुसद ?कडे परतीचे प्रवासाला निघणार आहेत. पालखी सोबत किर्तनकार, भजन मंडळी मृदेगाचार्य विणेकरी, वृंदावनतिका व्यवस्था चोपदार संपूर्ण वारीचे नियोजन दिंडी प्रमुख अभर गोदेकर, दिवाकर कोषरवार, काकडे, काळे सचिन पाटील रंगासन लकडे करित आहेत.

# ऑनलाइन प्रक्रियेने वाढवला गोंधळ ३२०० चे उद्दिष्ट अनब अर्ज आले १३२

## बियाणे नोंदणीही झाली ठप्प

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. १३ :

कृषी विभागाकडून पेरणीसाठी बळीराजाला हातभार लावण्यासाठी दर वर्षी अनुदानावर बियाणे उपलब्ध करून देण्यात येते. त्याद्वारे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक हातभार लागतो. मात्र यंदा कृषी विभागाने ज्यांना बियाणे पाहिजे आहे त्यांनी ऑनलाइन नोंदणी करण्याची सक्ती केली आहे. मात्र ऑनलाइन नोंदणीसाठीचा सर्व्हर गेल्या दहा दिवसांपासून सातत्याने बंद पडत आहे. महाडीबीटी सर्व्हरवर यवतमाळ जिल्हा या ऑपशनवर क्लिकच होत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासनाने कृषी विभागाच्या माध्यमातून मोफत बियाणे वाटपाचा निर्णय घेतला. यात एका शेतकऱ्याला एक हेक्टर मर्यादित सोयाबीनचे बियाणे वितरीत केले जाणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना अर्ज सादर करावे लागत आहे. प्रत्यक्षात या पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांचे अर्ज प्रक्रिये बाहेर फेकले जात आहे. सॉफ्टवेअरच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांना या प्रक्रियेत अद्यापही अर्जच दाखल करता आले नाही. यातून मोठा गोंधळ उडाला आहे. मोफत बियाण्यांसाठी महाबीज कंपनीने ३ हजार २०० क्विंटल सोयाबीन बियाणे देण्याची तयारी दर्शविली आहे. तालुकास्तरावर शेतकऱ्यांसाठी बियाणे पोहोचले आहे. ३ हजार २०० शेतकऱ्यांना हे मोफत बियाणे वितरीत होणार आहे. प्रत्यक्षात या प्रक्रियेत आतापर्यंत केवळ १३२ शेतकऱ्यांचे अर्ज दाखल झाले आहे. यामुळे कृषी विभागाने ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत हटविली आहे. त्यासाठी वाडी-वस्तीवरील आणि खेडेगावातील शेतकरी बियाणांसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी जवळच्या महा ई-सेवा केंद्रावर जात आहेत. मात्र त्या योजनेसाठी अर्ज करण्याचा सर्व्हर सातत्याने बंद पडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अर्ज अपलोड होत नाहीत. दहा दिवसापासून यवतमाळ जिल्ह्यावर क्लिकंच होत नसल्याने शेतकऱ्यांना बियाणांसाठी अर्ज करण्यासाठी हेलपाटे मारायची वेळ आली आहे.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य कृषी विभागाकडून यंदा शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन पिकांचे बियाणे देण्यात येणार आहे. त्यासाठी पूर्वीसारखे लॉटरी पद्धतीने आता



बियाणे मिळणार नाही तर ते बियाणे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या नियमानुसार देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी पहिल्यांदा नोंदणी कशी होईल, यासाठी ते धडपडत आहेत. तारखेचे मर्याद हटवली ऑनलाइन प्रक्रियेत किमान ३ हजार २०० शेतकऱ्यांपेक्षा अधिक अर्ज दाखल होणे अपेक्षीत होते.

प्रत्यक्षात प्रारंभी १३० अर्ज आले. नंतर केवळ दोन अर्ज असे १३२ अर्ज आल्याने तारखेची मर्यादा काढण्यात आली आहे. शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. एका शेतकऱ्याला तीन बॅग एका शेतकऱ्याला एका हेक्टरसाठी तीन बियाण्यांच्या बॅग दिल्या जाणार आहे. सोयाबीनच्या एका बॅगमध्ये ३० किलोचे बियाणे पॅक करण्यात आले आहे. यानुसार एका शेतकऱ्याला २० किलोपर्यंत बियाणे तीन बॅगमधून उपलब्ध होणार आहे.

त्या दृष्टीने कृषी विभागाने संपूर्ण नियोजन केले आहे. पेरणी पूर्वी हे बियाणे शेतकऱ्यांच्या घरात पोहचणे अपेक्षीत होते. यासाठी प्रारंभी ३० मे आणि नंतर ५ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली. या कालावधीत १३० अर्ज ऑनलाइन पद्धतीने दाखल झाले आहे. अद्यापही शेकडो शेतकऱ्यांना या प्रक्रियेत स्वतःचा सहभाग नोंदविता आला नाही. यातून शेतकरी संकटात सापडले आहेत. तारीख वाढल्याने हे संकट दूर होईल.

# ‘प्रहार’कडून शासनाची तिरडी काढत पिंडदान आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड , दि. १३ :

माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह संबंधीत १७ मागण्यांसाठी मोझरी येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन देण्यासाठी उमरखेड येथे शहर प्रमुख राहुल मोहितवार व युवा उपजिल्हाप्रमुख अभिजीत गंधेवार यांचा नेतृत्वात सरकार विरोधात रोष व्यक्त करत सरकारची अंत्ययात्रा काढून सरकारचे पिंडदान आंदोलन करत समर्थन केले. शासन प्रशासनाच्या कारभारामुळे दुर्लक्षीतपणामुळे जणू काय सरकार नाहीये यादृष्टीतून सरकार उपोषणाची दखल अद्यापही घेत नाही किंवा शासनाचा कुठलाही प्रतिनिधी मंडपात येऊन भेट देत नाही. या सरकारची तिरडी काढत त्यांचे आज पिंडदान सुद्धा प्रहार कार्यकर्त्यांकडून करण्यात आले. मोझरी येथे सुरू असलेल्या बच्चू कडू यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन जाहीर केले. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी. दिव्यांग व विधवा महिलांना ६००० रुपये मानधन. हमीभावावर २० टक्के अनुदान. ७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताप्रमाणे शासन निर्णय काढण्यात यावे. तरुणांच्या हाताला काम व योग्य दाम देण्यात यावे. रोजगार भरती करण्यात यावी. शेतकऱ्याप्रमाणे शेतमजुरांना सुद्धा आर्थिक सहाय्य देण्यात यावे. शेतमजुरांकरीता स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात यावे. शहराप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा घरकुलाला ५ लाख अनुदान देण्यात यावे. मेंढपाळ, मच्छीमार, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या अशा एकूण १७ मागण्यांचे समर्थन करण्याकरिता उमरखेड येथे शहर प्रमुख राहुल मोहितवार व युवा उपजिल्हाप्रमुख अभिजित गंधेवार यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आंदोलन केले. अंत्ययात्रा संजय गांधी चौक उमरखेड येथील निघून उपविभागीय कार्यालय उमरखेड या ठिकाणी येऊन थांबत ठिकाणी पिंड दान करण्यात आले. या आंदोलनाला प्रहार जनशक्ती पक्षाची शहर प्रमुख राहुल मोहितवार, युवा उपजिल्हाप्रमुख अभिजीत गंदेवार, विधानसभा प्रमुख बंडू हमंद, सय्यद माजीद, प्रदीप आडे, संजय गोदमले, नारायण भवर, गोपाल झाडे, श्याम चेके, बालाजी माने, प्रेम रुडे, प्रवीण इंगळे, संजय चेके, रघुनाथ खंदारे, भास्कर गंजेवाड, केतन वानखेडे, जनार्दन सुरोशे, संजय कुबडे ,ज्ञानेश्वर खंदारे, कैलास शिंदे, भीमराव वरुडे ,गजानन कदम, दशरथ पाटील, मनोज कुमार ,शिवाजी कलाने ,संतोष बडेराव ,प्रशांत सूर्यवंशी, बाळू जोगदंड ,दत्ता पवळे, जनार्दन साठे, शेख अली, इरफान आधी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते, दिव्यांग बांधव ,शेतकरी, निराधार महिला मोठ्या संख्येने सदर आंदोलनात उपस्थित होते.

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e – tenders in B – 1 form / appropriate form for the following works. These e – tenders can be purchased from Website (https://Mahatenders.gov.in). The terms and conditions of e – tenders are available on above website. Purchase and submission of e – tenders can be done through internet.

| Name of the Work | Project Cost(in Rs.) |
|---|---|
| Providing & erecting streetlight poles at various locations at surendra nagar near Dr. Dangre clinic lane, near Chandra kirana store gayatri ladies corner in prabhag no. 16 zone no.01 | 12,68,117/- |

**Note - 1)** Tender Submission end date : 20-06-2025 ( up to 3:00 PM ).
**2)** Date of Opening of Tender (If Possible) : 23-06-2025( at 04:00 PM )
Rates are exclusive of G.S.T.

**Advt No. 183 PR Date 13.06.2025**

**Executive Engineer (Electrical)**
**N.M.C. Nagpur**

P/N/25/183

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Online tender is invited in two bids as detailed below.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | EMD / Est. Value In Rs. | Sale Period / Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | T-05 / 3000058624/ 2025-26 | Name of Work :- Koradi TPS 3x660 MW Expansion Project- Annual maintenance of office shed building of Executive Director (Project)-II, Chief Engineer (Civil)-II and Civil Circle at 3x660 MW TPS Expansion Project, Koradi. | EMD Rs. 9,950.00 / ---------------- Rs. 9,92,084.04 | 14.06.2025 T0 28.06.2025 upto 17.30 hrs. / 30.06.2025 upto 12.00 hrs. |

*E-Tender Cost will be Rs.1180/-*
1. *For further details pertaining to the above tender is available on website www.eprocurement.mahagenco.in*
2. *Any amendment to this notice and or notification of amendment in bidding document shall be notified on website www.eprocurement.mahagenco.in only. Potential bidders are requested to take note of the same.*
3. *Agencies are requested to register themselves for E-Tenders.*

**Note : Vendors are advised to submit the bids well in advance of last date of submission. The E-Tender sale date and submission date will not be extended in any case.**

**Dy. Chief Engineer (Civil),**
**Civil Construction Circle,**
**M.S.P.G.C.L., KORADI.**

**NAGPUR METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY**
Station Road, Kingsway, Sadar, Nagpur-440001.

**e-TENDER NOTICE No. 06/2025-26**
www.mahatenders.gov.in

Sealed Percentage rate/Item rate e-tenders are invited from Non-Registered /Registered Contractors with N.M.R.D.A./ N.I.T. /P.W.D. / N.M.C. or other Govt. Dept. as per eligibility criteria for **Two** development works. The details of works will be uploaded on tender website i.e. www.mahatenders.gov.in


| Sr. No. | Name of Work | Amount of work / E.M.D. in Rs. | Eligibility/Tender cost in Rs. | Time Limit in Months | Division |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of WBM road from Kh. No. 109, 93 to Kh. 51, 62 Mouza – Kharsoli. | 1,15,02,364.19 / 1,16,000/- | IV & Above / 3500/- | 10 | South |
| 2 | Construction of Darshan Bari, Selfie Point and Cow Shed in the premises of Shri. Mahalaxmi Jagdamba Sansthan Koradi Taluka Kamptee District Nagpur (Under DPDC Fund). | 2,17,55,682.00 / 1,50,000/- | As per Tender Document / 5500/- | 10 | Project |

**Money :-** E.M.D. is to be paid by online only. **Plans & Estimates :-** Available in the Technical Section, Head Office, Sadar, Nagpur. **Tender Forms :-** From **02.00 P.M.** on Date **16.06.2025** up to 2.00 P.M. on Date **23.06.2025** on www.mahatenders.gov.in **Receipt / Submission :-** From **02.00 P.M.** on **16.06.2025** up to 2.00 P.M. on Date **23.06.2025** on www.mahatenders.gov.in. **Opening :-** At N.M.R.D.A. office on Date **24.06.2025** at 2.00 P.M. or as decided by N.M.R.D.A.

-sd-
Superintending Engineer,
Nagpur Metropolitan Region Development Authority

Advt. No. : S.E.(NMRDA)/23/2025-26
Dated : 13.06.2025







# विमानातील शेवटची सेल्फी!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

सकाळी सकाळी सर्वजण, आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले विचार घेवून अनेकजण लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फ्लाइट १७१ मध्ये चढले. अनेकांनी सेल्फी काढला, नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास. पण ते कधीच पोहोचले नाहीत. विमान कोसळले. अपवाद वगळता कोणीही वाचले नाही. काही क्षणांत, आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. या विमानातील आई वडील आणि त्यांच्या तीन मुलांनी विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी अवघ्या देशवासीयांना दु:ख देऊन गेली. त्यांनी घेतलेला आनंद त्यांच्या पाच जणांच्या सुखी परिवारावर कधी दु:खाचा डोंगर घेऊन आला, त्यांनाही समजले नसावे. कारण पुढील काही मिनिटातचं होत्याचं नव्हतं झालं होतं. शेवटी नियतीला आपण आव्हान करू शकत नाही, नियती श्रेष्ठ आहे. कारण आयुष्य क्षणभंगुर आहे. लंडनच्या दिशेने निघालेले विमान धावपट्टीवर सरकत होतं. खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेली माणसं कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं, पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती, "पोहोचल्यावर फोन करतो.. वाट पाहू नकोस." कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला शेवटचा फोटो पाठवला. कुणी ऑफिसच्या ग्रुपवर “Take off ??” असा मेसेज टाकला.. आणि कुणीतरी मनातल्या मनात एक प्रार्थना केली "सगळं नीट होऊ दे." पण त्या क्षणात, काळाने आपली योजना आखली होती.? एक मोठा आवाज, आगीचे ज्वाळा आणि एका क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळं सगळं जागेवर होतं फक्त माणसं नव्हती. उरली फक्त धूर, राख, आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर. अनेकांनी पाठविलेले त्या फोनवरचे शेवटचे मेसेज अजूनही वाचले गेले नाहीत. "Call me when you land..." "Miss you already..."Take care..."? कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं, कुठे फोन कट झाल्यावर अजूनही “Hello… Hello?” म्हणणारा कोणी तरी. कोणीच ठरवत नाही की शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल, शेवटचा शब्द कोणता असेल. आज जे गेले, त्यांच्या हसण्याच्या प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहेत. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगतं, "आयुष्य क्षणभंगुर आहे". माणसाचे जीवन कधी कुठे जाईल याचा भरोसा नसतो. साधे उदाहरण घेवू या. रमेश विश्वास कुमार एक भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत, जे अहमदाबाद विमान अपघातातून वाचले. ते सीट क्र.11अ मध्ये बसले होते. त्यांनी सांगितले की, विमान उड्डाणानंतर 30 सेकंदात पडताना त्यांनी स्वत: पाहिले. त्यांच्या आजूबाजूला अनेक मृतदेह होते, अशा अवस्थेत ते स्वत: चालत एम्ब्युलन्सकडे पोहोचले. ते भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत. ते वीस वर्षांपासून लंडनमध्ये राहतात आणि त्यांची पत्नी आणि मुलगा देखील तेथेच राहतात. रमेश विश्वास कुमार या घटनेतून वाचले, हे एक आश्चर्यकारक आणि भावनिक सत्य आहे. तर दुसरीकडे अहमदाबाद विमान अपघातात राजस्थानच्या संपूर्ण जोशी कुटुंबाला आपला जीव गमवावा लागला आहे. प्रदीप जोशी ही व्यक्ती सहा महिन्या पूर्वीच लंडनला शिफ्ट झाली होती. त्याची पत्नी कोमी व्यास हिला उदयपूरला चांगला जॉब होता. परंतु मुलांसाठी तिने लंडनला पती सोबत शिफ्ट होण्याचा निर्णय घेतला. या दोघांना एक मुलगी व दोन जुळे मुले होते. लंडनला निघण्यापूर्वी त्यांनी एक सेल्फी देखील काढली. परंतु हीच सेल्फी शेवटची ठरली.

विमानात बसलेल्या 242 प्रवासी आणि 12 क्रू मेंबर्स यांनी दुपारी 1:38 वाजता टेकऑफ केले आणि पाच मिनिटांतच अपघात झाला. अपघातानंतर विमानाला आग लागली आणि घटनास्थळावरून दाट काळा धूर निघाला. सोशल मीडियावर त्याचे व्हिडीओ आणि फोटो व्हायरल झाले.

विमानाच्या टेलचा भाग तुटल्याने हा अपघात झाला असावा, पण याबाबत अधिकृत पुष्टी बाकी आहे. सात फायर टेंडर्स आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्यावर बचाव कार्य सतत सुरू झाले होते. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांचाही या अपघातात मृत्यू झाला. या विमान दुर्घटनेतील व्हिडिओ समोर आले अन् अनेकांच्या काळजाचे ठोके चुकले.

242 प्रवाशांसह अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन लंडनसाठी उड्डाण घेतलेलं विमान अवघ्या सात मिनिटांत खाली कोसळलं. विमान दुर्घटनेचे वृत्त समोर येताच विमानातील प्रवाशांसाठी प्रार्थना होऊ लागल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने व बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीला सुरुवात केली. मात्र, दुर्घटनेचा व्हिडिओ पाहून मनात जी शंका न राहून होती होती, अखेर तेच घडलं.

विमानातील 242 प्रवाशांपैकी एकजण वगळता सर्वांचाच या दुर्घटनेत मृत्यू झाला. एअर इंडियाच्या दुर्घटनाग्रस्त विमानातील एकूण 242 प्रवाशांमध्ये 169 भारतीय प्रवासी, 53 ब्रिटीश नागरिक, पोतुर्गालचे सात आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत होते. दुर्घटनेनंतर विमानातील प्रवाशांच्या नातेवाईकांनी घटनास्थळावर धाव घेतली. जवळील रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळत आहे.

या दुर्घटनेनं अवघा देश शोकसागरात बुडाला आहे. विशेष म्हणजे विमानाचा अपघात इतका भयंकर होता की, अहमदाबादच्या बी.जे. मेडिकल कॉलेजच्या इमारतीवर हे विमान कोसळलं. तेथील हॉस्टेलवर जेवण करणाऱ्या भावी डॉक्टरांना भरल्या ताटावरुन उठवण्याचं काम ह्या दुर्घटनेनं केलं. विमानामध्ये चढणाऱ्या माणसांच्या हातात विमानाचे तिकीट असतं. पण परतीचं आयुष्य हातात नसतं. नोकरी व्यवसाय करणाऱ्या अनेकांच्या जीवनात वेगवेगळे प्रसंग असतात. कोणीतरी पावसात भिजत ऑफिसला जातं, कोणीतरी बुटाच्या आत भिजलेले पाय घेऊन रोज अनेक वाहने बदलतो. कोणीतरी रात्री उशिरा घरी पोहचतो, पण सकाळी मात्र वेळेआधीच कामाच्या दिशेने पळायला लागतो. हे सर्व कुठल्यातरी "स्वप्नासाठी" चाललेले असतं. स्वतःचं नव्हे घरच्यांचं.

विशेषतः आपल्या बाळांचं, आपल्या बायकोचं, आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांचं! आता जे अपघातात गेले, ते फक्त प्रवासी नव्हते, ते कोणाचे बाबा होते, कोणाचा जीवनसाथी, कोणाचा मुलगा, कोणाचे भाऊ, बहीण होते. त्यांनी त्या दिवशीही नेहमीसारखंच विमानामध्ये चढायचं ठरवलं असेल, विमानात बसतांना मनात काही विचार असतील "आज लंडनला पोहोचताच आई बाबांशी चर्चा करायची आहे.. आज लेकासाठी काही खरेदी करायची आहे..." "आज बायकोला म्हटलंय वेळेवर पोहोचतोय "पण नियतीनं त्यांच्या तिकीटावर फक्त 'एक मार्गचं' लिहून ठेवला होता.

त्या विमानात प्रवास करणाऱ्या प्रत्येक माणसामागे एक घर असतं... एक स्वप्न असतं.... एक जबाबदारी असते. तो प्रवासी विमानातून पडतो, तेव्हा केवळ एक देह संपत नाही, तर एका घरातील उजेड संपतो, एका बाळाच्या डोळ्यातून बापाचा चेहरा हरवतो, आईची माया हरपते, घरचा कर्ता मुलगा जातो..

विचार करा की, किती बापांच्या खिशात जीवन जगण्याइतकं भांडवल असेल? कितीजण कामाची यादी उराशी घेऊन चालले होते? किती जणांना घरातल्या आजारी आईच्या औषधांची आठवण होती?

आपण अपघाताची बातमी पाहून दोन मिनिटांनी आपापल्या कामात व्यस्त होतो. पण ज्या घराने आपला माणूस गमावला असतो, त्यांचं आयुष्य पुढे स्टॉप होतं. एकाएकी त्या घरात जेवण जरी शिजलं तरी भूक राहत नाही... बाळाला बाबाच्या खांद्यावर बसायचं असतं, पण आता फोटोवर हार टांगून 'बाबा कुठे गेले?' असा निरागस प्रश्न तो विचारतो...

आज एकदा मनाशी विचार करा जे गेले, ते गेलंच.... पण आपल्या भोवती अशा हजारो लोकांना संघर्ष करावाच लागतो. जे दररोज घराच्या सुखासाठी, फुलपाखरांसारख्या बाळाच्या हसण्यासाठी, आईच्या औषधासाठी आणि बायकोच्या स्वप्नांसाठी आपलं सर्वस्व देत चालले होते. त्या प्रत्येक माणसात एक 'बाप' एक 'मुलगा' आहे, एक कमावता हात आहे, एक 'स्वप्नांचा रक्षक' आहे.

■ ■ ■

### राज ठाकरेंनी घेतलेले काही आक्षेप

बोईंगच्या 'ड्रीमलाईनर' विमानाबद्दल खूप तक्रारी होत्या. २०१३ ला पहिल्यांदा जपान एअरलाईन्सच्या विमानाला आग लागली होती. त्यानंतर या विमानाबद्दल अनेक तक्रारी येतच होत्या. त्या इतक्या होत्या की २०२० ते २०२३ या काळात अनेकदा या विमानांच उड्डाण थांबवलं गेलं होतं. जानेवारी २०१३ ला तर अमेरिकेपासून युरोपपर्यंत जवळपास सगळ्या मोठ्या विमान प्राधिकरणांनी जवळपास ३ महिने बोईंग ड्रीमलाईनरचं उड्डाण खंडित केलं होतं. २०१३ ला भारतात डीजीसीएने देखील काही काळासाठी या विमानाचं उड्डाण खंडित केलं होतं. जर ड्रीमलाईनर बद्दल इतक्या तक्रारी आहेत हे माहित असून सुद्धा आपण ही विमानं का वापरू देत होतो ? डीजीसीएने यावर कधीच कोणती कारवाई का नाही केली ? हे विमान २८ जानेवारी २०१४ ला एअर इंडियाच्या सेवेत आलं. थोडक्यात जगभरात जेंव्हा ड्रीमलाईनरबद्दल तक्रारी होत्या त्याच दरम्यान आपण हे विमान ताफ्यात आणलं. ड्रीमलाईनरची सेवा २०२० ते २०२३ च्या काळात अनेकदा जगभरात तांत्रिक कारणांमुळे खंडित झाल्याचा इतिहास असताना, एअर इंडियापासून अनेक विमान कंपन्यांनी ४० हुन अधिक ड्रीमलायनर विमानांची ऑर्डर दिली आणि या सगळ्याला सरकारने परवानगी का दिली? डीजीसीएने इतका पण विचार का नाही केला? ड्रीमलाईनर्स जर मृत्यूचा सापळा बनणार असतील तर कुठलाही दबाव न सहन करता याची सेवा खंडित करावी आणि आधीची ऑर्डर रद्द केली पाहीजे. याविषयी न्यूयॉर्क टाइम्स, वॉलस्ट्रीट जर्नल, अल-जझीरा यामध्ये छापून आलं आहे. अल-जझीराने तर ड्रीमलायनरबद्दल एक डॉक्युमेंट्री पण केली आहे.

### मृत्यूला कवटाळतांनाची स्थितप्रज्ञता

पायलट सुमित सभरवाल यांची त्यांना मिळालेल्या ४० सेकंदातली समय सूचकता दाखविली, अशी माहीती हाती आली आहे. संकटाच्या काळात, एखादा महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या स्थितीत कधीच गडबडून न जाता मन स्थिर ठेवत स्थितप्रज्ञ, याचा अर्थ आजूबाजूच्या परिस्थितीचा आपल्या मनस्थितीवर कुठलाही एका टोकाचा परिणाम होऊ न देता मन मध्यबिंदूवर स्थिर करत आपण परिस्थितीशी मुकाबला केला पाहिजे व उद्भवलेल्या समस्येवर आलेल्या संकटावर उत्तमातला उत्तम पर्याय, सोल्युशन आउटपुट काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजेच आपण विचलित न होता स्थितप्रज्ञ अवस्थेत गेले पाहीजे. या दुर्घटनेतील मुंबई येथील पवईचे निवासी असलेले पायलट सुमित सभरवाल यांना जेव्हा लक्षात आलं की, आता विमान उंचीवर नेणे अशक्य आहे आणि 304 किमी प्रति तासाच्या वेगाने ते जमिनीकडे झेपावत आहे केवळ 600 ते 900 फुटाचे अंतर जमिनीशी विमानाच्या टकरावण्याचं बाकी असताना त्यांनी आजूबाजूला नजर फिरवत जिथे कमीत कमी डॅमेज होईल अशा ठिकाणी ते विमान वळवलं तिथे ते विमान पडलं. जर का पायलट सुमित सभरवाल घाबरून जाऊ हडबडाहट मध्ये या विमानालाला कुठेही, कसेही पडू दिलं असतं तर 25 हजार अशा अतिशय दाट लोक वस्तीवर हे विमान कोसळलं असतं मृत्यूचा आकडा भयानक राहिला असता.

● हेमंत (राजू) बिन्हाडे

# सर्वोत्कृष्ट लोककलावंत प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे

मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांना,आज दिनांक १४ जून २०२५ रोजी अखिल भारतीय नाट्य परिषदेचा , अत्यंत प्रतिष्ठित असा "सर्वोत्कृष्ट लोककलावंत" हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. या निमित्ताने त्यांच्या जीवनाचा आणि कलेचा घेतलेला हा वेध.

---

देवेंद्र भुजबळ
९८६९४८४८००.

---



बऱ्याचशा व्यक्ती एखाद्या विशिष्ट पदावर पोहोचल्या की,आपल्यातील कला जाहीरपणे सादर करण्यास कचरतात. कारण त्यांना बहुधा असे वाटत असावे की,मी आता कलाकारापेक्षा वरच्या श्रेणीत आलो आहे,त्यामुळे कला सादर करण्याची त्यांना लाज वाटत असावी. इथे मी संचालक राहिलेल्या आमच्या माहिती खात्याचेही उदाहरण देता येईल. पूर्वाश्रमीचे पत्रकार राहिलेले बरेच जण "अधिकारी" झाले की, त्यांना बातम्या, लेख लिहिणे हे जणू कमीपणाचे काम वाटते. तर दूरचित्रवाणी वाहिन्यांतून अनुभव घेऊन आलेल्यांना, ते वाहिनीत जे काम करायचे ते म्हणजे वृत्त चित्रकथा तयार करण्याचे, तर ते काम करण्याची त्यांची "अधिकारी " झाले की इच्छाच रहात नाही! खरं म्हणजे, त्यांच्या अनुभवांमुळे, गुणवत्तेमुळेच त्यांची निवड करण्यात आलेली असते आणि तसेच काम ते माहिती खात्यात आले की,अजून जोमाने करतील, अशी अपेक्षा असते.पण ते बऱ्याचदा होताना दिसत नाही.

म्हणूनच अशा या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख प्रा डॉ गणेश चंदनशिवे हे विद्यापीठाच्या पारंपरिक प्राध्यापकाच्या प्रतिमेला छेद देत सतत स्वतःची कला सादर करण्याबरोबर ईतर लोक कलावतांना पुढे आणण्यात, त्यांना मदत करण्यात नेहमी पुढे असतात,ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद येथे ५ जुलै १९७७ रोजी एका शेतकरी कुटुंबात गणेश चंदनशिवें यांचा जन्म झाला. जाफराबाद येथीलच सिद्धार्थ महाविद्यालयातुन ते बी ए झाले. त्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून नाट्यशास्त्र पदवी प्राप्त केली.

त्यांचा ऐच्छिक विषय होता लोककला साहित्य. तर लोक रंगभूमीवरील तमाशा सादरीकरणाचं बदलतं स्वरूपः एक चिकित्सक अभ्यास या विषयावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून त्यांनी पीएचडी मिळवली. त्यानंतर एम जे कॉलेज, जळगाव येथे नाट्यशास्त्र विभागात त्यांची २००३ साली हंगामी सहाय्यक प्राध्यापक पदी तर पुढच्या वर्षी के. एस. के. महाविद्यालय, बीड येथे नाट्यशास्त्र विभागात हंगामी सहाय्यक प्राध्यापक पदी नियुक्ती झाली. ते जानेवारी २००६ पासून मुंबई विद्यापीठ लोककला अकादमीत सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. यथावकाश ते विभाग प्रमुखही झाले.

गणेश चंदनशिवें यांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर अनेक शोध प्रबंध सादर केले आहेत. विविध कार्यशाळेत भाग घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व तमाशा रंगभूमी वाटचाल : एक चिकित्सक अभ्यास हा संशोधन प्रकल्प त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केला.

भारत सरकारच्या नागपूर येथील दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्रात तमाशा वगनाट्य हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला. २००८ साली झालेल्या अखिल भारतीय लोककला संमेलनात संत साहित्यात महिलांचे योगदान राज्यस्तरीय संशोधन परिषद, दयानंद महाविद्यालय, लातूर येथे लोककलेचे अंतरंग हा शोधनिबंध, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध, ऑगस्ट २०१२ मध्ये अखिल भारतीय महिला लोककला संमेलनात लोककलेत महिलांचे योगदान हा शोध निबंध, एस पी विद्यापीठ, गुजरात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात भारतीय लोकनाट्य या विषयात शोधनिबंध, २०१४ साली गुजराती लोक साहित्य विभाग यांनी एन.एस. पटेल आर्ट्स कॉलेज आनंद गुजरात येथे आयोजित केलेल्या भारतीय लोकसाहित्य परिषदेत शोधनिबंध, आय.आय. ए .एस. सिमला आयोजित मिथक एक अनुशीलन या विषयावर राष्ट्रीय शोधनिबंध, जून २०१६ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत शोध निबंध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेत फंडामेंटल हुक आर्ट्स या विषयावर शोध निबंध, ऑक्सफोर्ड विद्यापीठ, लंडन येथे २०१६ साली लोककलेच्या माध्यमातून आदिवासी जनजाती शिक्षणाचे महत्त्व या विषयावर शोधनिबंध, त्याच वर्षी एन. आय. एस. एस. आणि लोक साहित्य संशोधन केंद्र, भारत सरकार आयोजित आंतरशाखीय संस्कृती संशोधन परिषदेत शोधनिबंध, जानेवारी २०१८ मध्ये तमाशा-एक रांगडा खेळ डिंपल प्रकाशन, मुंबई प्रकाशित हा संशोधनपर ग्रंथ, संगीत नाटक अकादमी, या शिवाय नवी दिल्ली आयोजित भक्ती समर्पण राष्ट्रीय परिषदेतही त्यांनी शोधनिबंध सादर केला आहे.

आदिवासी रंग महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय परिषदेत आदिवासी समाजाचे वर्तमान या विषयावर २०१८ मध्ये शोध निबंध असं त्यांचं सातत्याने संशोधन कार्य सुरू आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील गावांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी कानडी मराठी मध्ये तमाशा सादर केला.

राजस्थान इंटरनॅशनल सेंटर मध्ये नुकताच त्यांनी तमाशा सादर केला . या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलेले राजस्थान चे महामहिम राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. लवकरच "महाराष्ट्राची लोककला " सातसमुद्रापलीकडे, अमेरिकेत पोहोचविण्यासाठी आघाडीचे गायक शंकर महादेवन यांच्या समवेत डॉ. चंदनशिवे यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. त्याबद्दल सर्व लोक कलावंत आणि विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

स्वतः खरेखुरे लोक कलावंत असलेले प्रा डॉ चंदनशिवे यांनी केवळ स्वतःची कला, व्याख्याने,कार्यशाळा यातूनच लोक कलावंत घडावेत यासाठी स्वतःला मर्यादित ठेवले नसून लोक कलावंत घडावेत,ते उभे रहावेत यासाठी ते हर प्रकारे झटत असतात.

कोरोनाच्या भयंकर काळात लोकांसमोर आपली कला पेश करणाऱ्या कलावंत मंडळींना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावं लागत होते. अशा कठीण परिस्थितीत त्यांना केवळ धीर देण्याचंच काम न करता वेळ प्रसंगी स्वतः पदरमोड करून त्यांनी अनेक लोक कलावंतांना मदत केली आहे, यावरूनच त्यांची या कलावंतांविषयीची तळमळ दिसून येते. त्यांची ही तळमळ बघून तर माझा त्यांच्या विषयीचा आदर शतपटीने वाढला.

चंदनशिवे सर विविध विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर आहेत. मध्य प्रदेशातील हरिसिंग गौर विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विभागाच्या नाट्यशास्त्र विभाग सल्लागार समितीचे सदस्य, बोर्ड ऑफ स्टडीज, लोककला अकादमी मुंबई विद्यापीठ सदस्य, सहाय्यक अधिष्ठाता परफॉर्मिंग अँड फाइन आर्ट्स मुंबई विद्यापीठ, सल्लागार सदस्य, मराठी भाषा समिती महाराष्ट्र शासन सदस्य म्हणून योगदान देत आहेत.

अध्ययन, अध्यापन, संशोधन या बरोबरच चंदनशिवे सरांचा व्यावसायिक सहभाग मोठा आहे. गर्जा महाराष्ट्र माझा हा माहितीपट, ढोलकीच्या तालावर हा ई. टीव्ही वाहिनी वर रियालिटी शो, मराठी जागर देवीचा आयबीएन लोकमत, हसत खेळत सिरीयल, सह्याद्री वाहिनीच्या डीडी १० वर धिना धिन मुलाखत, अनुराग कश्यप दिग्दर्शित हिंदी चित्रपट शैतान मध्ये "पिंट्याची हंडी फुटली" हे गाणे, संजय लीला भंसाली दिग्दर्शित बाजीराव मस्तानी चित्रपटातील गाणे त्यांनी गायले आहे.

बाळकडू, शौर्य, मस्का, बया रुद्र या चित्रपटांसाठी पार्श्वगायन, हृदयनाथ चित्रपटासाठी गोंधळ गीत, शंकर महादेवन यांच्या समवेत अल्बम, झाकीर हुसेन आणि शंकर महादेवन यांच्यासमवेत संगीत मैफल, तोफिक कुरेशी द फॉरेस्ट अल्बम मध्ये सहभाग, तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या उपस्थितीत झालेल्या आठव्या आंतरराष्ट्रीय रंगमंच ऑलम्पिक मध्ये लाल किल्ल्यावर लोककला सादरीकरण, एबीपी माझा वाहिनीच्या माझा कट्टा या सदरात एक तासाची प्रकट मुलाखत, जय महाराष्ट्र वाहिनीवर मुलाखत, अस्सल पाहुणे- इरसाल नमुने या कलर्स मराठी वाहिनीवरील मालिकेत प्रकट मुलाखत, "चला हवा येऊ द्या" या झी मराठी वाहिनीवर महाराष्ट्राची लोककला हा कार्यक्रम, भारत सरकारच्या संस्थेद्वारे संजारी फेस्टिवल मध्ये महाराष्ट्राच्या लोक परंपरेवर सांस्कृतिक कार्यक्रम असा त्यांचा फार मोठा आविष्कार आहे.

विच्छा माझी पुरी करा, गाढवाचे लग्न,तीन पैशाचा तमाशा, जांभूळ आख्यान, खंडोबाचे लगीन, गोष्ट अकलेची, पुढारी पाहिजे, गावची जत्रा पुढारी सतरा या मराठी लोक नाट्यात त्यांचा सहभाग राहिला आहे.

चंदनशिवे सरांनी एआययु द्वारे जबलपूर येथे विनोदी अभिनय या कला प्रकारात सहभाग घेऊन सुवर्णपदक प्राप्त केले आहे. राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत तुळजापूर महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि दिग्दर्शक पुरस्कार, राज्यस्तरीय कंटक सेवाभावी संस्था परभणी, कलारत्न पुरस्कार, राज्यस्तरीय शाहू फुले आंबेडकर जयंती उत्सव समिती जाफराबादतर्फे समाजभूषण पुरस्कार, भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पातळीवरील उस्ताद बिस्मिल्लाह खान युवा पुरस्कार, अखिल भारतीय नाट्य परिषद बोरीवली कलारंग पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे फाउंडेशन पुणे द्वारा कलारत्न पुरस्कार, राज्यस्तरीय बालगंधर्व परिवार पुणे द्वारा लोक गंधर्व पुरस्कार, अण्णाभाऊ साठे संयुक्त जयंती उत्सव समिती कल्याण द्वारा साहित्य रत्न पुरस्कार, एकता कल्चरल फाउंडेशनचा विठ्ठल उमप स्मृति लोकरंग पुरस्कार, यशवंत प्रतिष्ठान, अंबड जालना येथील राज्यस्तरीय यशवंत पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत. आपल्या या नेत्रदीपक वाटचालीचे श्रेय चंदनशिवे सर त्यांचे आईवडील, सर्व गुरुजन, सहकलाकार आणि त्यांच्या पत्नीला देतात.

स्वतः पुरतंच जगण्याच्या आजच्या काळात प्राध्यापक डॉक्टर गणेश चंदनशिवे सर लोक कला, लोक कलाकार यांच्या प्रगतीसाठी झटत आहेत, हे त्यांचं अतिशय महत्त्वाचं योगदान आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.



## रक्तदाब, स्मरणशक्ती तसेच साखर नियंत्रित करण्यास उपयुक्त मसाले

मसाल्यांचे भारताशी शतकानुशतके जुने नाते आहे. शाही जीरा ते दालचिनीपर्यंत, देशात अशा अनेक हर्ब्स किंवा मसाले आहेत जे वर्षानुवर्षे अन्नाची चव द्विगुणित करण्यास मदत करत आहेत. पण तुम्हाला माहिती आहे का की जर आरोग्याची काळजी घेण्यासाठी या मसाल्यांचे सेवन केले तर कमी वेळातच तुम्हाला उत्तम परिणाम मिळू शकतात.

अनेक संशोधनांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की हे काही ठराविक मसाले केवळ आपल्या आतड्यांचे आरोग्य सुधारत नाहीत तर मधुमेह असलेल्या रूग्णासांसाठी त्याच्या शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यापासून ते स्मरणशक्ती वाढवण्यापर्यंत अनेक फायदे प्रदान करतात.

**दालचिनी :** दररोज दालचिनीला आहाराचा भाग बनवले तर ते शरीरातील रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. म्हणूनच, मधुमेहाच्या रुग्णांसाठी ते औषधापेक्षा कमी नाही. ज्यांना मधुमेहापूर्वीची लक्षणे आहेत त्यांनी दररोज अर्धा चमचा दालचिनी पावडर नक्कीच खावी. महिनाभर असे केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहील.

**हळद** ; हळद केवळ आपल्या पदार्थांचा रंगच वाढवत नाही तर त्याचे अँटीसेप्टिक आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचा घटक असतो जो जळजळ कमी करण्यास मदत करतो. दररोज 8 ग्रॅम हळद भाज्यांसोबत किंवा रिकाम्या पोटी पाण्यात मिसळून पिण्याचे अनेक फायदे आहेत.


**अदरक :** असे आढळून आले आहे की ते गर्भधारणेदरम्यान आणि केमोथेरपी दरम्यान मळमळण्याच्या समस्येला कमी करण्यास मदत करते. जर तुम्ही ताजे अदरक वापरत असाल तर ते सोलण्याची गरज नाही.

**लवंग :** हे दातदुखी कमी करण्यास देखील मदत करते. तर लवंग जेल हे 20 टक्के जास्त प्रभावी आहे. लवंगामध्ये आढळणारे युजेनॉल नैसर्गिक वेदनाशामक म्हणून काम करते.

● ● ●

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## रक्तदान

आपले रक्त आले
गरजवंताच्या कामी
तर मिळते त्या
व्यक्तिला जीवदान...

ही उदात्त भावना
असेल मनी तर
स्वयंस्फूर्तीने
केले जाते रक्तदान...

जात पात धर्म पंथ
'रक्त ' भेद करीत नाही
मानवता धर्मच सर्वश्रेष्ठ
हा संदेश आपणास देई!

# इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) नागपूर विभागाने बदामांच्या आरोग्यदायी फायद्यांवर घेतले शैक्षणिक सत्र




**नागपूर, १३ जून :** इंडियन डायटेटिक असोसिएशन (आयडीए) च्या नागपूर विभागाने अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्निया यांच्या सहकार्याने शहरातील हॉटेल सेंटर पॉइंट येथे आहारतज्ज्ञ आणि न्यूट्रिशन प्रोफेशनल्ससाठी एक शैक्षणिक सत्र आयोजित केले. या सत्राचा उद्देश बदामांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि दैनंदिन आहारात बदामांचा समावेश केल्यास मिळणारे आरोग्यदायी फायदे सर्वांपर्यंत पोहोचवणे हा होता.

हे सत्र न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांनी हृदयविकार आणि मेटाबोलिक आरोग्य, स्नायूंना होणारे फायदे आणि रक्तातील साखरेचे नियमन या विषयांवर झालेल्या तीन महत्त्वपूर्ण संशोधनांचा आढावा घेतला. यानंतर झालेल्या पॅनल चर्चेमध्ये श्रीमती शीला कृष्णस्वामी यांच्यासोबत डॉ. कविता गुप्ता (सचिव, आयडीए नागपूर विभाग) आणि डॉ. रेनुका माईंदे (कोषाध्यक्ष, आयडीए नागपूर विभाग) सहभागी झाल्या होत्या. डॉ. कविता बक्षी (संयोजिका, आयडीए नागपूर विभाग) यांनी चर्चा सत्राचे सूत्रसंचालन केले.

या चर्चेसाठी आवश्यक संशोधन अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने प्रायोजित केले होते. या संशोधनामध्ये पाउला आर ट्रूम्बो, जेमी अर्ड, फ्रान्स बेलिस्ले, अॅडम ड्रेवनोव्स्की, जॅक ए गिल्बर्ट, रोनाल्ड क्लेनमन, अनुप मिश्रा, जॉन सिव्हनपिपर, माहा ताहीरी, कॅरोल ई वॉटसन, जेम्स हिल, मार्क कर्न, विश्वनाथन मोहन आणि सुधा वासुदेवन या नामवंत आहारतज्ज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी योगदान दिले. त्यांच्या अभ्यासातून हे निष्पन्न झाले की दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्याने आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.

या कार्यक्रमात श्रीमती शीला कृष्णस्वामी यांनी करंट डेव्हलोपमेंट्स इन न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित झालेल्या तज्ज्ञांच्या अभ्यासांवर आधारित माहिती दिली. त्यानुसार दररोज बदाम खाल्ल्याने एलडीएल (बॅड कोलेस्ट्रॉल) कमी होण्यास मदत होते आणि डायास्टोलिक ब्लड प्रेशर थोडकं कमी होते जे दोन्हीही हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे आणि त्याचा वजनावर कुठलाही वाईट परिणाम होत नाही. विशेषतः प्रीडायबेटिस असलेल्या भारतीयांमध्ये बदाम सेवनामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले राहते.

कृष्णस्वामी म्हणाल्या, दररोज मूठभर बदाम खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. बॅड कोलेस्ट्रॉल कमी होतो, थोडक्यात रक्तदाबही कमी होतो आणि वजन वाढत नाही. काही लोकांचे वजन थोडं कमीही होऊ शकतं आणि त्यांचे ब्लड शुगर लेव्हल चांगले नियंत्रित राहू शकतात. हा आरोग्याची काळजी घेण्याचा एक सोपा आणि चविष्ट मार्ग आहे.



यशस्वी महिला मंडळ तर्फे वटपौर्णिमाचा सण पारंपरिक रीतीने साजरा करण्यातआला. पुरातन चमत्कारी हनुमान मंदिर मधे आठ वर्षा आधी आम्ही एक छोटेसे वडाचे रोपट लावले. आज इतका मोठा वट वृक्ष झाला. विशेष म्हणजे आता महिला वर्ग मोठ्या संख्येने पूजा करायला यायला लागलेत यशस्वी महिला मंडळ नेहमीच असेच संस्कृती जपणारे उपक्रम राबवत राहतात. यशस्वी महिला मंडळ ची अध्यक्ष सौ नीरजा पाटील.

# इसुझू मोटर्स इंडियातर्फे देशभरात आय-केअर मान्सून सर्व्हिस कॅम्पचे आयोजन

**नागपूर, १३ जून :** इसुझूची सेवा आणि ओनरशिपचा अनुभव उत्कृष्ट ठेवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून, इसुझू मोटर्स इंडिया देशभरात इसुझू आय-केअर मान्सून कॅम्पचे आयोजन करणार आहे. इसुझू डी-मॅक्स पिकअप्स आणि एसयूव्ही श्रेणीसाठी असलेल्या या कॅम्पद्वारे, ग्राहकांना आकर्षक लाभ तसेच प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, जेणेकरून देशभरात या पावसाळ्यात विना-अडथळा ड्रायव्हिंगचा अनुभव मिळेल.

इसुझू केअर या उपक्रमाअंतर्गत हा मान्सून कॅम्प १६ ते २१ जून २०२५ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) सर्व इसुझू अधिकृत डीलर सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत ग्राहकांना त्यांच्या वाहनांसाठी खास ऑफर्स आणि फायदे मिळू शकतील.

हा मान्सून कॅम्प देशभरातील सर्व इसुझू अधिकृत सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

यामध्ये पुढील शहरांचा समावेश आहे : अहिल्यानगर, अहमदाबाद, अंबिकापूर, बेंगळुरू, बरेली, बाडमेर, बठिंडा, भांडूप, भोपाळ, भुवनेश्वर, बिकानेर, बिलासपूर, कालिकत, छत्रपती संभाजीनगर, चेन्नई, कोईम्बतूर, दिब्रूगढ, दीमापूर, दुर्गापूर, एर्नाकुलम, गांधीधाम, गोरखपूर, गुरगाव, गुवाहाटी, हिसार, हावडा, हुबळी, हैदराबाद, इंदूर, इटानगर, जयगाव, जयपूर, जालंधर, जम्मू, जोधपूर, कडप्पा, करनाल, खम्मम, कोल्हापूर, कोलकाता, कोट्टायम, कुर्नूल, लेह, लखनऊ, लुधियाना, मदुराई, मंडी, मंगळुरू, मेहसाणा, मोहाली, म्हैसूर, नागपूर, नाशिक, नेल्लूर, नेरुळ, नवी दिल्ली, नोएडा, पाटणा, पुणे, रायपूर, राजमुंद्री, राजकोट, रत्नागिरी, सातारा, शिवमोग्गा, सीकर, सिलिगुडी, सोलापूर, श्रीनगर, सूरत, त्रिशूर, तिरुनेलवेली, तिरुपती, त्रिची, तिरुअनंतपुरम, वडोदरा, विजयवाडा आणि विशाखापट्टणम.

ग्राहकांनी सर्व्हिस बुकिंगसाठी आपल्या जवळच्या इसुझू डीलरशी संपर्क साधवा किंवा https://www.isuzu.in/servicebooking.html या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ग्राहकांनी १८०० ४१९९ १८८ (टोल-फ्री) या क्रमांकावर संपर्क साधावा.

# आईकू ज़ेड१० लाइट ५जी लवकरच लाँच होणार

**नवी दिल्ली, १३ जून :** उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू १८ जून रोजी त्यांचा नवीन फोन आईकू ज़ेड१० लाइट ५जीलाँच करणार आहे. हा फोन विशेषतः विद्यार्थ्यांसाठी आणि सक्रिय जीवनशैली जगणाऱ्या लोकांसाठी डिझाइन केला आहे. आईकू ज़ेड१० लाइट तुमची दैनंदिन कामे सहजपणे हाताळू शकतेमग ती ऑनलाइन वर्गात जाणे, मित्र आणि कुटुंबाशी जोडलेले राहणे, व्हिडिओ पाहणे, रील्स स्क्रोल करणे, प्रवासात गेम खेळणे किंवा एकाच वेळी अनेक अॅप्स वापरणे असो. हे दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि जलद ५जी कनेक्टिव्हिटी देते, ज्यामुळे तुम्ही दिवसभर कोणत्याही व्यत्ययाशिवाय अभ्यास आणि मनोरंजनाचा आनंद घेऊ शकता.

6000mAh क्षमतेच्या मोठ्या बॅटरीने सुसज्ज, ज़ेड१० लाइट ५जी फोनला अवजड न बनवता तुम्हाला जास्त काळ कामगिरी देतो. आईकू ज़ेड१० लाइट हा त्याच्या सेगमेंटमधील सर्वात मोठी बॅटरी असलेला ५जी स्मार्टफोन देखील आहे. वर्गात जाणे असो, असाइनमेंट पूर्ण करणे असो, कंटेंट ब्राउझ करणे असो किंवा मित्रांसोबत संपर्कात राहणे असो - त्याची बॅटरी दिवसभरातील विविध गरजा सहजपणे पूर्ण करू शकते.




हे मीडियाटेक डायमेन्सिटी ६३०० ५जी प्रोसेसरद्वारे समर्थित आहेअत्यंत पॉवर-कार्यक्षम ६एनएम चिपसेट आणि अपग्रेडेड ऑक्टा-कोर आर्किटेक्चरद्वारे समर्थित.आईकू ज़ेड१० लाइट तुम्हाला एक गुळगुळीत आणि लॅग-फ्री मल्टीटास्किंग अनुभव देते.

या डिव्हाइसमध्ये ५० मेगापिक्सेल सोनी एआय मुख्य कॅमेरा आणि २ मेगापिक्सेल दुय्यम लेन्स आहे जो पार्श्वभूमी अस्पष्ट करण्यासाठी वापरला जातो. यात ५ मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा देखील आहे, जो दररोजच्या फोटोग्राफीसाठी वापरता येतो. याशिवाय, फोनमध्ये अनेक एआय आधारित टूल्स आहेत जे फोटो एडिटिंग आणि इतर कामांमध्ये मदत करतात. एआय इरेजसह, तुम्ही फोटोमधून निवडलेल्या वस्तू काढून टाकू शकता,

एआय फोटो एन्हान्स हे चेहरे अधिक स्पष्ट दिसण्यासाठी आणि जुने किंवा अस्पष्ट फोटो सुधारण्यासाठी आहे.

याव्यतिरिक्त, यात एक एआय डॉक्युमेंट मोड देखील आहे जो डॉक्युमेंटच्या फोटोला स्पष्ट आणि वाचनीय डिजिटल कॉपीमध्ये रूपांतरित करू शकतो.

आयपी६४ धूळ आणि पाण्याचे प्रतिरोधक प्रमाणपत्र असलेले, आयक्यूओ झेड१० लाइट दैनंदिन वापरासाठी योग्य आहे. हे दोन रंगांमध्ये लॉन्च होईल: टायटॅनियम ब्लू आणि सायबर ग्रीन.

'मेक इन इंडिया'चे वचन पुढे नेत,आईकू ज़ेड१० लाइटची निर्मिती वीवो च्या ग्रेटर नोएडा येथील सुविधेत केली जाईल. याव्यतिरिक्त, ग्राहकांना चांगली विक्री-पश्चात सेवा प्रदान करण्यासाठी, आईकू ने आता आईकू ग्राहकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये यासाठी देशभरात पसरलेले त्यांचे ६७०+ कंपनीच्या मालकीचे सेवा केंद्र उघडले आहेत.

# जेव्हा स्त्री द्वेष्टा युग आणि उत्साही कैरी यांचा आमनासामना होतो, तेव्हा ठिणग्या तर उडणारच!

**मुंबई, १३ जून :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका सर्वसामान्य रोमँटिक मालिकेसारखी नाही. जेव्हा एका छताखाली दोन अत्यंत भिन्न प्रकृतीच्या व्यक्ती एकत्र येतात, तेव्हा जो गोंधळ माजतो, त्याचे चित्रण या मालिकेत आहे. भेटा, युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) या बुद्धिमान, गंभीर स्वभावाच्या वकीलाला जो आपल्या तीन भावांसोबत दिल्लीत राहतो आणि स्त्रियांविषयी तीव्र तिरस्कार बाळगतो. या तिरस्काराचे कारण एका फसवणुकीत आणि त्याच्या रहस्यमय भूतकाळात आहे. ही कहाणी युग आणि कैरी (आशी सिंह) या दोघांभोवती फिरते. या दोघांमध्ये प्रेम आणि नातेसंबंध यावरून नेहमी मतभेद होत असतात.

आगामी भागांमध्ये, युग सिन्हाची भेट कैरीशी होते. युग सिन्हा एक कडवट स्वभावाचा वकील आहे, जो दयाभावाने नाही, तर खोल रागापोटी महिलांशी संबंधित केसेसमध्ये ५०% सवलत देतो. दुसरीकडे कैरी एक उत्साही तरुणी आहे, आपल्या तीन भावंडांचा सांभाळ करण्याची कसरत करत आहे. जेव्हा घरमालक कैरीला घर खाली करण्याची नोटिस देतो तेव्हा युग सिन्हा कोर्टात ही केस घरमालकाकडून लढतो. पण, त्याच्यासमोर केस जिंकून कैरी सगळ्यांना धक्का देते. अपमान भावनेने पेटलेला, संतप्त युग छोट्या छोट्या मार्गांनी तिचा बदला घेण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे तिच्या



घरचा पाणीपुरवठा बंद करणे आणि त्यानंतर उडालेल्या गोंधळासाठी कैरीला दोष देणे, वगैरे. दंड भरण्यासाठी देखील कैरी कडे पैसे नसल्यामुळे ती आता कोसळण्याचा बेतात असतानाच नशीब पालटते. युगची आई मायारी (सुप्रिया शुक्ला) हिला कैरीमध्ये आपल्या लाडक्या मुलीचे लताचे प्रतिबिंब दिसते आणि ती युगला कैरीला आपल्याच घरात जागा देण्याची गळ घालते.

एका स्त्रीद्वेष्ट्याच्या घरात कैरी कशी पोहोचणार? आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे युग सिन्हा सोबत एका छताखाली ती कशी राहणार?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युग सिन्हाची भूमिका करणारा शब्बीर अहलूवालिया म्हणतो, युग एक गुंतगुंतीची व्यक्तिरेखा आहे. एका कटू भूतकाळामुळे त्याने आपल्या भोवती उंच भिंती उभारल्या आहेत. आणि त्यात कैरीसारखी स्त्री आपल्या घरात राहायला येणार या कल्पनेने तो हादरून जातो. मला या कथानकात हे आवडलं की, यात फक्त संघर्ष दाखवलेला नाही, तर आपल्या मान्यता आणि पूर्वग्रह यांना आव्हान देणे देखील आहे. कैरी सोबतचा प्रवास प्रेक्षकांइतकाच युगसाठी देखील धक्कादायक असणार आहे. भावनांचे चढउतार, शाब्दिक चकमकी आणि जवळ येण्याचे अनपेक्षित क्षण प्रेक्षकांना बघायला मिळतील.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करत असलेली आशी सिंह म्हणते, कैरी एक अशी मुलगी आहे, जी कधी मागे हटत नाही- कितीही कठीण प्रसंग आला तरी. जो उघडउघड स्त्रियांचा द्वेष करतो त्याच्या घरात राहावे लागेल असे तिला कधीच वाटले नव्हते. पण अशाच परिस्थितीत तिची ताकद आणि चिकाटी दिसून येईल. ही गोष्ट मजेदार, भावनिक आणि युग आणि कैरी यांच्यात ठिणग्या उडवणारी असणार आहे. प्रेक्षकांना मजेदार संभाषण, वाढता तणाव आणि काही हृदयस्पर्शी क्षण देखील दिसतील, ज्याच्यामुळे कदाचित सगळेच बदलून जाईल.

# स्टेबल मनी या ऑनलाइन एफडी बुकिंग व्यासपीठाने इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलकेणी यांच्या फंडामेंटम पार्टनरशीपमधून मिळवला १७३ कोटी रुपयांचा निधी

**नागपूर, १२ जून :** स्टेबल मनी या भारतातील पहिल्या डिजिटल फिक्स्ड डिपॉझिट गुंतवणूक व्यासपीठाच्या वेल्थटेक व्यासपीठाने सीरिज बी फंडिंग फेरीत १७३ कोटी रुपयांचा निधी मिळवला आहे. इन्फोसिसचे सहसंस्थापक आणि आधारचे निर्माणकर्ते नंदन निलकेनी सहसंस्थापक असलेल्या फंडामेंटम पार्टनरशीपतर्फे ही फेरी आयोजित करण्यात आली. यात ४७, आरटीपी ग्लोबल आणि लाइटस्पीड अशा आधीपासूनच्या गुंतवणूकदारांसह आदित्य बिर्ला वेंचर्सही सहभागी झाले होते. या व्यासपीठाच्या धोरणांवर आणि दृष्टिकोनावर असलेला विश्वासच यातून प्रतित झाला आहे. स्टेबल मनीच्या मोठ्या सीरिज ए राऊंडनंतर अवघ्या दहा महिन्यांत मिळालेल्या या निधीमुळे स्थिर गतीने होणारी प्रगती आणि गुंतवणूकदारांचा विश्वास दिसून येतो.

स्टेबल मनीतर्फे फिक्स्ड इन्कम इन्व्हेस्टमेंट म्हणजेच निश्चित उत्पन्न गुंतवणूक पर्याय दिले जातात. यात फिक्स्ड डिपॉझिटवर ९.१ टक्क्यांपर्यंत व्याज मिळते, एफडी आणि स्टेबल बाँड्स (स्टेबल ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेड)चे सुरक्षित क्रेडिट कार्ड्स अशा सुविधाही यात आहे. वापरकर्त्यांना २०० हुन अधिक बँकांच्या एफडी व्याजदराची तुलना करता येईल, अवघ्या तीन मिनिटांपेक्षा कमी कालावधीत डिपॉझिट बुक करता येईल, ७ दिवसांची ट्रायल एफडी करता येईल आणि तात्काळ पैसे काढण्याची सोयही मिळवता येईल. शिवाय, हे सगळे करण्यासाठी कोणतेही बचत खाते किंवा सेविंग अकाऊंट असण्याची गरज नाही. २०२२ मध्ये सुरुवात झाल्यापासून स्टेबल मनीने देशभरात २० लाखांहून अधिक वापरकर्ते मिळवले आहेत. शिवाय, त्यांची एकूण असेस अंडर मॅनेजमेंट म्हणजेच व्यवस्थापनाअंतर्गत मालमत्ता ३००० कोटी रु. वर पोहोचली आहे. सुरक्षित आणि अंदाज लावता येईल अशा परताव्यासाठी महाराष्ट्रात २.८ लाखांहून अधिक वापरकर्ते स्टेबल मनीवर विश्वास टाकतात.


फिक्स्ड डिपॉझिट म्हणजेच ठेवी हे भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह वित्तीय उत्पादन आहे. २३ करोड अधिक वापरकर्त्यांकडे सध्या ठेवी आहेत. ही बाजारपेठ वार्षिक १२ टक्के अशा स्थिर गतीने वाढते आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण इतकेच लक्षणीय आहे. ३.७ कोटींहून अधिक एफडी सध्या आहेत. आरबीआयच्या आकडेवारीनुसार ही ठेवींची एकूण रक्कम ३५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. मात्र, तरीही ही परिसंस्था बहुतांश ऑफलाइन आणि अकार्यक्षम आहे. भारतात जवळपास ९४ टक्के ठेवींवर ८ टक्क्यांहून कमी व्याज मिळते. यातून उपलब्धता आणि त्याबद्दलची सजगता यातील दरी अधोरेखित होते आणि स्टेबल मनी हीच दरी भरून काढण्याचा प्रयत्न करत आहे.

या समस्येवरील तोडगा म्हणून, स्टेबल मनी देशातील सर्वाधिक एफडी व्याजदरदेणाऱ्या अनेक आघाडीच्या लघुवित्त बँका, एनबीएफसी आणि इतर अनुसूचित व्यावसायिक बँकांसोबत भागीदारी करत आहे. सर्व ठेवी बचतखाते उघडण्याची आवश्यकता न ठेवता १००% डिजिटल पद्धतीने बुक केल्या जातात आणि रिझर्व्हबँकेची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या डीआयसीजीसीकडून प्रतिबँकप्रति वापरकर्ता छ५लाखांपर्यंत विमा संरक्षण मिळते.

त्याचबरोबर, स्टेबल बॉन्ड्स (स्टेबल ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेडद्वारे संचालित) सादर केल्याने आता गुंतवणूकदारअदानी, मुथूट आणि आयआयएफएल सारख्या आघाडीच्या कंपन्यांकडून सेबी-नियमितअल्प-मुदतीच्या आणि दीर्घकालीन बाँडमध्ये गुंतवणूक करू शकतात. या ठेवींची मर्यादा फक्त १,००० पासूनसुरू होते आणि त्यावर १२% पर्यंतपरतावामिळू शकतो.

स्थिर उत्पन्न गुंतवणुकीच्या मार्गाचे डिजिटायझेशन करून, स्टेबलमनी मुदत ठेवींमधील गुंतवणूकअधिक पारदर्शक आणि सुलभ बनवत आहे.

# शब्दकोडे क्रमांक २१३७




आडवे शब्द :-
१) बोकड
८) संध्याकाळ
११) बारीक केस
१२) कोर्टातील दावा
१३) बाजेला विणण्याची सुती चपटी पट्टी
१५) चांदणी
१६) स्थानिक (इं.)
१७) बाण
१९) देशाचे नाणे
२०) तमाशातील गाण्याचा एक प्रकार
२२) पापीजनांना यमाकडून दिल्या जाणाऱ्या यातना
२४) गोड
२५) ब्राह्मण
२६) अखंड, निरंतर(पावसासंबंधीचा शब्द)
२८) दह्याचे सरसरीत पेय
२९) बांगड्यांचा व्यवसाय करणारा
३१) बैल
३२) पांढरा तीळ, कितीही मिळाले तरी तृप्ती नाही अशा स्वभावाचा
३३) राखून ठेवणे, रिझर्वेशन
३३) छाती
३५) केस कापणे
३७) एक पौराणिक पर्वत
३९) मेंढा, पहिली रास
४२) आई वडील
४४) मोठी नदी
४५) धनुष्यबाण
४८) निमित्त, सबब
५०) अभंगातील तुकाराम
५१) ममता, द्रव्य
५२) एक पालेभाजी
५३) हाताचा तळवा
५४) अथवा, किंवा
५५) मध
५६) मगर, दहावी रास
५८) हद्द
६०) प्रणाम
६१) गवत
६३) समूह, जमाव
६५) परीक्षा घेणारा
६८) फळातील द्रवपदार्थ
७०) बेडूक
७१) नकटे नाक
७३) आईचा भाऊ
७४) कोवळा अंकुर
७५) पात्याची तीक्ष्णता
७६) अरण्य, वन

उभे शब्द :-
१) पराकाष्टेचा लाभ
२) एक बारीक धान्य
४) चकचकीत, स्वच्छ
५) तळे
६) खालच्या दर्जाचा
७) जाडसर पीठ
९) जन्म-मृत्यू
१०) आपले म्हणणे मांडण्यासाठी पत्रकारांची भरलेली बैठक
१४) रचना, मांडणी, सजावटकरणारा
१६) नवनीत
१८) गोसावी, भटक्या
२१) वडाचे झाड
२३) तिबेटमधील एक प्राणी
२६) शक्यता
२७) तृष्णा
३०) लिहिता-वाचता येणे
३३) प्रयत्नावाचून प्राप्त, मोफत
३४) कामासाठी काम झाल्यावर आलेला माणूस
३६) भाजी घालून केलेली पोळी
३८) एक भटकी जमात
३९) विश्वामित्र ऋषींना भुरळ घालणारी अप्सरा
४०) चक्र
४१) निर्णय
४३) स्वर्गातील पूर्वज
४६) चेहऱ्यावरील तेज, कांती
४७) भ्रमर, भुंगा
४९) रक्कम, ठराविक पैसे
५०) रामचरितमानस लिहिणारे हिंदी संत
५२) पायी चालणारा
५३) हात
५५) आपले काम साध्य करण्यासाठी लाडीगोडी करणे(बो.भा.)
५७) केव्हा
५९) आई(ग्रा.)
६२) असुर
६४) पावा
६५) फुलांची टोपली
६६) ललाट
६७) पृथ्वी
६९) जास्तीतजास्त
७२) पंख
७३) कापड विणण्याचे साधन

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेचे शूटिंग सुरू असताना आलेल्या पहिल्या पावसाच्या जादूविषयी सांगत आहे आशी सिंह

**मुंबई, १३ जून :** पहिला पाऊस नेहमी आनंद आणि जुन्या आठवणी घेऊन येतो. आशी सिंह साठी तर यंदाचा पहिला पाऊस जादुई होता. ही गुणी अभिनेत्री सध्या सोनी सबवर नुकत्याच सुरू झालेल्या उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी या धडाडीच्या वकीलाचे पात्र निभावत आहे. गूढ आणि गंभीर दिसणाऱ्या युग (शब्बीर अहलूवालिया) सोबत तिची पडद्यावरची केमिस्ट्री प्रेक्षकांना आत्ताच आवडू लागली आहे.



अलीकडेच आशीने सेटवर असतानाच सीझनच्या पहिल्या पावसाचा अनुभव घेतला- या क्षणामुळे तिचा मूड एकदम इतका मस्त झाला! आणि तो तिच्या व्यक्तिरेखेला देखील साजेसा होता.

त्याविषयी बोलताना आशी म्हणाली, पहिल्या पावसात काही तरी खूप शुद्ध, निर्मळ असे काही तरी असते. असे वाटते की जणू जगाची गती क्षणभर मंदावली आहे. पहिला पाऊस मला नेहमी माझ्या बालपणात घेऊन जातो. ते स्वच्छंद दिवस, पावसात बागडणे, कागदी होड्या पाण्यात सोडणे आणि चिंब भिजल्याबद्दल आईचा ओरडा खाणे! मुंबईच्या पावसात नक्की काहीतरी जादू आहे. सतत घाईगडबडीत असणाऱ्या माझ्यासारख्या मुलीला हे क्षण थोडा विसावा आणि स्वतःशी संवाद साधण्याची संधी देतात.

आशी पुढे म्हणते, यावेळी आम्ही उफ्फ ये लव है मुश्किल ... साठी आउटडोर शूटिंग करत होतो. पावसाचे तुषार येऊ लागले त्यामुळे आम्ही काम थांबवले पण मी त्या पहिल्या पावसात भिजलेच. ओल्या मातीचा सुगंध मला फार आवडतो. पावसात आसपासचे जग जणू क्षणभर थांबून जाते. त्यावेळी मला माझ्या कैरी या व्यक्तिरेखेची आठवण झाली. तिला छोट्या छोट्या गोष्टीत सौंदर्य आणि आनंद शोधण्याची सवय आहे. त्यामुळेच तिची व्यक्तिरेखा विशेष आहे. मला चहा, संगीत आणि ओल्या मातीचा सुगंध हे सगळेच प्रिय आहे. आणि हे सगळे जेव्हा शूटिंगच्या दिवशी जुळून आले, तेव्हा फारच मजा आली. हे असे क्षण असतात, जे तुम्हाला पुन्हा पुन्हा जगावेसे वाटतात.

आज का अंदाज
शनिवार १४ जून २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच
कल्याण बाजार

| 2 | 5 | 8 | 9 |
|---|---|---|---|
| 246 | 690 | 224 | 270 |
| 390 | 500 | 800 | 900 |
| 480 | 780 | 350 | 469 |
| 21 | 51 | 86 | 96 |
| 24 | 54 | 80 | 90 |
| 27 | 57 | 83 | 93 |

१४ जून २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | 42 | 56 | 76 |
| 39 | 49 | 50 | 70 |
| 31 | 41 | 58 | 78 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034

## राशीभविष्य

**मेष :** व्यवसायात संयमाने आणि परिश्रमाने काम करा. तुमच्या व्यवसायात प्रगती आणि उन्नती होईल. आज आरोग्याशी संबंधित कोणत्याही मोठ्या समस्येची शक्यता कमी असेल.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी कनिष्ठ कर्मचाजयांमुळे मतभेद होऊ शकतात. महत्वाच्या कामात अडथळे आल्यामुळे ते पुढे ढकललं जाऊ शकतं. आज तुमचा दिवस संघर्षाने भरलेला असेल.

**मिथुन :** आज तुम्ही मालमत्तेशी संबंधित कामात कठोर परिश्रम केल्यास तुम्हाला यश मिळेल. आईकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. अपेक्षित आर्थिक लाभ न मिळाल्याने खंत वाटेल.

**कर्क :** तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, नियमित व्यायाम करा. काम पूर्ण होण्यात अडथळे येतील. आज आरोग्याची काळजी घ्या. पोट आणि हाडांशी संबंधित आजारांची विशेष काळजी घ्या.

**सिंह :** कोणाच्याही फसवणुकीत अडकू नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने काम करा. सामाजिक कार्यात रस कमी होईल. व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना चढ-उतारांचा सामना करावा लागेल.

**कन्या :** आज तुमची एक जुनी इच्छा पूर्ण होईल. राजकारणात, वरिष्ठ व्यक्तीच्या जवळीकतेचा तुम्हाला फायदा होईल. कामाच्या शोधात आज दूरच्या शहरात जावे लागू शकते.

**तूळ :** नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने कामाच्या ठिकाणी अडचणी कमी होतील. समाजातील उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** आज तुम्हाला मालमत्ता खरेदी-विक्रीशी संबंधित बाबींमध्ये तुमच्या जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळेल. या बाबतीत कोणताही घाईघाईने निर्णय घेऊ नका. आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**धनु :** आज अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला दूरच्या देशात जावे लागू शकते. तुमच्या आयुष्यात असे काही घडू शकते जे तुम्ही कधीही स्वप्नातही पाहिले नसेल.


**मकर :** आज तुम्हाला मस्त बातमी मिळेल. तसेच एखाद्या महत्त्वाच्या कामात यश मिळेल. स्वादिष्ट जेवणाचा योग आहे. तुम्ही लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कुंभ :** आज कुटुंबात काही शुभ कार्यक्रम होतील. आज व्यवसायावर लक्ष केंद्रित करा. अन्यथा, व्यवसायातील अस्थिरतेमुळे तोटा होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे नीट लक्ष द्यावे.

**मीन :** जे कामाच्या शोधात असतील त्यांना रोजगार मिळेल. तुम्हाला शासन आणि सत्तेचा फायदा मिळेल. आजचा दिवस सकारात्मक राहील. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल.

# अकोटमध्ये वाऱ्यासह गारपीट

## लाखपुरीत घरांची पडझड



■ महासागर प्रतिनिधी, अकोला , दि. १३ :

शहरासह जिल्ह्याला दुसऱ्या दिवशीही दुपारी वादळी पावसाने झोडपले. अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. यामुळे अकोट तालुक्यात आंबा, केळी, पपई, लिंबूसह संत्रा भूईसपाट झाला. मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी मंडळात वादळी पावसामुळे घरांची पडझड झाली. काही घरांमध्ये पावसाचे पाणी घुसून अन्न धान्याचे नुकसान झाले तर काही घरांवरील टिनपत्रे उडाले.

पातूर, बाळापूर तालुक्यातही वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. संत्रा आणि लिंबूच्या बागांचे नुकसान झाले आहे. बोरगाव मंजू परिसरात वादळ वाऱ्यासह पाऊस झाला. पिंजर परिसरात वादळी वाऱ्यासह तुरळक पावसाने हजेरी लावली.

दरम्यान, सलग दोन दिवस झालेल्या या नुकसानीचा शासनाने तसेच संबंधित विभागाने सर्वे करुन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावे, अशी मागणी येथील शेतकरी वर्ग करत आहे.

अकोट तालुक्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली, काही ठिकाणी गारपीट झाल्यामुळे फळबाग उत्पादकांचे नुकसान झाले आहे. बुधवार दुपारी चारच्या सुमारास सुसाट वाऱ्यांसह मुसळधार पावसाने विजेच्या कडकडाटासह सुरुवात केली. यात अकोट तालुक्यातील अकोलखेड, पणज, बोर्डी, सुकली, रामापूर, कासोद, शिवपूर परिसरात वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्याने आंबा, केळी, निंबू, संत्रा व मान्सून पूर्व कपाशीचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी विजेचा पुरवठा खंडित झाला होता. पपई, केळीचे झाडे जमीनदोस्त झाले.

बार्शीटाकळीत जोरदार पाऊस बार्शीटाकळीसह परिसरात गुरुवारी दुपारी साडेतीन ते चारच्या सुमारास जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस पडला.

सलग दुसऱ्या दिवशी दुपारी आलेल्या या वादळी पावसामुळे अनेकांची धावपळ झाली. शेतकरी शेताची मशागत करुन पेरणीसाठी सज्ज झाला आहे.

या पावसामुळे त्याला मोठा दिलासा मिळाला आहे. येत्या काही दिवसांत असाच चांगला पाऊस झाला तर शेतकरी पेरणी करतील, अशी शक्यता आहे.

## महानुभाव अध्यासन केंद्राच्यावतीने विचारशलाका तत्त्वज्ञान विशेषांकाचे प्रकाशन १८ ला

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अभ्यास केंद्राच्यावतीने लातूर येथून प्रकाशित होणा-या वैचारिक साहित्यालावाहिलेल्या 'विचारशला का' यानियतकालिकेच्या महानुभाव तत्त्वज्ञान विशेषांकाचे विमोचन १८ जून रोजी दुपारी ४.०० वा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या शुभहस्ते होणार आहे. कुलगुरू कार्यालयात हा विमोचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, लातूर येथून प्रकाशित होणा-या त्रैमासिक विचारशलाकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागराव कुंभार, अतिथी संपादक प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे उपस्थित राहणार आहेत. महानुभाव तत्त्वज्ञानावरआधारितविचारशलाका या तत्त्वज्ञान विशेषांकामुळे अभ्यासक तथा जिज्ञासूंना महत्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे, असे महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर यांनी सांगितले.

# अंधश्रद्धा निर्मूलन ही पुरोगामी विचारांची डोके चालवा चळवळ

## अंनिसचे राज्य प्रधान सचिव विनायक सावळे यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला , दि. १३ :

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ ही पुरोगामी विचारांची डोके चालवा चळवळ असून विवेकाधिष्टीत समाज निर्मितीचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे स्वप्न घेऊन समितीची वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नवनियुक्त राज्य प्रधान सचिव विनायक सावळे यांनी बुधवारी कार्यकर्ता संवाद सभेत केले.



महाअंनिसच्या नव्या व जुन्या कार्यकर्त्यांची संवाद सभा घेऊन समितीचे कामकाजाबाबत यावेळी चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत महाअंनिसचे राज्य सरचिटणीस गजेंद्र सुरकार होते. प्रारंभी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. संजय तिडके यांनी पुष्पगुच्छ व ग्रामगीता देऊन विनायक सावळे यांचे तर पंजाबराव वर यांनी गजेंद्र सुरकार यांचे स्वागत केले. प्रास्ताविकात प्रा. तिडके यांनी जिल्ह्यातील अंनिसच्या कार्याची माहिती व शाखा स्थिती अहवाल सादर केला. गजेंद्र सुरकार यांनी संघटनात्मक बांधणी बाबत मार्गदर्शन केले.

रोहन बुंदेले यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. प्रवीण वाघमारे यांनी आभार मानले. यावेळी प्रशांत नागे, प्रा. पुंडलिक भामोदे, आकाश हेरोळे, शारदा वानरे, देवकन्या चोपडे, पायल वानरे आदी उपस्थित होते.

# कर्मयोगी संत रुपलाल महाराज पालखीचे दानापूर येथे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी, दानापूर , दि. १३ :



वटसावित्री पौर्णिमेला संत परंपरेतील कर्मयोगी श्री संत रुपलाल महाराज यांची पालखी वारी भक्तिभावात दानापूर येथे दाखल झाली. पालखीच्या आगमनानिमित्त ग्रामस्थांनी रांगोळी, पुष्पवृष्टी आणि पूजनाने स्वागत केले. वारीची सुरुवात अंजनगाव सुर्जी येथील विठ्ठल मंदिर मठातून झाली होती. पायी दिंडी अकोट, हिवरखेड, सौंदळा मार्गे दानापूर येथे पोहोचली. 'वारी चुकू न दे, हरी पंढरीची!' या घोषवाक्याने निनादत शेकडो वारकरी सहभागी झाले होते. पालखी आगमनानंतर संत रुपलाल महाराज चौकात (नवापुरा), दिंडीचा सायंकाळी मुक्काम होता. रात्री हरिकीर्तन व पालखी दिंडीकरता महाप्रसादाचा कार्यक्रम असतो. वारकरी व भाविक भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतात. संत रुपलाल महाराज जेव्हा पंढरपूर वारी करून परतीच्या वेळी दानापूर येत होते, तेव्हा येथील नागवेली मंडळाजवळ सात दिवस मुक्काम करायचे. दिवसभर ग्रामस्वच्छता व माधुकरी मागून भोजन करायचे. रात्री कीर्तनातून गावकऱ्यांना खरी ईश्वर भक्ती, समाजकार्य, समाजसेवा आदी बाबतीत आपल्या कीर्तनातून उपदेश करायचे. संत रुपलाल महाराज हे कर्मयोगी संत गाडगेबाबांचे परमशिष्य होते. पहूर ता. जामनेर येथील पानवेलीच्या मळ्यात गाडगेबाबांनी त्यांना समाजसेवेचा आदेश दिला आणि तेव्हापासूनच ईश्वरभक्ती व समाज प्रबोधनाचा प्रवास सुरू झाला. दानापूर हे त्यांच्या समाज प्रबोधनाच्या कार्याचे महत्त्वाचे केंद्र राहिले. दिंडीच्या मार्गावर विविध ठिकाणी भाविकांनी चहा, शरबत, नाश्ता व फराळ यांची उत्तम व्यवस्था केली होती. मुक्कामस्थळी भोजन व्यवस्था, तर प्रस्थानावेळी रांगोळी, पुष्पवृष्टी व भजनाच्या जयघोषात दिंडीचा पुढील प्रवास वडगाव वान मार्गे सुरू झाला. गावकऱ्यांनी मोठ्या श्रद्धेने पालखीचे दर्शन घेतले. वारीत २०० वारकरी दरवर्षी परंपरेनुसार पंढरपूरच्या विठुरायाला भेटण्यासाठी निघालेले वारकरी यंदाही २०० च्या संख्येत गावात दाखल झाले. पालखी सोहळा दाखल होताच भावपूर्ण वातावरण निर्माण झाले.



# चांदूर, तिवसा बाजारपेठेत कडकडीत बंद

## बच्चू कडू यांच्या उपोषणाला पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. १३ :

बच्चू कडू यांच्या शेतकरी प्रश्नांवरील उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी चांदूरबाजार आणि तिवसा येथे बुधवारी संपूर्ण बंद पाळण्यात आला. अमरावतीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतमालाची होळी करून सरकारविरोधात निषेध नोंदवण्यात आला. शेतकरी नेते रविकांत तुपकर, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि माजी मंत्री रासपचे महादेव जानकर यांनी गुरुकुंज मोझरी येथील उपोषण स्थळी भेट दिली. प्रहारच्या महिला पदाधिकाऱ्यांनी चांदूरबाजारचे तहसीलदार रामदास शेळके यांना निवेदन देऊन दोन दिवसांत तोडगा न निघाल्यास जलसमाधी घेण्याचा इशारा दिला.

बंददरम्यान चांदूर बाजार आणि तिवसा शहरातील संपूर्ण बाजारपेठ दुपारपर्यंत बंद होती. प्रहारचे तालुकाप्रमुख संतोष कीटुकले यांच्या नेतृत्वात बंद पाळण्यात आला. अमरावतीत बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी परिसरात आंदोलन करण्यात आले. गेल्या दोन दिवसांपासून चांदूरबाजार तालुक्यात प्रहारची विविध आंदोलने सुरू आहेत. मंगळवारी तहसील कार्यालयात मुंडन आणि विश्रोळी धरणावर जलसमाधी आंदोलन करण्यात आले. आसेगाव पूर्णा येथील कार्यकर्त्यांनी टॉवरवर चढून आंदोलन केले, मात्र प्रशासनाच्या आवाहनानंतर त्यांनी टॉवर सोडला. तिवसा येथे शहर अध्यक्ष बाळा देशमुख यांच्या आवाहनानुसार सकाळी आठ ते दुपारी तीन वाजेपर्यंत बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन पाठवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्याची मागणी केली आहे.

# बोगस शालार्थ आयडीची एसआयटी चौकशी करण्याची मनसेची मागणी

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ , दि. १३ :

जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामध्ये अनागोंदी कारभार सुरू असून. कार्यालयात शिक्षण विभागाप्रमाणेच शालार्थ आयडीचा महा घोटाळा उघडकीस येणार आहे. समाज कल्याण विभागाचा अनागोंदी कारभाराचा पाढा वाचत जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांना मनसेचे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार, अनिल हमदापुरे यांनी निवेदन सादर करून समाज कल्याण विभागाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करून बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याच्या दोषीवर कारवाईची मागणी करण्यात आली.



शालार्थ आयडी करण्यासाठी सदर प्रकरण यवतमाळ येथून प्रस्ताव अमरावती येथे मान्यता प्राप्त होऊन पुणे येथे पाठवणे गरजेचे असते. त्यानंतर सदर प्रस्ताव मुंबई येथे जाऊन शालार्थ आयडी ची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते.

परंतु समाज कल्याण विभाग यवतमाळ मार्फत सन २०२३ -२५ या काळात वरील प्रमाणे तसेच अन्य शाळेतील भरती प्रक्रियेत प्रकरण अमरावती पुणे येथे न पाठवता थेट मुंबई येथे जाऊन बोगस शालार्थ आयडी तयार केल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला. त्यामध्ये दारव्हा, उमरखेड, पोफाळी, ढाणकी येथील शाळेतील प्रस्ताव प्रकरणात एनओसी आल्यानंतर थेट सदर प्रकरणात मुंबई येथे जाऊन बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आले.

अनेक प्रकरणात आदेश नसताना सुद्धा वैयक्तिक मान्यता देण्यात आली असून त्याची सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे. या सर्व भरती प्रक्रियेची, सर्व शाळांच्या आलेल्या एनओसीची सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे अशी मागणी या प्रसंगी अनिल हमदापुरे यांनी केली. समाज कल्याण विभागात अनेक प्रकरणात फक्त शिफारस पत्रासाठी सुद्धा आर्थिक व्यवहार होत असल्याचा आरोप याप्रसंगी मनसेच्या वतीने करण्यात आला.

वरील सर्व विषयाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र निर्माण सेना जिल्हा यवतमाळ च्या वतीने सदर प्रकरणात एसआयटी चौकशी करून सर्व दोषी अधिकारी, संबंधित संस्थाचालक यांची चौकशी करण्याची मागणी या प्रसंगी जि. प. मुख्याधिकाऱ्यांना करण्यात आली, संबंधित विषयाचे गांभीर्य लक्षात घेता अतिरिक्त मुख्याधिकारी धोत्रे यांना तात्काळ प्राथमिक चौकशीचे करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले.

या प्रकरणात उच्चस्तरीय चौकशी न झाल्यास मनसेच्या वतीने संबंधित विभागा विरोधात आक्रमक आंदोलन उभारण्याचा इशारा मनसेने दिला. याप्रसंगी प्रामुख्याने मनसेचे जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार, अनिल हमदापुरे, सोनु गुप्ता, शिवम नांदुरकर, सौरभ अनसिंगकर, तुषाल चोंडके, लकी छांगाणी, बबलू मसराम, गोपाल घोडमारे, दीपक आडे यासह इतर मनसेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबई येथे तयार करण्यात आले बोगस शालार्थ आयडी समाज कल्याण विभाग यवतमाळ मार्फत सन २०२३ -२५ या काळात वरील प्रमाणे तसेच अन्य शाळेतील भरती प्रक्रियेत प्रकरण अमरावती पुणे येथे न पाठवता थेट मुंबई येथे जाऊन बोगस शालार्थ आयडी तयार केल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला. त्यामध्ये दारव्हा, उमरखेड, पोफाळी, ढाणकी येथील शाळेतील प्रस्ताव प्रकरणात एनओसी आल्यानंतर थेट सदर प्रकरणात मुंबई येथे जाऊन बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आले.

# नावीन्यपूर्ण वटसावित्री पौर्णिमा साजरी वडपूजन करून अभियानाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. १३ :

मनस्विनी फाउंडेशन नेहमीच निसर्ग संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविते. त्यामध्ये प्लास्टिकपासून मुक्ती, कापडी पिशव्या वाटप, वृक्षारोपण आणि संवर्धन याच शृंखलेत मागेल त्याला वृक्ष, जगवेल त्याला वृक्ष या अभियानाची वटसावित्री पौर्णिमा निमित्त सुरूवात करण्यात आली.

वडाची फांदी न तोडता वड पूजन करून व वट वृक्षाची लागवड करून या अभियानाचा स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे महिलांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. हा उपक्रम मनस्विनी फाउंडेशन व वनविभाग अमरावतीकडून घेण्यात आला. मनस्विनी फाउंडेशन दरवर्षी वटसावित्री पूजनाच्या दिवशी या उपक्रमाची सुरुवात करत असते व पुढील तीन महिने झाडे लावणे व वर्षभर त्यांची काळजी घेणे, असा पूर्ण वर्षभर हा उपक्रम राबविला जातो. यावेळी शहरातील ऑक्सिजन पार्क येथे वड, पिंपळ, आवळा, चिंच जांभूळ या सर्व भारतीय मूळ जातीच्या वृक्षांचे वाटप करण्यात आले.

फाउंडेशनच्या सचिव रजनी आमले यांनी झाड लावणं जेवढे महत्त्वाचे आहे.

तेवढेच त्यांचे संगोपन करणे देखील गरजेचे आहे. असे विचार व्यक्त करून पुढील वर्षभराचा लेखाजोखा यावेळेस मांडला. तसेच त्यांच्या बीजपेढी प्रकल्पातील बिजांचे सृष्टी सखा ग्रुपला वितरण करण्यात आले. यावेळी महिलांनी रंगीबेरंगी सुंदर साड्या परिधान केल्या होत्या. यावेळी वडाची पूजा केली.

पुढील तीन महिन्यात भारतीय मूळ जातीचे वृक्ष रजनी आमले यांचे



निवासस्थान कॉंग्रेस नगर जवळील भूमिपुत्र कॉलनी येथून वितरित करण्यात येतील. अशी माहिती स्वाती बडगुजर आणि रजनी आमले या संस्थेच्या प्रमुख सदस्यांनी दिली. यावेळी मनस्विनी फाउंडेशनच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

यावेळी संत गाडगे बाबा विद्यापीठ उपकुलसचिव डॉ.दादाराव चव्हाण, रश्मी नावंदर, संगीता शिंदे , लीना वासनिक, गंगा खारकर, संतोष कावरे, पुंडलिक गोसावी यांनी पर्यावरण संवर्धनासंबंधी मार्गदर्शन केले. अभंगकार प्रा. अरुण बुंदेले व प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांनी या अभियानाला शुभेच्छा दिल्या. यावेळी माधुरी धमाळे, कीर्ती देशमुख, राधा कुरील, राजश्री जढाळे, ज्योती सैरीसे, बरखा बोज्जे, प्रिया इंगोले, मधू लोणारे आरती वानखडे, भाग्यश्री देशमुख, मेघा हिंगासपूरे, सविता ठाकरे, जया माहुरे, मेघा रिठे, विशाखा मेश्राम, वंदना जामनेकर, माया अंबाडकर, भारती बेलसरे यांची या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती.

# खतासह बियाण्यांचा काळाबाजार रोखण्याकरिता कृषी अधिकाऱ्यांना घेराव



■ महासागर प्रतिनिधी, दर्यापूर , दि. १३ :

खरिप हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्यांना पावसासह पेरणीचे वेध लागले आहेत. सद्यस्थितीत बाजारात बियाणे व खतांची कृत्रिम टंचाई असल्याने कपाशी व इतर बियाणे, हवी ती खते शेतकऱ्यांना मिळेनाशी झाली आहेत.

तर दुसरीकडे कृषी विक्रेते अजित १५५ या बियाणांची दलालांच्या मदतीने काळ्याबाजारात विक्री करून मलिदा लाटत आहेत.

दर्यापूर तालुक्यात खते व बियाणांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार हा दरवर्षीच होत असतो. अशातच ग्रामीण भागात दोन ठिकाणी प्रतिबंधीत असलेल्या बियाण्यांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई झाली.

तरीही खूप मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत बियाण्यांची विक्री होत आहे. त्यामुळे सर्वत्र शेतकऱ्यांची फसवणूक खूप मोठ्या प्रमाणात होत असून याचीच दखल घेण्यासाठी युवासेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांच्या नेतृत्वात, ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका कृषी अधिकारी आरती साबळे यांना घेराव घालून दर्यापूर तालुक्यातील प्रतिबंधीत बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे. दरम्यान सर्वाधिक मागणी असलेले अजित १५५ या बियाण्यांची कृषी दुकानदार चढ्या दराने विक्री करत असल्याची दिसत आहे. त्यामुळे मूळ किमतीत बियाण्यांची विक्री करावी यासंदर्भात अजित १५५ व अजित १०५ हे बियाणे दर्यापूर तालुक्यातील कोणत्या कृषी केंद्रात किती प्रमाणात साठा उपलब्ध आहे, याची यादी रोज कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून शेतकरी हितार्थ प्रसिद्ध करण्यात यावी ,अशी प्रमुख मागणी याप्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख कावडकर यांनी केली आहे.

कृषी कार्यालय मध्ये अचानक शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मोर्चा येताच कृषी अधिकारी व कर्मचारी यांची चांगलीच तारांबळ उडाली होती.

यावेळी शिवसेना विधानसभा संघटक बबन विल्हेकर, शहरप्रमुख गोपाल अग्रवाल,ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर, सरपंच किशोर टाले, सरपंच संजय कोरडे, सरपंच विजय अढाव, युवासेना जिल्हा चिटणीस प्रतीकराऊत, युवासेना तालुका प्रमुख सागर गिरे, युवासेना दर्यापूर शहर प्रमुख रुपेश मोरे, भरत हिंगणीकर, राजू मानकर, दीपक बगाडे, खंडू राऊत, उपसरपंच शरद आठवले, भास्कर धोटे, प्रशांत धमाळे, प्रशांत ठाकूर, संदीप धमाळे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MUNAWWAR SAMEERA.** NOW MY NEW NAME IS **MUNAWWAR SAMEERA DR ZIYAUDDIN SHAMSUDDIN.**
**ADD :** OPPOSITE HOUSE OF SHARIQUE JAMAL TAKIYA MASOOM SHAH MOMINPURA NAGPUR -440018

MY OLD NAME WAS **MAHESHKUMAR CHUNNILAL KARIYA.** NOW MY NEW NAME IS **MAHESH CHUNNILAL KARIYA.**
**ADD :** 586/4, OPP NIT PLAY GROUND, JALARAM NAGAR NAGPUR
MY OLD PASSPORT NO **N4321990**

MY OLD NAME WAS **RAJNISHKUMAR SUSHILDHAR TIWARI** . NOW MY NEW NAME IS **RAJNISH SUSHILDHAR TIWARI.**
**ADD :** PLOT NO. 17, MANEWADA RING ROAD NEAR SOUTH POINT SCHOOL YOGESHWARI NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **MUSTUFA ZAHID SAIFEE.** NOW MY NEW NAME IS **MUSTAFA ZAHID SAIFEE.**
**ADD :** WARD NO.06, DHARNI, POST - DHARNI, AMRAVATI - 444702

MY OLD NAME WAS **AFNAAN IQBAL.** NOW MY NEW NAME IS **AFNAN IQBAL.**
**ADD :** NEAR SAGEER HOTEL, WARIS PURA KAMPTEE 441002

MY OLD NAME WAS **TAUFIQUE SAYANI.** NOW MY NEW NAME IS **TOFIK RAFIKBHAI SAYANI.**
**ADD :** GAYAKWARD CHOWK WARD NO 3 ARMORI DIST (GADCHIROLI) ARMORI 441208 (MS)

# बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला आ.संजय व आ.सुलभा खोडके यांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. १३ :

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन प्रहार नेता बच्चूभाऊ कडू यांचे मोझरी येथे गेल्या पाच दिवसापासून अन्नत्याग आंदोलन सुरु आहे.

या दरम्यान त्यांची प्रकृती खालावली असल्याने सर्वपक्षीय स्तरावर त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. दरम्यान आज शुक्रवार दिनांक १३ जून रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आ.संजय खोडके व अमरावतीच्या लोकप्रतिनिधी आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी मोझरी येथे बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलन उपोषण मंडपाला भेट दिली. यावेळी आ.संजय खोडके यांनी उपोषणकर्ते बच्चू कडू व त्यांच्या समर्थकांशी चर्चा केली. राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडून सुद्धा बच्चू कडूंच्या प्रकृतीची विचारणा करण्यात आली असून अशा शेतकऱ्यांच्या लढवय्या नेत्याची अमरावती जिल्ह्याला खरंच गरज आहे. त्यामुळे त्यांनी शेतकरी प्रश्नी आंदोलनाचा लढा सुरूच ठेवावा, परंतु प्रकृतीचा विचार करता उपोषण मागे घ्यावे,अशी विनंती आ.संजय खोडके यांनी केली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन सुरु असलेल्या बच्चूभाऊंच्या लढ्यात आपण सहभागी असल्याचे सांगितले. मात्र उपोषणाचा मार्ग न अवलंबता आपण शासन दरबारी व मंत्रालय स्तरावर आंदोलन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देऊ. उपोषण सुटले तरी शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु राहील, परंतु बच्चूभाऊंनी उपोषणाचा आग्रह सोडावा , आणि आपल्या प्रकृतीचा विचार करून आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केले.



**शेतकऱ्यांचा लढा सुरु राहील, परंतु प्रकृतीचा विचारकरून बच्चूभाऊंनी उपोषण मागे घेण्याबाबत सर्वपक्षीय नेत्यांचे प्रयत्न**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

## काळजी घ्यायलाच हवी


**आरोग्य जपा**

मुलांनो, पुन्हा एकदा कोविड-१९ चा धोका वाढल्याचे तुम्ही ऐकत असाल. आधी या साथीच्या रोगाने किती हाहाकार माजवला होता, हे तुम्हाला आठवतच असेल. तेव्हा कोविड-१९ संसर्ग रोखण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, हे समजून घ्या. हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये सहजपणे पसरू शकतो. म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी वावरताना तुम्हाला विशेष काळजी घ्यायला हवी. चला तर मग, स्वतःचे संरक्षण करण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेऊ या.

सर्वात पहिली बाब म्हणजे सर्दी, खोकला, ताप यासारखी कोणतीही लक्षणे दिसल्यास लगेचच घरातील मोठ्यांना सांगा. लक्षणे लपवू नका. कम कुवत प्रतिकारशक्ती किंवा कोणत्याही आजाराने ग्रस्त असणाऱ्यांना या आजाराचा धोका अधिक असतो. म्हणूनच काळजी घ्या.

सध्या सामाजिक अंतर ठेवणे म्हणजेच लोकांपासून सुमारे एक मीटर अंतर ठेवणे महत्त्वाचे आहे. तुमच्या आजूबाजूचे लोक आजारी नसतील तरीही सुरक्षित अंतर ठेवा. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा. तुम्हाला गर्दीच्या ठिकाणी जावे लागणारच असेल किंवा तुम्ही मोकळे वारे नसणाऱ्या ठिकाणी असाल तर मास्क नक्की घाला. मास्क व्यवस्थित बसणारा हवा. मास्क काढल्यानंतर स्वच्छ प्लास्टिकच्या पिशवीत ठेवा. तो धुता येत असेल तर दररोज धुवा. डिस्पोजेबल असेल तर दररोज नवीन मास्क घाला आणि वापरलेला मास्क कचऱ्याच्या डब्यात टाका.

मित्रांनो, साबण आणि पाण्याने हात पूर्णपणे स्वच्छ करा. हात धुणे शक्य नसेल तेव्हा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरचा वापर करा. जेवण्यापूर्वी किंवा चेहऱ्याला स्पर्श करण्यापूर्वी हात स्वच्छ करा. शाळेत पोहोचल्यानंतर आणि शाळेतून घरी आल्यानंतरही हात धुवा. शिंकताना आणि खोकताना तोंड आणि नाक रुमालाने किंवा टिशूने झाका. वापरलेला टिशू ताबडतोब डस्टबिनमध्ये फेकून द्या आणि हात धुवा. हात स्वच्छ नसतील तर डोळे, नाक आणि तोंडाला अजिबात हात लावू नका.



## पावसाळ्यात दुर्गंधी सतावते?

**करुन तर पाहा**


पावसाळा सुरू झाला आहे. या दिवसात कपडे ओलसर राहिल्यामुळे, सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे कपड्यांना तसेच त्यामुळे शरीराला दुर्गंधी येऊ शकते. ओलाव्यामुळे बॅक्टेरिया वाढू लागतात आणि तेच दुर्गंधी निर्माण करतात. मित्रांनो, ती दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय करता येतील. आज त्याचीच माहिती घेऊ या.



* लिंबू आणि गुलाबपाणी मिसळून लावल्याने कुबट वास निघून जातो. लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिड असते, जे त्वचेची पीएच पातळी संतुलित करते आणि बॅक्टेरिया वाढण्यापासून देखील रोखते. गुलाबपाणी त्वचा थंड करते आणि त्याचा सुगंध देखील दुर्गंधी कमी करतो. म्हणूनच यासाठी अर्धा लिंबू एक चमचा गुलाबपाण्यात पिळून कापसाच्या मदतीने काखेखाली आणि इतर घामाच्या ठिकाणी लावा. १५-२० मिनिटे असेच राहू द्या आणि नंतर पाण्याने धुवा. यामुळे तुम्हाला स्वच्छ वाटेल. शरीराला येणारी दुर्गंधी कमी होईल.

* बेकिंग सोडा कुबट, घामाचा वास शोषून घेतो आणि नैसर्गिक दुर्गंधीनाशक म्हणून काम करतो. नारळाच्या तेलात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. ते शरीरावर बॅक्टेरिया वाढण्यापासून रोखतात. हे मिश्रण लावल्याने शरीराची दुर्गंध निघून जातो. त्यासाठी दोन चमचे बेकिंग सोड्यात एक चमचा नारळ तेल मिसळून पेस्ट करा आणि त्वचेवर लावा. १०-१५ मिनिटे तसेच राहू द्या. यानंतर कोमट पाण्याने धुवा. यामुळेही पावसाळ्यातील दमटपणाने शरीराला येणारी दुर्गंधी दूर होईल.

* घामाचा वास दूर करण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगरही खूप प्रभावी आहे. त्यात अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल गुणधर्म असतात जे घामाचा वास कमी करतात. इतकेच नव्हे तर ते घामामुळे होणाऱ्या बॅक्टेरियाच्या वाढीस देखील प्रतिबंधित करतात. याचे लाभ मिळवण्यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे सफरचंद सायडर व्हिनेगर मिसळा आणि कापसाच्या मदतीने घाम येतो त्या भागांवर लावा. १० मिनिटे तसेच राहू द्या, नंतर थंड पाण्याने स्वच्छ करा. तुम्ही हे मिश्रण दररोज वापरू शकता.





## फोनमध्ये पाणी गेले?

**टाळा या चुका**

छोट्या दोस्तांनो, पावसाळ्यात फोन भिजण्याचा, त्यात पाणी शिरण्याचा मोठा धोका असतो. वेगवेगळ्या कारणांसाठी सतत स्मार्टफोन वापरावा लागत असल्यामुळे पावसात भिजला की भलती काळजी वाटते. असे झाल्यास तुम्हीही घाबरत असाल. लगेच फोन सुरू करण्याचा किंवा सुकवण्याचा प्रयत्न करत असाल. परंतु तुम्हाला अजिबात घाई करण्याची गरज नाही. कारण तुमची एक छोटीशी चूक फोन कायमचा खराब करू शकते. तेव्हा फोन भिजल्यास कोणत्या चुका टाळायच्या हे जाणून घ्या.

* पावसात भिजल्यानंतर बरेचजण फोन तपासण्याचा प्रयत्न करतात आणि तो योग्यरित्या काम करत आहे की नाही हे पाहण्यासाठी लगेचच चार्ज करतात. पण ही एक मोठी चूक आहे. यामुळे फोनमध्ये शॉर्ट सर्किट होऊ शकते. मोठा अपघात संभवतो. म्हणूनच फोन ओला असताना कधीही चार्जिंगला लावू नका.

* पावसात फोन भिजल्यानंतर काही मुले तो हेअर ड्रायर किंवा हीटरने वाळवण्यास सुरुवात करतात, परंतु तुम्ही असे अजिबात करू नये. हेअर ड्रायर आणि हीटरमधून येणाऱ्या उष्णतेमुळे फोनच्या अंतर्गत भागांचे नुकसान होऊ शकते. यामुळे संवेदनशील घटक वितळू शकतात आणि स्क्रीन आणि बॅटरीलाही नुकसान होऊ शकते. म्हणून अशी चूक अजिबात करू नका.



* फोन भिजला तर तो तांदळात ठेवावा, यामुळे फोन लवकर सुकतो असे काहींना वाटते. परंतु यामुळे फोनमधील ओलावा पूर्णपणे निघून जात नाही. बऱ्याच वेळा तांदूळ चार्जिंग पोर्टमध्येही अडकतो. म्हणूनच हा उपायही अयोग्य आहे.

* फोन हलवल्याने आतील पाणी निघून जाईल असे काहींना वाटते. परंतु उलट असे केल्याने पाणी फोनच्या इतर भागांमध्ये जाऊ शकते.

## आता दही कमी खा

**स्टे हेल्दी**

उन्हाळ्यात तुम्ही दही खाल्ले असेल. थंड दही, रायता किंवा लस्सी असे वेगवेगळे प्रकार खाऊन उन्हाळा सुसह्य करण्याचा प्रयत्न केला असेल. हे सर्व घटक उष्णतेपासून आराम देतात आणि पोट निरोगी ठेवतात. दह्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने आणि प्रोबायोटिक्स सारखे पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहते. परंतु तुम्हाला माहिती आहे का की पावसाळ्यात दररोज जास्त दही खाणे तुमच्यासाठी हानिकारक देखील असू शकते... हो, आता आहारात दही कमी खा कारण याचे काही तोटे आहेत. आज ते जाणून घेऊ या.

पावसाळ्यात दररोज जास्त प्रमाणात दही खाल्ल्याने बद्धकोष्ठतेची तक्रार होऊ शकते. दह्याचा परिणाम थंड असतो आणि तो काही मुलांच्या पचनसंस्थेला अनुकूल नसतो. यामुळे पचनक्रिया मंदावते. म्हणूनच वारंवार बद्धकोष्ठतेची समस्या येत असेल तर मर्यादित अ प्रमाणात दही खा.


दही आरोग्यदायी असले तरी त्यात कॅलरीज देखील असतात. विशेषतः पूर्ण चरबीयुक्त दही साखर मिसळून खाल्ले तर जास्तीच्या कॅलरीज पोटात जाऊन वजन वाढू शकते. म्हणूनच दह्याचा अतिरेक टाळा.

दह्याचा प्रभाव थंड असल्यामुळे या दिवसात पोटात वात वाढू शकतो. दही जास्त प्रमाणात खाल्ल्यास शरीराला सूज येऊ शकते. काही मुलांना जास्त दही खाल्ल्याने पोट फुगण्याचाही त्रास होतो. विशेषतः दही आंबट असेल किंवा रात्री ते खाल्ले तर पोटदुखी जाणवते. दह्यामध्ये असणाऱ्या लॅक्टिक ॲसिडमुळे पोटात गॅस आणि जळजळ होऊ शकते. म्हणूनच रात्रीच्या वेळी दही अजिबात खाऊ नये. काही मुलांना दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी असते. अशांना दही खाल्ल्यानंतर पोटदुखी, जुलाब, गॅस किंवा उलट्या होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हालाही दुग्धजन्य पदार्थांची कोणतीही समस्या असेल तर दही टाळा किंवा कमी प्रमाणात खा.



**ठिपके जुळवा**





## माहिती आहे?

**माहिती आहे?**

दोस्तांनो, कॉफीचे निरनिराळे ब्रँड्स प्रसिद्ध आहेत. आपल्या घरात कॉफी पावडर असते. ती उकळून अथवा दुधात मिसळून गरमागरम कॉफी तयार होते. कॉफीची लागवड करण्यापासून पूड तयार करण्यापर्यंतची प्रक्रिया बरीच मोठी आहे. कॉफी नेमकी कशी तयार होते याबाबतची ही रंजक माहिती...

कॉफीच्या बिया असतात. नव्याने पेरलेलं कॉफीचं रोपटं वाढून त्याला फळं लागेपर्यंत तीन ते चार वर्षांचा कालावधी लागतो. कॉफीच्या फळाला 'चेरी' म्हटलं जातं. कॉफीची पिकलेली चेरी लाल रंगाची असते. कॉफीच्या मळ्यात काम करणारे लोक कोणत्याही यंत्राचा वापर न करता हातांनी तोडूनच कॉफीच्या झाडावरची फळं काढतात. एक कर्मचारी दिवसभरात साधारणपणे १०० ते २०० पाउंड कॉफी चेरी वेचतो. यापासून २० ते ४० पाउंड कॉफी बीन्सची म्हणजेच कॉफीच्या बियांची निर्मिती होते. कॉफीची लागवड साधारणपणे पावसाळ्याच्या आसपास म्हणजे मातीत ओलावा असताना केली जाते.

फळं वेचल्यानंतर कॉफी निर्मितीच्या प्रक्रियेला लगेच सुरूवात करावी लागते. नाहीतर फळं खराब होऊ शकतात. सर्वप्रथम कॉफीची फळं उन्हात वाळवून घेतली जातात. या चेऱ्यांमधला ओलावा निघून गेल्यानंतरच कॉफी तयार केली जाते. यासाठी काही आठवडे किंवा महिनेही लागू शकतात. आकारानुसार आणि प्रकारानुसार कॉफीच्या बियांची निवड केली जाते. खराब झालेल्या बिया टाकून दिल्या जातात. चांगल्या दर्जाची कॉफी निर्यात केली जाते.

## प्रयोगातून शिका



**कार्यानुभव**

मुलांनो, तुम्ही मित्रमैत्रिणींसवे हसतखेळत विज्ञान शिकू शकता. आज असाच एक गमतीशीर प्रयोग करून बघू या.

**साहित्य :** काचेच्या दोन रिकाम्या बाटल्या, दोन स्ट्रॉ, चुना मिसळलेलं पाणी (या पाण्याला कॅल्शियम हायड्रॉक्साइड म्हणतात), साधं पाणी इत्यादी.

**कृती :** सर्वात आधी एका बाटलीत चुना मिसळलेलं तर दुसऱ्या बाटलीत साधं पाणी भरा. चुना मिसळलेलं पाणीही साध्या पाण्यासारखं रंगहीन असतं. आता दोन्ही बाटल्यांमध्ये स्ट्रॉ ठेवा. मित्र किंवा मैत्रिणीला साध्या पाण्याची बाटली द्या. चुना मिसळलेल्या पाण्याची बाटली तुमच्याकडे ठेवा. आता तुम्हा दोघांनीही या स्ट्रॉ मधून फुंकर मारायची आहे. फुंकर मारल्यामुळे साध्या पाण्यात काहीच बदल होणार नाही. पण चुना मिसळलेल्या पाण्याचा रंग मात्र दुधासारखा पांढराशुभ्र होईल. फुंकर मारल्यामुळे बाटलीत कार्बन डाय ऑक्साइड मिसळतो. कार्बनची कॅल्शियम हायड्रॉक्साइडसोबत रासायनिक प्रक्रिया होते आणि कॅल्शियम हायड्रॉक्साइडचं रुपांतर कॅल्शियम कार्बोनेटमध्ये होतं. याचा रंग पांढरा शुभ्र असतो. म्हणूनच सुरूवातीला रंगहीन असणारं चुन्याचं पाणी फुंकर मारल्यावर पांढऱ्या रंगाचं होतं.



## स्पेस सायंटिस्ट व्हायचंय?

**कोण होणार?**

मुलांनो, तुम्हालाही अंतराळात दडलेली गुपितं उलगडावीशी वाटत असतील. अर्थातच यासाठी तुम्हाला अंतराळ संशोधक म्हणजे स्पेस सायंटिस्ट व्हावं लागेल. 'इस्रो'मध्ये स्पेस सायंटिस्ट बनण्यासाठी तुम्हाला गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण व्हावं लागेल. यासोबतच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीची प्रवेश परीक्षाही द्यावी लागेल. एअरोस्पेस इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, रेडिओ इंजिनिअरींग आदी शाखांमध्ये पदवी मिळवणारे विद्यार्थी अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात जाऊ शकतात. इस्रो अशा गुणवंताच्या शोधात असतं. मात्र इथे प्रवेश मिळवण्यासाठी तुमच्याकडे प्रचंड हुशारी असायला हवी. 'इस्रो' हुशार मुलांचीच निवड करतं. त्याबरोबर अंतराळाची ओढ, उत्सुकता, कल्पकता हे गुणही असायला हवेत. 'इस्रो'तर्फे आयसीआरबी परीक्षेचं आयोजन केलं जातं. ही परीक्षा इलेक्ट्रॉनिक, मॅकेनिकल आणि कॉम्प्युटर अशा तीन विभागांमध्ये घेतली जाते. बीई, बीएससी तसंच आयआयटी या विषयात पदवीला ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले विद्यार्थी ही प्रवेश परीक्षा देऊ शकतात. या परीक्षेसाठी बरीच तयारी करावी लागते. तेव्हा तयारीला लागा.

## प्लास्टिकमुक्त देशासाठी...





**महत्त्वाचे काही**

दोस्तांनो, प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची तुम्हाला माहिती आहे. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकमुळे प्रदूषणात मोठी भर पडते. प्लास्टिकच्या पिशव्या, ग्लास, शीतपेयांच्या बाटल्या, स्ट्रॉ यासारख्या वस्तूंची गणना सिंगल यूज प्लास्टिकमध्ये होते. या वस्तू आपण एकदाच वापरतो आणि टाकून देतो. म्हणूनच हळूहळू सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी करत त्यावर पूर्णपणे बंदी घालण्याची योजना आखली जात आहे. मित्रमैत्रिणींनो, तुम्हीही प्लास्टिकचा वापर कमी करायला हवा. प्लास्टिकच्या पिशव्या वापरणं बंद करायला हवं. फक्त पिशव्याच नव्हे तर तुमच्या शालेय साहित्यातल्या बऱ्याच वस्तूही प्लास्टिकच्या असतात. त्यातील बरंच साहित्य एकदा वापरून टाकून दिलं जातं. अर्थात या वस्तूंना पर्यायही सापडायला हवेत. प्लास्टिकचं विघटन होण्यास काही हजार वर्षांचा कालावधी लागतो. प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर वस्तू रिसायकल केल्या नाहीत तर त्या पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात.

**स्मार्ट टिप्स**

### नियोजन करा



मुलांनो, अभ्यास आटपण्यासाठी वेळेचं नियोजन करणं गरजेचं आहे. यासाठी दिवसभरातल्या कामांची यादी करून घ्या. अभ्यासाचा प्राधान्यक्रम ठरवा. कोणत्या विषयाचा अभ्यास कधी करायचा हे आधी ठरवून घ्या. मग अभ्यासाला लागा. यामुळे तुमचं काम सोपं होईल.

**खादाडी**

### चीज कॉर्नफ्लेक्स



मित्रांनो, आवडत असल्यास तुम्ही चिज कॉर्नफ्लेक्स खाऊ शकता. यासाठी एक कप कॉर्नफ्लेक्स, अर्धा कप भाजलेले दाणे, दोन चमचे किसलेलं चीज, पाव चमचा लाल तिखट, एक चमचा बटर आणि चवीनुसार मीठ असं साहित्य घ्या. सर्वात आधी मायक्रोवेव्ह १८० अंश सेल्सियसला प्रीहिट करून घ्या. गरज असल्यास यासाठी मोठ्यांची मदत घ्या. आता एका काचेच्या बाऊलमध्ये कॉर्नफ्लेक्स, बटर, दाणे, चीज, तिखट आणि मीठ असं साहित्य घाला. नीट हलवून घ्या. यानंतर बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. दोन मिनिटं गरम करा. गरमागरम चीज कॉर्नफ्लेक्स खा.

**दोस्त हे मस्त**


### जग पेंग्विनचं



मुलांनो, पेंग्विन हा एक पक्षी आहे. पण त्याला उडता येत नाही. हे पक्षी मासे खातात. ते दक्षिण गोलार्धात, थंड वातावरणात रहातात. न्यूझीलंडमध्येही पेंग्विन आढळतात. त्यांचे डोळे पिवळ्या रंगाचे असतात. लिटिल ब्लू पेंग्विन ही पेंग्विनची सर्वात लहान प्रजाती आहे. या पेंग्विनची उंची फक्त १६ इंच असते तर एम्परर पेंग्विनची उंची जवळपास तीन फूट असते. पेंग्विन बर्फावर तुरूतुरू चालतात.

**वाचा तर खरं**

### कशासाठी... पोटासाठी...



दोस्तांनो, पोटाचं आरोग्य उत्तम असायला हवं. म्हणूनच पोटासाठी काही योगासनं आहेत जी नियमितपणे करायला हवी. त्यापैकी एक आसन म्हणजे पादोंगुष्ठनासा स्पर्शासन. या आसनामुळे पाठ आणि मानेचे स्नायू बळकट होतात. पचनक्रिया सुधारते. पोटाच्या बारिकसारीक तक्रारी दूर होतात. त्यामुळे या आसनाची माहिती घ्या आणि नियमितपणे करा.

# बच्चू कडू यांना रक्ताच्या उलट्या

## उपोषणाच्या ६ व्या दिवशीही उपचार घेण्यास नकार



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी बच्चू कडू यांनी अमरावती येथील मोझरी या गावी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज सहावा दिवस आहे. बच्चू कडू यांची प्रकृती चांगलीच खालवल्याचे समोर आले आहे.

त्यांना सकाळी रक्ताच्या उलट्या झाल्या असून त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. कुठलीही सलाईन घेणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांची खालावलेली प्रकृती बघून एका कार्यकर्त्यानें विष प्रश्न करत आत्महत्या करण्याचा देखील प्रयत्न केल्याचे समजते. हे असेच सुरू राहिले तर आंदोलन चिघळण्याची शक्यता आहे.

बच्चू कडू यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. पोटात अन्न नसल्याने त्यांच्या किडनी तसेच शरीराच्या इतर भागांवर परिणाम झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. बच्चू कडू यांच्या शरीराची तपासणी करण्यात आली आहे.

यावेळी डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावण्याचा सल्ला दिला. परंतु, बच्चू कडू यांनी त्यास नकार दिला आहे. यावेळी त्यांचे कार्यकर्ते तसेच शेतकऱ्यांनी बच्चू कडू यांना सलाईन लावण्याची विनंती केली. मात्र, मागण्या पूर्ण होईपर्यंत औषधोपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

**मंत्र्यांनी घेतली ऑनलाईन बैठक**

बच्चू कडूंच्या आंदोलनाला राज्यभरातून अनेक नेते मंडळींनी पाठिंबा दिला आहे. अनेकांनी त्यांची भेट देखील घेतली आहे. हे आंदोलन मागे घेण्यासाठी सरकारकडून प्रयत्न देखील केले जात असल्याचे समजते. मंत्री भरत गोगावले, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री जयकुमार गोरे यांनी बच्चू कडू यांच्या मागण्यांसंदर्भात ऑनलाईन बैठक घेतली. परंतु, या बैठकीत ठोस आश्वासन मिळाले नसल्याने बच्चू कडू उपोषणावर ठाम आहेत.

**प्रहारच्या कार्यकर्त्याचे विष प्राशन**

बच्चू कडू यांच्या उपोषणाची दखल न घेतल्याने तसेच त्यांची प्रकृती खालवल्याने प्रहार संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याने विष प्रश्न करत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. अजय चौधरी (वय 35) असे या कार्यकर्त्यंचें नाव आहे. अजय चौधरी हे प्रहार वरुड तालुका संपर्क प्रमुख आहेत.त्यांच्यावर वरुड येथे उपचार सुरू आहेत.

**कर्जमाफी योग्यवेळी - अजित पवार**

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी गुरूवारी बच्चू कडू यांच्याशी चर्चा करण्याची तयारी दर्शवली. तसेच सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय योग्यवेळी घेणार असल्याचेही स्पष्ट केले. कोणताही प्रश्न चर्चेने सुटतो. त्यामुळे सरकार बच्चू कडू यांच्याशी चर्चा करण्यास तयार आहे, असे ते म्हणाले.

# रोशनी हरवली...

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. १३ :

अहमदाबाद येथील विमान अपघातात एकूण २६५ जणांचा बळी गेला. ज्यांचे जीव गेले ते गेलेच. परंतु, त्यांच्यावर आश्रितांनीही खूप काही गमावले आहे. या विमानातील सर्व १२ क्रू मेंबर्सचा मृत्यू झाला. प्रचंड परिश्रम करीत या सर्वांनी येथवर झेप घेतली होती. पण, क्षणार्धात राखरांगोळी झाली.



या दुर्घटनेत मुंबईलगतच्या डोंबिवली येथील रोशनी सोनघरे या तरुणीचा मृत्यू झाला. रोशनी ही एअर इंडियात हवाई सुंदरी होती. एवढेच नव्हे तर ती एक फेमस ट्रॅव्हल इन्फ्लुएंसरही होती. वयाच्या अवघ्या २७ वर्षी झालेल्या तिच्या मृत्यूमुळे तिच्या कुटुंबीयाला जोरदार धक्का बसला. रोशनीने १० बाय १० च्या खोलीतून उंच आकाशात झेप घेतली होती.

रोशनीचे मामा प्रवीण सुखदरे यांनी सांगितले की, रोशनी माझ्याच अंगणात लहानाची मोठी झाली. तिच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक होती. तिने लहानपणापासूनच हवाई सुंदरी होण्याचे स्वप्न पाहिले होते. ती एक असामान्य मुलगी होती. तिचे वडील टेक्निशियन आहेत. घरी आर्थिक सुबत्ता नव्हती. पण तिने आपल्या मार्गात येणाऱ्या अनेक अडथळ्यांवर मात करत आपले स्वप्न पूर्ण केले. ती सध्या एअर इंडियात आपली सेवा देत होती.

रोशनीने आपल्या करिअरच्या सुरुवातीला २ वर्षे स्पाइस जेटमध्ये काम केले. त्यानंतर तिला एअर इंडियात नोकरी मिळाली. अजून तिचे लग्नही झाले नव्हते. रोशनी सोनघरे एक ट्रॅव्हल इन्फ्लुएंसर होती. तिला इंटरनेट जगात 'स्काय लव्हज हर' म्हणून ओळखले जाते. इन्स्टाग्रामवर तिचे ५४ हजारांहून अधिक फॉलोअर्स होते. ती कायम वेगवेगळे व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर अपलोड करत होती. त्यांना चांगला प्रतिसादही मिळत होता. रोशनीने यापूर्वी एअर इंडियात फ्लाइट अटेंडंट म्हणूनही काम केले होते.

## अखेरची ठरली इरफानची ईद



अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघातात पुण्याच्या पिंपरी चिंचवड येथील एका तरुणाचाही मृत्यू झाला. संत तुकाराम नगर येथील रहिवासी असलेला २२ वर्षीय इरफान शेख असे या मृत तरुणाचे नाव आहे. इरफान गेल्या दोन वर्षांपासून एअर इंडियामध्ये काम करत होता. नुकताच तो ईद साजरी करण्यासाठी घरी आला होता. परंतु काळाने घाला घातला आणि त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

इरफान शेखच्या कुटुंबात आजी-आजोबा, आई-वडील आणि एक भाऊ आहे. या अपघाताने संपूर्ण कुटुंब हादरून गेले आहे. इरफानचा मृतदेह लवकरात लवकर त्यांच्या ताब्यात द्यावा जेणेकरून अंतिम संस्कार करता येतील, अशी कुटुंबीयांची मागणी आहे.

## स्वप्न पाहिले.. पूर्णही केले पण...



अहमदाबाद मध्ये झालेल्या विमान अपघातात सर्व क्रू मेम्बर्स मारले गेले. त्यात उरण मतदार संघातील न्हावा गावातील हवाई सुंदरी मैथिली मोरेश्वर पाटील हिचा समावेश आहे. न्हावा गावातून ती आपल्या ड्युटीसाठी दुपारच्या सुमारास निघून गेल्याची माहिती न्हावा गावातील माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांनी दिली आहे. आई वडील या दोघी बहिणी आणि एकुलता एक भाऊ असलेल्या कुटुंबातील मैथिली ही सर्वात मोठी मुलगी होती.

न्हावा गावातील टी एस रहेमान शाळेत बारावी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या मैथिलीने अगदी लहानपणापासूनच हवाई सुंदरी बनण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. घरची स्थिती एवढी पण चांगली नव्हती तरीही हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेतले आणि दोन वर्षा पूर्वी तीने एव्हिएशन चे शिक्षण पूर्ण करून एअर इंडियात कामाला लागली होती. न्हावा सारख्या ग्रामीण भागात राहून ती नेहमीच अपडाऊन करून आपली नोकरी सांभाळत होती. कालच ती लंडनला विमानात कर्मचारी म्हणून जायचे आहे म्हणून न्हावा येथून निघून गेली होती. न्हावा गावाचे माजी सरपंच जितेंद्र दामोदर म्हात्रे यांच्या चुलत भाचीची ती मुलगी आहे.

## बदलापूरच्या दीपक पाठकचाही बळी

या विमान अपघातात बदलापूरच्या दीपक पाठक या क्रू सदस्याचाही बळी गेला आहे. ३५ वर्षीय दीपक हा घाटकोपर येथे पत्नीसोबत राहायचा. एअर इंडियाच्या विमानात चढण्यापूर्वी त्याने आईला मी निघालोय, पोहोचल्यावर बोलतो, असा मेसेज केला होता. हा मेसेज अखेरचा ठरला.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी काढले पीएमचे कपडे

### फकीर म्हणवणारे घालतात लाखोचे सूट

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १३ :

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवघा महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. गडचिरोली येथील मशाल मोर्चात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कडाडून हल्ला चढवत ते योगी नव्हे तर सत्ताभोगी असल्याचे ठणकावून सांगितले.

काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गत आठवड्यात महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेवर शंका उपस्थित केली होती. त्यांच्या या आरोपानंतर महाराष्ट्र काँग्रेसचे नेत्यांना अवसान आले आहे. सर्वच नेते भाजप व त्यांच्या नेतृत्वावर हल्ला चढवत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही गडचिरोली येथील पक्षाच्या मशाल मोर्चाद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला चढवला.

नरेंद्र मोदी हे ११ वर्षापासून पंतप्रधानपदावर आहेत, पण या ११ वर्षात त्यांनी जनतेल्या दिलेल्या आश्वासनातील एकही आश्वासन पूर्ण केलेले नाही. स्वतःला फकीर म्हणवणारे नरेंद्र मोदी लाखो रुपये किंमतीची जॅकेट्स, लाखो रुपयांचे कपडे वापरतात, महागड्या वस्तू वापरतात, ते योगी नाही तर सत्ताभोगी आहेत. जनतेला दिलेली वचने पूर्ण न करणारे अधर्मी आहेत, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

काँग्रेसने विधानसभा निवडणुकीतील मतचोरीची चौकशी करावी यासाठी राज्यभर मशाल मोर्चे काढण्याचे निश्चित केले होते. गुरूवारी गडचिरोलीत मशाल मोर्चा व शेतकरी न्याय पदयात्रा काढण्यात आली. यावेळी विजय वडेट्टीवार, खा. नामदेव किरसान, खा. प्रतिभाताई धानोरकर, कुणाल चौधरी माजी मंत्री अनिस अहमद, आमदार अभिजित वंजारी, माजी आमदार सुभाष धोटे, गडचिरोली काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विमानातून काळच आला होता, पण ती वाचली!



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १३ :

अहमदाबाद येथे बुधवारी झालेल्या विमान अपघातात अकोल्याची ऐश्वर्या तोष्णीवाल ही तरुणी थोडक्यात बचावली. ही दुर्घटना घडली तेव्हा ती आपल्या वसतिगृहाच्या पाचव्या मजल्यावरील खोलीत झोपली होती. अचानक झालेल्या आवाजाने तिचे डोळे उघडले आणि त्यानंतर जिवाच्या आकांताने गर्दीतून वाट काढत कसाबसा स्वतःचा जीव वाचवला. तिने स्वतःच आपल्या पालकांशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे.

ऐश्वर्या तोष्णीवाल ही अहमदाबादच्या गुजरात कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्युट मेडिकल कॉलेजमध्ये डीएम अँकोपॅथोलॉजीच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. ती नुकतीच आपल्या आजोबांचा वाढदिवस साजरा करून अकोल्याहून अहमदाबादला परतली होती. गुरूवारी दुपारी तिच्या हॉस्टेलच्या इमारतीवर एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळले आणि त्यात तिच्या काही सहकारी डॉक्टरांसह एकूण २६५ जणांचा बळी गेला.

विमान कोसळले तेव्हा ऐश्वर्या हॉस्टेलच्या एका दुसऱ्या इमारतीत पाचव्या मजल्यावर झोपली होती. अचानक एक मोठा आवाज झाला. सर्वत्र धुराचे लोट पसरले. यामुळे तिची झोपमोड झाली. तिने उठून पाहिले असता सर्वत्र काळा धूर पसरला होता.

तिने परिस्थितीचा अंदाज घेतला आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत स्वतःला एका ब्लँकेटमध्ये गुंडाळले. त्यानंतर अंधार व धुराच्या गर्दीतून मार्ग शोधत पाचव्या मजल्यावरून खाली उतरली. असे करताना तिचा चेहरा, हात व पाय काही जागी भाजले. पण या दुर्घटनेत तिच्या हॉस्टेलमधील जवळपास 20 ते 25 प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा बळी गेला.

ऐश्वर्याने घाबरलेल्या अवस्थेत आपले वडील अमोल तोष्णीवाल यांना फोन केला. त्यांना घटनेची माहिती दिली. तिने फोन केला तेव्हा तिचे वडील अकोल्याच्या दुर्गा चौकातील आपल्या साड्यांच्या दुकानात होते. मुलीचा फोन येताच ते हादरले. आपले दुकान बंद करून ते तत्काळ घरी गेले. ते म्हणाले, टीव्हीवरील बातम्या पाहून आमचे डोके सुन्न झाले होते. पण देवाच्या कृपेने आमची मुलगी एवढ्या मोठ्या संकटातून बचावली.

ऐश्वर्याची आई माधुरी तोष्णीवाल व आजी-आजोबांच्या डोळ्यांतही यावेळी अश्रू तरळले. माझी नात नुकतीच माझ्या वाढदिवसासाठी आली होती. तिला अशा गंभीर प्रसंगाला सामोरे जावे लागले. ती सुखरूप असल्याबद्दल मी शंभरवेळा देवाचे आभार मानतो, असे ऐश्वर्याच्या आजोबांनी सांगितले.

: साप्ताहिक संवाद :

## गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी युपीआय

लोकरंग

आपल्या कष्टाच्या पैशाची शेअर मार्केट मध्ये योग्य पद्धतीने गुंतवणूक करून ठराविक कालावधीनंतर आपल्याला योग्य तो परतावा मिळावा यासाठीच शेअर मार्केट मधील ब्रोकर्सच्या माध्यमातून अनेक लोक आपला पैसा गुंतवतात. मात्र अनेकदा अनोळखी,त्रयस्थ अशा ब्रोकर्स अथवा दलाला कारवी गुंतवणूक दारांची फसवणूक होते. आणि अक्षरशः पैसा पाण्यात जातो. यासाठीच गुंतवणूकदारांची मध्यस्थांकरवी होणारी फसवणूक टाळण्यासाठी सेबीने युपीआय हि सेवा सुरु केली आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी सेबीने युपीआय सेवा सुरु केली आहे ती काय आहे?**

■ शेअर बाजारात विविध साधनांच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यासाठी अनेक गुंतवणूकदार ब्रोकर्स सारख्या मध्यस्थांची मदत घेतात. या मध्यस्थाकडे डिमॅट खाती उघडून त्यात रक्कम जमा करून त्याद्वारे हि गुंतवणूक तो मध्यस्थ अथवा ब्रोकर करतो. अशी रक्कम गुंतवणूकदारांकडून घेताना ब्रोकर्स किंवा त्रयस्थ गुंतवणूक यंत्रणेकडून गुंतवणूकदारांची फसवणूक होऊ शकते. हे टाळण्यासाठी त्या यंत्रणेला युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस [युपीआय ] ओळख क्रमांक आयडी दिला जाईल. त्यामुळे फसवणूक होणार नाही अशी हि सेबीची योजना आहे.

**या युपीआय आयडी मुळे गुंतवणूकदारांना कशा प्रकारे सुरक्षितता मिळणार आहे?**

■ युपीआय आयडी दिल्यामुळे गुंतवणूकदारांना पारदर्शक पेमेंट्स प्रणाली उपलब्ध होईल,जेणेकरून आर्थिक फसवणूक टाळता येईल. युपीआय आयडी सेबी नोंदणीकृत ब्रोकर्स किंवा निधी गोळा करणारे मध्यस्थ याना हक्क दिले जाणारा आहेत. या नाविन्यपूर्ण यंत्रणेमुळे रोखे बाजारातील आर्थिक सुरक्षितता आणि सुलभता लक्षणीय रित्या सुधारेल. यामुळे गुंतवणूकदारांना सुरक्षित पेमेंट चॅनेल उपलब्ध होईल.

**सेबी चेक हि सुविधा देखील सेबीद्वारे सुरु होणार आहे त्याबद्दल?**

■ गुंतवणूकदारांना सक्षम करण्यासाठी, बाजार नियामक सेबी चेक नावाची नवी सुविधा देखील लवकरच विकसित करणार आहे. सेबी चेक हे साधन गुंतवणूकदारांना युपीआय आयडी ची सत्यता पडताळणयासाठी गुंतवणूकदारांना सक्षम करेल.

असे करण्यासाठी गुंतवणूकदार एक क्युअर कोड स्कॅन करून किंवा युपीआय आयडी स्वतः भरून आणि नोंदणीकृत मध्यस्थांचे बँक खाते क्रमांकासारखे तपशील तसेच इंडियन फायनशिएल सिस्टीम कोड याची खातरजमा करून माहिती मिळवू शकेल.

■ ■ ■

## सरकारला आंदोलकांचे जीव घ्यायचे का?

### रोहित पवार संतापले

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १३ :

प्रहार संघटनेचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू आमरण उपोषणाला बसले आहेत. बच्चू कडू आणि आंदोलकांची प्रकृती बिघडली असून उपचारासाठी उपस्थित असलेल्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडील ईसीजी मशीन बंद असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

सरकारला बच्चू कडू यांच्यासह आंदोलकांचा बळी घ्यायचा आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रोहित पवार यांनी सरकारवर अनेक गंभीर आरोप करीत संताप व्यक्त केला आहे.

## वनजीव व जैवविविधता संवर्धनासाठी माध्यमांची साथ आवश्यक

### फॉरेस्ट पत्रकार कार्यशाळेत श्रीनिवास रेड्डींचे आवाहन



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १३ :

वन्युजीव व जैवविविधता संवर्धनसाठी प्रसारमाध्यमांची साथ ही काळाची गरज आहे. माध्यमांनी सकारात्मक दृष्टिकोनातून वनखाताच्या कार्यालाउजाळा दिल्यास संवर्धनाच्या प्रयत्नांना नवे बळ मिळू शकते, असे प्रतिपादन चंद्रपूर फॉरेस्ट अकॅडमीचे प्रमुख श्रीनिवास रेड्डी यांनी केले.

फॉरेस्ट अकॅडमीत वन्यजीव व जैवविविधता संवर्धन ' या विषयावर विदर्भातील निवडक पत्रकारांच्या तीन दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. समारोपप्रसंगी आढावा घेताना एस. रेड्डी बोलत होते.

सदर कार्यशाळेमुळे माध्यम प्रतिनिधींना वनविभागाच्या कार्यपद्धती, धोरणं, अंमलबजावणीतील आव्हाने, वन पर्यटन आणि पर्यावरणीय महत्त्व समजून सांगण्यात आले. चर्चासत्रात श्रीनिवास रेड्डी यांनी वनविभागाच्या योजनांची व्याप्ती, अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी व प्रसारमाध्यमांच्या सहभागाची गरज व्यक्त केली.

**विकासासाठी वन संवर्धन व्हावे : उमेश वर्मा**

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात उपसंचालक समन्वय उमेश वर्मा, नागपूर यांनी ह्यजंगलांचा शाश्वत विकास आणि माध्यमांची भूमिका या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जंगलांचे केवळ संवर्धन नव्हे, तर त्यावर आधारित आर्थिक विकासाचा विचारही आवश्यक आहे. महाराष्ट्राने या दृष्टीने पहिले पाऊल उचलले आहे.

ते पुढे म्हणाले, वन्यजीव कायदे अनेकदा कठोर वाटतात, पण जैवविविधतेच्या संवर्धनासाठी ते अपरिहार्य आहेत. संरक्षित जंगलं व खारफुटी क्षेत्र ग्लोबल वॉर्मिंग विरोधातील प्रभावी उपाय ठरत असून यासंदभार्तील कायदे व न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास आवश्यक आहे. जैवविविधतेचा व्यावसायिक वापर करताना स्थानिक लोकांना त्याचा लाभ मिळवून देणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.






**माधवबाग तर्फे योग-चालित प्रतिबंधात्मक आरोग्य चळवळ**

भारत मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग यासारख्या जीवनशैलीजन्य आजारांच्या वाढत्या घटनांशी झुंजत असताना, आयुर्वेद-आधारित हृदयरोगाच्या काळजीमध्ये अग्रणी असलेल्या माधवबागने योगाद्वारे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा चालविण्यासाठी आयुष मंत्रालयाशी हातमिळवणी केली आहे. २१ जून रोजी होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा (आयडीवाय २०२५) हा सहयोग आहे, ज्यामध्ये माधवबाग केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्था मुंबई यांच्या नेतृत्वाखालील राज्यव्यापी उपक्रमांना सक्रियपणे पाठिंबा देत आहे.भारतामध्ये सध्या हृदय आणि मधुमेहाच्या रुग्णांचा सर्वाधिक जागतिक भार आहे, ७७ दशलक्षाहून अधिक मधुमेह आणि हृदयरोगांमुळे चारपैकी एकाचा मृत्यू होतो.

जीवनशैलीच्या आजारांविरुद्ध आघाडीच्या संरक्षण म्हणून योगाला एकत्रित करून उपचारांपासून प्रतिबंधाकडे लक्ष केंद्रित करणे हे भागीदारीचे उद्दिष्ट आहे. १२ जून २०२५ रोजी माधवबाग खोपोली रुग्णालयाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १०० हृदयरोग्यांसाठी योग कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.

हा कार्यक्रम भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या सहकायार्ने आयोजित करण्यात आला होता आणि रुग्णालयाचे संचालक डॉ. रोहित साने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट योग आणि आयुवेर्दाद्वारे हृदयरोग्यांमध्ये समग्र आरोग्य आणि कल्याणाला प्रोत्साहन देणे होते. सहभागींनी मोठा उत्साह आणि समर्पण दाखवले आणि हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला. हृदयरोग्यांमध्ये योग आणि आयुवेर्दाला प्रोत्साहन देण्यासाठी रुग्णालयाचे प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहेत. हा कार्यक्रम भव्य यशस्वी झाला. ■ ■

: चला पर्यटनाला :

## केरळमधील अलेप्पी बॅकवॉटर



केरळ हे जगातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे, जे नयनरम्य सौंदर्य, हिल स्टेशन्स, बॅकवॉटर आणि तोंडाला पाणी आणणाऱ्या पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे.भारताच्या दक्षिण-पश्चिम टोकावरील देवाचा स्वतःचा देश म्हणून ओळखले जाणारे केरळ हे जगातील सर्वाधिक मागणी असलेले पर्यटन स्थळांपैकी एक आहे. केरळमध्ये भेट देण्यासाठी सर्वोत्तम पर्यटन स्थळांपैकी एक म्हणजे कोचीनपासून ५३ किलोमीटर अंतरावर असलेल्या अलेप्पी. अलेप्पी (किंवा अलप्पुझा) मध्ये चमकदार हिरवे बॅकवॉटर, पाम- फ्रिंग्ड तलाव, हिरवीगार भातशेती, रंगीबेरंगी सरोवर आणि १५० वर्षे जुने दीपगृह आहे. केरळमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळ म्हणजे टवटवीत आणि शांत बॅकवॉटर, ज्याला पूर्वेचे व्हेनिस म्हणून संबोधले जाते. बॅकवॉटरवर अर्धा दिवस किंवा पूर्ण दिवस बोट क्रूझ निवडा. अधिक साहसी साठी, रात्रभर समुद्रपर्यटन विचारा. अलेप्पी बीच हा दक्षिण भारतातील सर्वोत्तम समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे आणि हा तलाव, नद्या आणि बॅकवॉटर यांचा संगम आहे. मन्नारसाला मंदिर आणि सेंट मेरीचे सायरो-मलबार कॅथोलिक फोरेन चर्च देखील भेट देण्यासारखे आहे. कृष्णा पुरम पॅलेस चुकवू नका, जो पाथिनारुकेतू म्हणून प्रसिद्ध आहे. हा भव्य राजवाडा तत्कालीन त्रावणकोरचा राजा मार्तंड वर्मा याने बांधला होता आणि तो केरळ-शैलीतील वास्तुकला, शाही कलाकृती आणि भितिचित्रांसाठी प्रसिद्ध आहे, ज्यामुळे ते अलेप्पीमधील सर्वात लोकप्रिय ठिकाणांपैकी एक बनले आहे. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


**तिरुपती अर्बन को-ऑप. बँक लि.**
मुख्य कार्यालय : १७२, श्रद्धानंदपेठ, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर-१०.
फोन:०७१२ - २२३१७७२, २२३५६००, २२४९४६७

**जाहीर सुचना**

आम जनतेस सुचीत करण्यात येते की, बँकेची जनता कॉलेज चौक शाखा प्लॉट क्रमांक १०९/२५, वॉर्ड क्र. १ डी, बापट नगर, डॉ. मोरे क्लिनिक समोर, गजानन मंदिर चौक, नागपूर रोड, चंद्रपूर येथे सोमवार दिनांक २३/०६/२०२५ पासुन स्थानांतरीत होत आहे. जनता चौक शाखेच्या सर्व सन्माननीय ग्राहकांनी कृपया हयाची नोंद घ्यावी व आपले सर्व बँकींग व्यवहार सोमवार दिनांक २३/०६/२०२५ पासुन स्थानांतरीत वास्तु मधुन करावे हि विनंती.

मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक मंडळाचे आदेशान्वये

शाखेचा जुना पत्ता : अरिहंत बिल्डिंग, जनता कॉलेज चौक, नागपूर रोड, चंद्रपूर ४४२४०१

शाखेचा नविन पत्ता :प्लॉट क्रमांक १०९/२५, वॉर्ड क्र. १ डी, बापट नगर, डॉ. मोरे क्लिनिक समोर, गजानन मंदिर चौक, नागपूर रोड, चंद्रपूर ४४२४०१

नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ शनिवार, दि. १४, जून २०२५ ■


## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १३ :

रामटेक शहरातील अंबाडा वळणाजवळ असलेल्या वनविभागाच्या क्वॉटरमधील निवासी तसेच मृगविहार रामटेक येथे देखरेख करणारे कर्मचारी देविदास चौधरी यांचा मुलगा रितेश देविदास चौधरी (वय २४) याने घरी कोणीच नसल्याची संधी साधून दि.१२ जुन ला दुपारी दोनच्या सुमारास राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली.

प्राप्त माहितीप्रमाणे रितेश हा रोज दुधाला येथे निर्माणकार्य सुरू असलेल्या एका कंपनीत वेल्डिंगचे काम करायला जायचा. गुरुवारी मात्र तो कामावर न जाता घरीच राहिला. दुपारी त्याचे वडील शासकीय कामात व्यस्त होते, तर आई बाजारात किराणा आणायला गेली होती.

यादरम्यान घरी कोणीच नसल्याची संधी साधून रितेश याने नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आई ही किराणा घेऊन घरी परत येताच ही बाब तिला कळली. तिने लागलीच घटनेची माहिती पती देविदास चौधरी यांना दिली. घटनेची माहिती रामटेक पोलिसांना देण्यात आली.

## एम्स नागपूर येथे सर्वोत्तम पद्धतींबाबत आयोजित केलेल्या पहिल्या परिषदेचे
## केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) येथे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब आरोग्य कल्याण मंत्रालयाने आयोजित केलेल्या "सर्वोत्तम पद्धती" या विषयावरील पहिल्या परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केले. दोन दिवसांच्या या परिषदेत रुग्ण-केंद्रित काळजी, परिचालन कार्यक्षमता, डिजिटल परिवर्तन आणि शैक्षणिक उत्कृष्टता यावर लक्ष केंद्रित करून विविध एम्स संस्थांनी स्वीकारलेल्या अनुकरणीय पद्धती दर्शविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. देशभरातील एम्स संस्था, प्रधानमंत्री आरोग्य सुरक्षा योजना (पीएमएसएसवाय ) विभाग आणि संरक्षण मंत्रालय, या परिषदेत सहभागी आहे. केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी या परिषदेत उद्घाटनपर भाषण केले.




आरोग्य मंत्री नड्डा यांनी आपल्या भाषणात एम्सचे महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून स्थापन केलेली प्रत्येक एम्स प्रगत उपचार देखभाल, उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन उत्कृष्टतेची त्रिवेणी आहे. प्रादेशिक असमानता दूर करण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या स्थित, प्रत्येक एम्स आरोग्यसेवा नवोन्मेष आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून काम करते, जी समान, किफायतशीर आणि प्रामाण्यावर आधारित आरोग्यसेवा प्रदान करते. या संस्था सार्वजनिक आरोग्य प्रणाली मजबूत करण्यासाठी, निगाविषयक मापदंड उंचावण्यासाठी आणि आरोग्यसेवेतील धुरिणांची नवीन पिढी घडविण्यासाठी सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित करतात."

प्रत्येक नव्या एम्सच्या सर्वोत्तम पद्धती आणि नवोन्मेष इतर एम्ससोबत सामायिक करण्याच्या महत्त्वावर नड्डा यांनी भर दिला जेणेकरून त्यांचा व्यापक अवलंब आणि उपयोग होईल. या परिषदेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल आणि सर्वोत्तम पद्धती यावरील पहिल्या परिषदेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी एम्स नागपूरचे कौतुक केले. नड्डा यांनी परिषदेचे महत्त्व अधोरेखित करत अध्यापन- अध्ययन आणि संशोधन; रुग्णालय सेवा; आणि प्रशासन व रुग्ण सुविधा या तीन क्षेत्रात नव्या एम्सचा समृद्ध अनुभव संकलित करण्यासाठी ही परिषद हा अग्रगण्य उपक्रम असल्याचे सांगितले.

भविष्यात येणाऱ्या आरोग्यविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी डॉक्टरांना सज्ज करण्यात एम्सची महत्त्वाची भूमिका केंद्रीय मंत्री नड्डा यांनी अधोरेखित केली. ते असेदेखील म्हणाले की, अध्ययन-अध्यापनाच्या क्षेत्रात, स्पर्धेवर आधारित वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रम, डिजिटल शिक्षणात गुंतवणूक, अत्याधुनिक सिम्युलेशन प्रयोगशाळा आणि संरचित मार्गदर्शन कार्यक्रमांची अंमलबजावणी शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती दृढ बांधिलकी दर्शवते.

नव्या एम्स संस्था क्षेत्रीयदृष्ट्या समर्पक अभ्यास, नैतिक वैद्यकीय चाचण्या आणि अनुवादात्मक संशोधन यांच्या माध्यमातून भारताच्या वैज्ञानिक प्रगतीत अधिकाधिक योगदान देत आहेत. येत्या काळातील गुंतागुंतीच्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठीची गुरुकिल्ली असलेल्या आंतरशाखीय सहयोगाची जोपासना करण्याचे प्रयत्न होत असलेले पाहणे उत्साहवर्धक आहे हे देखील त्यांनी ठळकपणे सांगितले.

उपस्थितांना संबोधित करताना, केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव यांनी सरकारच्या वैद्यकीय शिक्षणात तसेच सार्वत्रिक आरोग्यसेवेत उत्कृष्टता या संकल्पनेला पुढे नेण्यात सर्व भागधारकांना असलेल्या महत्त्वावर अधिक भर दिला. संस्थात्मक विकास नेतृत्वाच्या दूरदृष्टीवर अवलंबून असतो हे अधोरेखित करत त्यांनी सर्वांना इतर संस्थांच्या सर्वोत्तम पद्धतींतून शिकण्याचे प्रोत्साहन दिले.

## जिचकार सभागृहातील लग्नाच्या जेवनातून
## ४० जणांना विषबाधा





■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. १३ :

गडचिरोली रोडवरील जिचकार सभागृहात १२ जुन गुरुवारला वाघमारे यांचेकडे झालेल्या विवाह सोहळ्या प्रसंगी उपस्थित नागरीकांना जेवनातून ४० ते ४५ जणांना विषबांधा झाल्याची घटना आज १३ जुनला सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आल्याने परिसरत एकच खळबळ माजली आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते चेतन पडोळे व शिवसेना नेते कैलास कोमरल्लीवार यांनी भिवापूर ग्रामीण रुग्णालयात भेट देत रुग्णांची विचारपूस केली.

गुरुदेव वार्डातील एकाच कुटुंबांतील ४ जणांना विषबांधा झाल्याची माहीती समोर आली आहे. यात वंश रामु नागपुरे, कोमल रामू नागपुरे, भाग्यश्री रामू नागपूरे,भुषण सुनिल नागपुरे,अश्विनी सचिन अंबादे, अल्का संदिप अंबादे, वर्ष ३४ व इतर रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचार करीत असून काही रुग्ण नागपूर मेडीकल कॉलेज येथे रेफर केले आहे.

तर काही रुग्ण खाजगी दवाखाण्यात उपचार घेत असल्याची यावेळी प्राप्त झाली असून अन्नातून विषबाधा झालेल्या रुग्णाचे नमुने घेण्यात आले असून ते प्रयोग शाळा नागपूर येथे पाठविण्यात आले आहे. रुग्णावर योग्य उपचार सुरू असून त्यांनी डफ्र चे पाणी, निंबु पाणी घ्यावे असा सल्ला आरोग्य अधिकारी डॉ आदित्य अस्वार यांनी दिली आहे. येथे डॉ. वाघ, डॉ. शाशी हे रुग्णावर योग्य उपचार करित आहेत.

## कामठी तालुक्यातील शासकीय निवासी शाळा
### डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या कामठी तालुक्यातील वारेगावच्या अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त प्रविण पुरी यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे हा पुरस्कार वितरीत करण्यात आला. हा पुरस्कार प्रादेशिक उपायुक्त डॉ.सिद्धार्थ गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, मुख्याध्यापक विलास गायकवाड व शुभांगी खापेकर यांनी स्वीकारला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात सदर शाळेमध्ये अनेक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. याचबरोबर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केले.

या शाळेत उपलब्ध सोयी-सुविधांमध्ये खगोलशास्त्र, गणित, भाषा, रोबोटिक,व्हर्च्युअल,




संगीत, संगणक व विज्ञान प्रयोगशाळा, ई-ग्रथांलय, सायन्स पार्क, साहस पार्क, खुली जीम, प्रशस्त क्रीडांगण आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

शाळेची भव्य व प्रशस्त इमारत असून विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेश, ट्रॅकसूट, सर्व सुविधांयुक्त निवास व्यवस्था, समतोल आहार, मॉड्युलर किचन, पिण्यासाठी निजंर्तुक पाण्याची व्यवस्था, चिलर वाटर प्युरीफायर, गिझर, बोलक्या भिंती या सुविधांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे.

सायन्स व ॲडव्हेंचर पार्क असलेली ही राज्यातील प्रथम शाळा म्हणून ओळखली जाते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासासोबतच शिस्त, स्वच्छता, आरोग्यदायी सवयी सांस्कृतिक कार्यक्रम यांचे अतिशय चांगल्या प्रकारे नियोजन करून उपक्रम राबविले जातात. येथे 200 विद्यार्थी प्रवेशित आहेत. मागील 5 वषार्पासुन शाळेचा S.S.C. बोर्डाचा निकाल 100% असून विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये स्थान प्राप्त करीत आहेत.

शाळेच्या यशासाठी दिवसरात्र धडपडणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सामुहिक सहकायार्तून ही निवासी शाळा उत्तरोत्तर यशाची नवी शिखरे पादाक्रांत करीत आहेत.

## अन्नत्याग आंदोलनास माणुसकी सुरक्षा रक्षक सेनेचा जाहिर पाठींबा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते संस्थापक अध्यक्ष बच्छुभाऊ कडु , अन्नत्याग आंदोलनास माणुसकी सुरक्षा रक्षक सेंनेचा पाठीबां जाहिर करण्यात आला आहे.बच्चुभाऊ कडु आपन समाजातील उपेक्षीत, शोषित आणी अन्यायग्रस्त वर्गाच्या हक्कासाठी लढा देत आहात. आपल्या अन्नत्याग आंदोलनाच्या माध्यमातुन आपन दिव्यांग कष्ठकरी शैतकरी मजुर, मागासवर्गीय, युवक यांच्या न्याय हक्क आणी अधिकारासाठी ऊभारलेला लढा अत्यंत प्रेरणादायी आणी प्रशंसनीय आहे. माणुसकी सुरक्षा रक्षक सेंना आपल्या संपुर्न मांगण्याना पुर्ण पाठींबा जाहिर करण्यात आला आहे. सामाजीक न्याय समानतेच्या या लढयात आम्हि आपल्या सहभागी होण्यास कटिबद्ध आहोत. समाजात सकारात्मक बदल घडावेत यासाठी माणुसकी संघटनेचे अध्यक्ष किशोर कुमरिया, उपाध्यक्ष रवि मारबते, सरचिटणीस गणेश भुसे, कार्याध्यक्ष सिद्धार्थ अडकणे, संपुर्ण संघटनेतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

## पावसाळ्यात ७२ ठिकाणी जलसंचय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

नागपुरात सलग अर्धा तास पाऊस पडला तरी नागपूरचे सर्व रस्ते जल जलमय होतात. चौका चौकात पाणी साचते. पाण्याचा निचरा होत नसल्याने दरवर्षी नागपूरकरांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागते. शहरात एकूण 72 ठिकाणी जलसंच होतो. 2023 मध्ये आलेल्या महापुरानंतर या जागांचा शोध घेण्यात आला.

त्यानुसार सिविल लाईन्स मध्ये नऊ ठिकाणी, नरेंद्र नगर भागात चार ठिकाणी, कळमन्यामध्ये सात ठिकाणी, गंजी पेठ 14, सुमत नगर भागात 14 ठिकाणी तर सक्करदरा येथे चार ठिकाणी पाणी साचते. यंदा महापालिकेने पाणी साचू नये म्हणून उपाय योजना सुरू केल्या असल्या तरी सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

## 'गीता मंदिर' परिसरात आज चार तास वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

महावितरणतर्फे 11 के. व्ही. गीता मंदिर वीज वाहिनी अंतर्गत येणाऱ्या परिसरातील विद्युत वाहिनीच्या अत्यावश्यक देखभाल आणि दुरुस्तीच्या कामासाठी शनिवारी, दिनांक 14 जून 2025 रोजी सकाळी 8:30 ते दुपारी 12:30 वाजेपर्यंत वीजपुरवठा बंद ठेवल्या जाणार आहे.

या नियोजित कामामुळे गीता मंदिर, कॉटन मार्केट, सुभाष रोड आणि इतर संलग्न परिसरातील ग्राहकांना सकाळी 8:30 ते दुपारी 12:30 वाजेपर्यंत या चार तासांसाठी वीज मिळणार नाही. पावसाळ्यापूर्वी विद्युत यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि भविष्यातील संभाव्य बिघाड टाळण्यासाठी ही कामे अत्यंत आवश्यक असून या कामामुळे पावसाळ्यात अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे. या कालावधीत ग्राहकांना होणाऱ्या दिलगिरी व्यक्त करीत यावेळी ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणे केले आहे.

## खर्‍र्याने घेतला तरुणाचा जीव

नागपूर : खर्रा दिला नाही म्हणून तरुणाने मित्रांशी वाद घातला. हा वाद विकोपाला गेला. मित्रांनी मिळून त्याला जबर मारहाण केली. लोखंडी कडा डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. यात उपचार मिळण्यापूर्वीच तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. आर्यन विलास वहिले (18) रा. विश्वकर्मानगर असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी मारहाण करणाऱ्या दोन्ही आरोपींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली. राहुल श्याम हजारे (24) आणि नागेश्वर उर्फ सोनू श्यामराव मसराम (23) दोन्ही रा. विश्वकर्मानगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आर्यन हा फुग्यांची सजावट करण्याचे काम करीत होता. त्याला दारूचेही व्यसन होते. आरोपी राहुल आणि नागेश्वर हे सुद्धा हेच काम करतात. त्यामुळे तिघांमध्ये चांगली मैत्री होती. कधी-कधी आर्यन अचानक घरून गायब होत होता. काही दिवस बाहेर राहिल्यानंतर तो परत घरी येत होता. घटनेच्या 8 दिवसांपूर्वीही तो असाच कोणाला काही न सांगता घरून निघून गेला.

## शालिनीताई मेघे रुग्णालय वानाडोंगरी येथे
### मोफत कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) वाटप शिबिराचे आयोजन २२ जून रोजी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

पुन्हा उभं राहणं शक्य आहे एस एम एच आर सी आणि रोटरीचा क्लब चा उपक्रम, वंचितांसाठी चालण्याचा दिला नवा दिलासा मध्ये भारतातील गरीब व गरजूंसाठी परवडणारी व दर्जेदार वैद्यकीय सेवा देणारे हे रुग्णालय आता समाजोपयोगी उपक्रमांमधूनही पुढे येत आहे.

या समाजसेवेच्या भावनेतून, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३०३०, रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ, आणि साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या सहकार्याने मोफत कृत्रिम हात व पाय (जयपूर फूट) वाटप शिबिराचे आयोजन रविवार, २२ जून २०२५ रोजी परिसरात, वानाडोंगरी, हिंगणा रोड, नागपूर येथे केले जात आहे.




हा उपक्रम आमदार समीर मेघे (हिंगणा विधानसभा क्षेत्र) यांच्या प्रेरणेतून आणि शालिनीताई दत्ता मेघे (माईसाहेब) यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केला जात आहे. जयपूर फूट ही एक आंतरराष्ट्रीय दर्जाची, खर्चिक नसलेली आणि परिणामकारक कृत्रिम टांग आहे, ज्यामुळे हजारो अपंग व्यक्तींना चालण्याची वआत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे.

समीर मेघे म्हणाले, माईसाहेबांकडून शिकलेल्या करुणा व सेवेच्या मूल्यांना ही एक नम्र मानवंदना आहे. हा माणुसकीचा सर्वोच्च सन्मान आहे. कॅम्पसचे संचालक डॉ. अनुप मरार यांनी यावर भर दिला आहे. आरोग्यसेवेला प्राधान्य देवून वाढवतो." रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थच्या अध्यक्षा मनीषा मंघानी म्हणाल्या, "रोटरी म्हणजे 'सेवा अबव्ह सेल्फ'. हे सहकार्य दिव्यांगांना पाठिंबा देण्याच्या आमच्या ध्येयाशी पूर्णपणे सुसंगत आहे. राजीव वरभे, अध्यक्ष, आदिवासी कल्याण समिती, रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०, यांनी नमूद केले, आरोग्य सेवा क्षेत्रात नेतृत्व दाखवले आहे. डॉ. सुधीर सिंह, वैद्यकीय अधीक्षक, यांनी सांगितले की, शिबिराचे नेतृत्व डॉ. वसंत गावंडे , प्रमुख, अस्थिरोग विभाग, करतील. त्यांच्यासोबत डॉ. शिवम गुप्ता, भाग्यश्री गोहाणे, अजय ठाकरे, डॉ. सीमा सिंग व नीरज कलीहारी यांची समर्पित टीम असणार आहे.अश्विन रडके, विशेष कार्य अधिकारी (सामुदायिक सेवा), यांनी माहिती दिली की, शिबिर रविवार, २२ जून २०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत शालिनीताई मेघे हॉस्पिटल वानाडोंगरी, नागपूर येथे होणार आहे. यात नोंदणी, तपासणी, अस्थिव्यंग मूल्यांकन, मोजमाप आणि नंतर कृत्रिम पायांचे निर्मितीप्रक्रिया केली जाईल. सुमारे ३० दिवसांत वितरण समारंभ होईल.

हा संपूर्ण उपक्रम पूर्णपणे मोफत असून, पूर्वनोंदणी आवश्यक आहे. नोंदणी व चौकशीसाठी संपर्क: राजीव वरभेः ९८२२६ ९७०९१ अश्विन रडकेः ९७६६९ १३७०७ वधवानीः ८०५५० ८८०८८पत्रकार परिषदेस ज्योती कपूर (अध्यक्ष, जयपूर फूट, आरआय डी 3030), क्लबचे सचिव-डॉ. अली अकबर मैनुम, वैद्यकीय संचालक-डॉ श्याम वाधवानी, अमित दास, संकेत सुरकार, डॉ. नुरूल अमीन व अन्य मान्यवर उपस्थित होते.


महासागर



: प्रभाग मित्र :

धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?

पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?

या... महासागर प्रभाग मित्र व्हा!

अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.

आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.

महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.

अर्जाच्या पाकिटावर 'महासागर प्रभाग मित्र' असा उल्लेख आवर्जून करा.

आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.

: अधिक माहितीसाठी :

9881717811, 9881717816

# नागपूर जिल्ह्यात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण वाढीस राज्य शासनाची मंजूरी

■ महासागर प्रतिनिधी, उमरेड, दि. १३ :

नागपूर जिल्ह्यात अलीकडेच काही गावांना नगरपंचायत दर्जा मिळाल्यामुळे जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या रचनेत मोठे बदल झाले. या अनुषंगाने निर्माण झालेला असमतोल दूर करण्यासाठी भाजप युवा मोर्चाचे नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष रोहीत सुधीर पारवे यांनी (दि.३०/०५/२०२५) ला राज्य शासनास लेखी निवेदन सादर करत नागपूर जिल्ह्यात व विशेषतः भिवापूर तालुक्यातील गट व गण रचना नव्याने करण्याची जोरदार मागणी केली होती.



या मागणीचा राज्य शासनाने गांभीर्याने विचार करत भिवापूर तालुक्यात जिल्हा परिषद गटांची संख्या २ वरून ३ आणि पंचायत समिती गणांची संख्या ४ वरून ६ करण्याचा निर्णय (दि. १२/०६/२०२५) ला तसे परिपत्रक काढून घेतला आहे. पूर्वी गटांच्या असमतोल रचनेमुळे विकास कामांच्या अंमलबजावणीमध्ये अडथळे येत होते. अनेक गावे नव्याने नगरपंचायत क्षेत्रात गेल्याने उर्वरित गावे असमतोल गटांत सामील करण्यात आली होती. यामुळे कार्यक्षेत्र वाढून लोकप्रतिनिधींना कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. रोहीत सुधीर पारवे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश येऊन ग्रामविकास विभागाने नव्याने गट व गण रचना केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य अधिक सक्षम व लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे. यासह भिवापूर तालुक्यात आता यापुढे २ ऐवजी ३ जिल्हा परिषद सदस्य तर ४ ऐवजी ६ पंचायत समिती सदस्य असणार आहेत.

या निर्णयाबद्दल रोहीत सुधीर पारवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे जाहीर आभार मानले आहेत.

यावेळी रोहीत पारवे म्हणाले कि, हा विषय राज्य सरकारच्या निदर्शनास आणून देत असतांना आमच्या पत्रकार महोदयांनी या विषयास वाचा फोडण्याकरीता फार मोठी मदत केली असून सर्व पत्रकार महोदयांचे देखील धन्यवाद देत आभार व्यक्त केले.

## एटीकेटीच्या आधारे घेता येणार अकरावीत प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

दहावी परीक्षेत एक किंवा दोन विषयांत नापास झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता शिक्षण विभागाने एटीकेटी प्रणाली लागू केली आहे. या माध्यमातून विद्यार्थी वर्ष वाया न घालवता थेट अकरावीत प्रवेश घेऊ शकणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे फक्त एक किंवा दोन विषय बाकी आहेत, त्यांना अकरावीत प्रवेश मिळेल. मात्र, यासाठी केंद्रीय प्रवेश समितीकडे एटीकेटीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. प्रवेश घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना उर्वरित विषयांत उत्तीर्ण होण्यासाठी दोन संधी दिल्या जातील, ज्यात जुलैतील पुरवणी परीक्षा आणि नंतर हिवाळी किंवा उन्हाळी परीक्षा घेतल्या जातील. ज्यांनी अकरावी प्रवेशासाठी सुरुवातीला नोंदणी केली नाही.

# विभागीय राजभाषा अंमलबजावणी समितीच्या १८३ व्या तिमाही बैठकीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

मध्य रेल्वे नागपूर विभागाच्या समाधान कक्षात विभागीय राजभाषा अंमलबजावणी समितीची १८३ वी त्रैमासिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) अमोल कुमार पिंगळे होते. यावेळी मुख्यालयातून पहिल्यांदाच बैठकीला उपस्थित राहिलेल्या उपमहाव्यवस्थापक (राजभाषा) विभावरी गोरे यांचे रोप भेट देऊन स्वागत करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात पिंगळे यांनी विभागातील राजभाषा हिंदीचा वापर आणि प्रगतीचे कौतुक केले आणि सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राजभाषा हिंदीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. दौरा कार्यक्रम, तपासणी अहवाल इत्यादी हिंदीमध्ये तयार करण्याचे, राजभाषेच्या नियमांनुसार काम करण्याचे आणि वेळेवर बैठका घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. विभागीय ग्रंथालयांचा प्रभावी वापर



करण्यावरही त्यांनी भर दिला.

मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचा प्रगती अहवाल राजभाषा विभागाने राजभाषा अधिकारी शंकर सिंह परिहार यांनी सादर केला. बैठकीत गेल्या तिमाहीत केलेल्या उत्कृष्ट कामाचे ठळक मुद्दे दाखवण्यात आले आणि अहवालाला एकमताने मान्यता देण्यात आली. तसेच, सहाय्यक विभागीय अभियंता वाय. अशोक यांनी पावसाळी सुरक्षेबाबत तांत्रिक सादरीकरण केले.

या प्रसंगी, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि अतिरिक्त मुख्य राजभाषा अधिकारी रूपेश कुमार चांदेकर, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला गुप्ता, वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी सुश्री सांझी जैन, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल, वरिष्ठ विभागीय वित्त व्यवस्थापक विवेक खोके, वरिष्ठ विभागीय यांत्रिकी व्यवस्थापक मोहित मांडलेकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, शाखा प्रमुख आणि स्थानक राजभाषा समितीचे सदस्य उपस्थित होते. सभेच्या शेवटी आभार प्रदर्शन राजभाषा अधिकारी शंकर सिंह परिहार यांनी केले. आशिष धकाते, विजया घाटे, राजेश साहू, रॉबी, या संमेलनाच्या यशस्वी आयोजनात पद्मिनी बिंद आणि सहाय्यक प्रकाश निहाल यांचे कौतुकास्पद योगदान होते.

# तीथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा

■ महासागर प्रतिनिधी, कोराडी, दि. १३ :

सकल हिंदू समाज मार्फत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथी प्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा महादुला टी पॉइंट येथे खूप उत्साहात पार पडला, सकल हिंदू समाज चे महादुला सेवाधारी शरद वांढे यांनी सपत्नीक शिवाजी महाराजांच्या फोटो पुढे अभिषेक केला



संपूर्ण महादुला वस्तीतून शिवरायांची पालखी, ढोलताशांच्या गजरात काढण्यात आली. रॅली टी पॉइंट वर पोहोचता क्षणी भगवे झेंडे, भगवे फेटेधारी लहान बालके मुले मुली ढोल ताशे च्या तालावर ठेका धरत होते. टी पॉइंट मध्ये शिवरायांच्या मावळ्यांनी तलवारबाजी, मराठे कालीन मैदानी धांडपट्टा, चे अतिशय थरारक दृश्य लोकांसमोर पेश केले.

या कार्यक्रमाची ज्या वेळी दृश्य मराठमोळे मावळे, नर रागिणी करत असताना शिवाजी महाराज की जय, ओम नमो परवते फते हर हर महादेव.... तसेच छावाचा डायलॉग म्हणत एकच स्फुरण चढत होते.

नंतर मंचावर उपस्थित मान्यवरांचे भगवा फटका बांधून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात योगेश वाधुळ कर, सरपंच कोराडी नरेंद्र धणुले, महादुला नगराध्यक्ष राजेश रंगारी, सामाजिक कार्यकर्ते मनोज सावजी, नरेंद्र झोड, दीपक जैन, हनुमंता लष्करे, जितू भगत, पौर्णिमा भिलावे, माजी नगरसेविका नलिनी धुळस, माजी नगरसेविका गुंणवंता पटले, माजी नगराध्यक्षा कांचन कुथे उपस्थित होते. संचालन वाशिमकर या मुलीने केले. सर्वांना आल्पोहर देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सफलतार्थ सकल हिंदू समाजचा सिंहाचा वाटा होता.

# भदंत हर्षबोधी महास्थवीर यांची भीम सेनेचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून नियुक्ती




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

बिहारमधील महाबोधी चॅरिटेबल ट्रस्ट बोधगयाचे अध्यक्ष भदंत हर्षबोधी महास्थवीर आज औपचारिकपणे भीम सेनेत सामील झाले आहेत. या अभिमानास्पद प्रसंगी, त्यांना भीम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीधर साळवे यांनी पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदाची जबाबदारी दिली आणि नियुक्ती प्रमाणपत्र दिले.

भदंत हर्षबोधी महास्थवीर यांचे भीम सेनेत सामील होणे मिशनला नवीन दिशा आणि ऊर्जा प्रदान करेल. पक्षाचे "प्रबुद्ध भारत" हे ध्येय देशाच्या कानाकोपऱ्यात नेण्याच्या संकल्पाने आपण पक्षात सामील झाल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बिहार विधानसभा निवडणुका आणि महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रभावी भूमिका बजावेल. तसेच, या ध्येयाला बळकटी देण्यासाठी, भिक्षू आणि कार्यकर्त्यांची एक मजबूत टीम तयार केली जाईल ही विचारसरणी लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करेल.

भदंतजींनी पक्षाची विचारसरणी, कार्यशैली आणि राष्ट्रहितासाठी केल्या जाणाऱ्या कामाचे कौतुक केले आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आणि सामाजिक परिवर्तनाच्या या मोहिमेत ते आपली महत्त्वाची भूमिका बजावतील अशी माहिती श्रीधर साळवे आणि राकेश धारगावे यांनी दिली.

## मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांसाठी सेमिनारचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये आर्थिक साक्षरता व सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, स्टेट बँक ऑफ इंडिया तर्फे आज दिनांक 13 जून 2025 रोजी दुपारी 4 वाजता कार्यालय, नागपूर येथील गुंजन सभागृहात एक माहितीपूर्ण सेमिनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मध्य रेल्वे नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या सेमिनारमध्ये SBI अधिकाऱ्यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी खास डिझाइन केलेल्या रेल्वे सॅलरी पॅकेज व ग्रुप टर्म इन्शुरन्स विषयी सविस्तर माहिती दिली. या पॅकेजमध्ये शून्य किमान शिल्लक रक्कम, मोफत इंटरनेट बँकिंग, अमर्याद RTGS/NEFT व्यवहार, तसेच व्याज उत्पन्न वाढवण्यासाठी ऑटो स्वीप सुविधा यांचा समावेश आहे.

कर्मचाऱ्यांना ड्युटीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्यू झाल्यास 10 लाख अतिरिक्तसह 100 लाख पर्यंतच्या वैयक्तिक अपघाती विमा कव्हरबाबत माहिती देण्यात आली. तसेच मोफत डेबिट कार्ड, मासिक मल्टी-सिटी चेक बुक्स, लॉकर भाड्यात सवलत, 10 लाख ग्रुप टर्म लाईफ इन्शुरन्स, व विशेष अटींनुसार 160 लाख पर्यंतचे हवाई अपघाती विमा कव्हर यांचा समावेश आहे.

## न.प. हायस्कूलमध्ये ११ वी ऑनलाइन प्रवेशाची सुरुवात वृक्षारोपणाने



■ महासागर प्रतिनिधी कळमेश्वर, दि. १३ :

शासनाने संपूर्ण विद्यार्थ्यांचे अकरावीचे ऑनलाईन प्रवेश सुरू केले आहे. इन हाऊस कोट्यातून ता १२ जून पासून सुरुवात करण्यात आली. पीएमश्री नगरपरिषद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथील उपक्रमशील मुख्याध्यापिका पोर्णिमा मेश्राम या शाळेत नेहमीच विविध उपक्रम राबवित असतात वर्ग ११ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला आठवण राहावी म्हणून मुख्याध्यापिका पौर्णिमा मेश्राम यांनी प्रथम प्रवेश घेणारा विद्यार्थी नोमित अमोल भारती व त्याची आई सुकेशिनी यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षरोपण करून घेतले व रोपट्याचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी दिली दिलेल्या जबाबदारीचा विद्यार्थ्याला आनंद झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका पौर्णिमा मेश्राम, शिक्षक गणेश तिडके, मनीष हेडाऊ, लिपिक आशिष देशमुख, रुपेश सावरकर व अन्य विद्यार्थी उपस्थित होते.

# रेल्वे कर्मचाऱ्यांशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

रेल्वे कर्मचाऱ्यांशी संबंधित समस्या आणि समस्या सोडवण्यासाठी, कार्मिक विभागाकडून दरवर्षी नागपूर विभागात रेल्वे प्रशासन आणि संघटना यांच्यात दोन अनौपचारिक बैठका घेण्याचा प्रस्ताव आहे. २०२५ वर्षासाठी पहिली अनौपचारिक बैठक १२ जून२०२५ रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या सभागृहात रेल्वे प्रशासन आणि दक्षिण पूर्व रेल्वे ओबीसी, रेल्वे कर्मचारी संघटना नागपूर यांच्यात विभागणीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता, दक्षिण पूर्व रेल्वे नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि दक्षिण पूर्व रेल्वे ओबीसी, रेल्वे कर्मचारी संघटना नागपूरच्या वतीने विभागीय अध्यक्ष प्रणय कोकस आणि



विभागीय सचिव पी. मनोहर राव यांच्या उपस्थितीत झाली.

बैठकीत कर्मचाऱ्यांशी संबंधित एकूण २७ समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यापैकी अनेक समस्या संबंधित शाखा अधिकाऱ्यांनी तात्काळ सोडवल्या.

प्रमुख मुद्दे जसे कीः- एचआरए भत्त्याशी संबंधित समस्या, पॉइंटमन ड्युटी रोस्टरसाठी जॉब विश्लेषण अहवाल (१२ तासांवरून ८ तासांपर्यंत), सीएलआय (क्रू लॉबी इन्स्ट्रक्टर) च्या एकत्रित ज्येष्ठतेची मागणी तात्काळ सोडवण्यात आली आणि वैद्यकीय विभागाशी संबंधित काही समस्या देखील सोडवण्यात आल्या.

रेल्वे प्रशासन कर्मचाऱ्यांच्या हितासाठी आणि कल्याणासाठी सतत वचनबद्ध आहे आणि भविष्यातही संवादाची ही सकारात्मक प्रक्रिया सुरू ठेवली जाईल. उर्वरित समस्या निर्धारित तारखेपर्यंत सोडवण्याचे आश्वासन रेल्वे प्रशासनाने दिले.

## मनपाच्या ज्येष्ठ नागरिक कक्षातर्फे वृक्षारोपण

नागपूर : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'एक पेड माँ के नाम 2.ड' अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या वतीने वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. नागपूर महानगरपालिकेच्या ज्येष्ठ नागरिक कक्ष आणि सिनियर सिटीझन कौन्सील ऑफ नागपूर डिस्ट्रीक्टद्वारे शुक्रवारी(ता.१३) रोजी ज्येष्ठ नागरिक कक्षाच्या आवारात वृक्षारोपन करण्यात आले आहे. याप्रसंगी मनपा ज्येष्ठ नागरिक कक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष वसंतराव पाटील, सचिव सुरेश रेवतकर, विधी सल्लागार ॲड. मोरेश्वर उपासे, काशिनाथ धांडे, भगवान टिचकुले, नागपूर स्मार्ट सिटीचे परिमल इनामदार, प्रदीप खर्डेनवीस उपस्थित होते.

# मित्रजणांचा स्नेहमेळाव्याप्रसंगी जागृत झाली १९९८ ची तरूणाई

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १३ :

जुन्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता तालुक्यातील धानला येथील सर्वोदय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय धानला येथे १९९८ बॅच मध्ये दहावी मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनी मिळून कौटुंबिक मित्रजणांचा स्नेहमेळावा '१९९८ 'मित्र' एक नातं रक्ताच्या पलीकडचं..' आयोजन जीबी क्लब भंडारा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात जीबी क्लबच्या प्रांगणात राष्ट्रगीत करून विद्यार्थ्यांच्या हस्ते माता सरस्वतीचे पूजन आणि द्विप प्रज्वलीत करून करण्यात आले.

या मेळाव्याला १९९८ च्या बॅच मधील दहावीत शिकणारे ७५ विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले. पहिल्या सत्रामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय व कोण कुठे काम करतो याची माहिती दिली. दुसऱ्या सत्रामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात



### जुन्या स्मृतींना उजाळा देण्याचा उपक्रम

आले, त्यात गीत गायन, डान्स व इतर कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमात स्वतःचे वय विसरून सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या अंगात १९९८ ची तरुणाई संचारलेली होती.

या मेळाव्याला मौदा. नागपूर, भंडारा जिल्हातून तत्कालीन विद्यार्थी उपस्थित झाले. मित्र यांचे तर्फे फोटो व भेटवस्तू सर्व विद्यार्थ्यांना भेट देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून हा दिवस अविस्मरणीय आहे, प्रत्येक क्षण आपण सर्वांनी आनंदानी घालवला त्यानिमित्ताने जुन्या आठवणीना उजाळा मिळाला तर नवीन आठवणी मनात कायम घर करून गेल्या अशा भावना व्यक्त केल्या.

या मेळाव्याला रवी चिंचखेडे, अरुण देशमुख, शालिनी मेश्राम, राजेश पराते, ज्योती चरडे, योगेश किरपान, शुभांगी बारस्कर, सुशेण कांबळे, निरंजन देशमुख, नंदू तिरपुडे, वनिता थोटे, सुनीता बडवाईक, वाणी घंटा, रजनी घंटा, संगीता धोटे, दिपाली सौलंकी, विनायक चरडे, छाया शेंडे, कविता रोडे, मनोज कांबळे, हरिराम राजगिरे, राजु ठोंबरे, मुकेश ठोंबरे, संजय मते, विनोद शेंडे, विजय भांडारकर, मनीष मते, विलास वैरागडे, विनय राजगिरे, अजय रोडे, वैशाली थिगडे, चंद्रकला पत्रे सहभागी झाले.

## प्रहार जनशक्ती वतीने मुंडण आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. १३ :

तहसील कार्यालयांच्या प्रांगणात प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या शेतकरी कर्जमाफी व इतर १० मागण्या मान्य करण्यासाठी बेमुदत अन्नत्याग आंदोलन मोझरी येथे सुरू आहे. या आंदोलनाला समर्थन देत भिवापूर प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने तालुकाध्यक्ष रोशन गायधने यांच्या वतिने आज १३ जुन ला सकाळी ११ वाजता मुंडन आंदोलन सुरु करण्यात आले. यावेळी मुंडन करणाऱ्या मध्ये रोशन गायधने, प्रविन भुरे, जनार्दन नाईक, अमोल धनविजय, लेकचंद भोयर, रमेश धोटे, विष्णु मेश्राम, गणेश जांबुळ, बडू गोवे, बबन गुरुले यांनी मुंडन करून घेतले. यावेळी अनिल लिंगायत, रमेश कामडी, विष्णु मेश्राम, राजु तांबे, सतिश राठोड, किसन सोमाजी बोरकर, राजेश बोरकर, राजेश भोयर, गणेश जांभुळे, प्रभाकर बुचे, रमेश झाडे यांनी भेट देवून सुरू असलेल्या आंदोलनाला आपला पाठिंबा दिला.

## प्रहार अध्यक्ष बच्चू कडू यांचा अन्नत्याग आंदोलनाला

# किशोर बेलसरे यांचे समर्थन

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १३ :

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मेंढपाळ, बेघर, कामगार इत्यादी असंघटीतांच्या प्रश्नावर गुरूकुंज मोझरी येथे रविवार (दि.८) जुन पासून अन्नत्याग आंदोलन सुरू केलेले आहे.

ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या बेमुदत आमरण उपोषण अन्नत्याग आंदोलना ला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष किशोर बेलसरे यांनी मोझरी येथे जाऊन निवेदन देऊन समर्थन जाहीर केले.

या प्रसंगी पारशिवनी शहर कार्याध्यक्ष पूरणदास तांडेकर, श्रीराम नांदूरकर, देवीदास तडस, नरेश हिंगे, सतीश बेलसरे, श्याम मेश्राम, गणेश पानतावणे, कमलेश शर्मा आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभाध्यक्ष, फ्रंटल सेल व जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या तालुक्यात तहसीलदार यांना निवेदन द्यावे. जमल्यास मोझरी येथे जाऊन आपल्या लेटर हेड वर समर्थनात पत्र द्यावे व समर्थन घोषित करावे अशी विनंती किशोर बेलसरे जिल्हा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार नागपूर जिल्हा ग्रामीण यांनी केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४१ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. शुक्रवार (ता.१३) रोजी शोध पथकाने ४१ प्रकरणांची नोंद करून ५३,५००/- रुपयाचा दंड वसूल केला.



हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० /- दंड) या अंतर्गत १९ प्रकरणांची नोंद करून ७६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून ४००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल,उपहारगृहे,लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल सिनेमाहॉल,मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्त्यावर कचरा टाकणे (रू.२,०००/-) या अंतर्गत ०३ प्रकरणांची नोंद करून ६,०००/- रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ०९ प्रकरणांची नोंद करून ७५००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशॉप, गराज, व इतर दुरुस्तीचे व्यावसायीकांने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, आशा ठिकाणी कचरा टाकणे(रू.१०००) या अंतर्गत ०१ प्रकरणाची नोंद करून १,०००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. सार्वजनिक रस्ता,फुटपाथ,मोकळी जागाअशा ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे अंतर्गत ०६ प्रकरणांची नोंद करून रू. २२,०००/-रूपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १५ प्रकरणांची नोंद करून ३,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ०६ प्रकरणांची नोंद करून ६,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या मे. मा वैष्णवी इन्फ्रा आणि मे. सराक्षी नेत्रालय यांच्याकडून रस्त्यालगत सीएन्डडी कचरा टाकल्या प्रकरणी प्रत्येकी ५,००० असे एकूण रु. १०,०००/- रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच मे. लिटील मिलिनियम स्कुल यांच्याकडून विनापरवानगी विद्युत खांबावर फलक लावल्याबददल रू.५,000/- ची वसुली करण्यात आली. धरमपेठ झोन अंतर्गत येणाऱ्या मे लक्ष्मी केशव कॉन्स्ट्रशन यांच्याकडून रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्या प्रकरणी रू. १०,००० चा दंड वसूल करण्यात आला.

हनुमान नगर झोन अंतर्गत येणाऱ्या मे. मार्कंडेय रेसिडेन्सी यांच्याकडून रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्या प्रकरणी रू. १०,००० चा दंड वसूल करण्यात आला. धंतोली झोन अंतर्गत विक्रम जयस्वाल यांच्याकडून रस्त्यालगत सीएन्डडी कचरा टाकल्याप्रकरणी रू.५,००० चा दंड वसूल करण्यात आला. नेहरूनगर झोन अंतर्गत येणाऱ्या केतकी ट्रेडर्स यांच्याकडून रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्या प्रकरणी रू. १०,००० चा दंड वसूल करण्यात आला.

**CHANGE OF NAME**

I, Shahina Begum W/o. Abdul Basit Ansari R/o. Takiya Diwan Shah Mominpura, Nagpur. Have Changed My Name to **Shahina Begum Abdul Basit Ansari** for all future purposes. 14.06.2025

# आय.टी.आय. निदेशकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी आमदार अडबाले यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १३ :

नागपूर विभागातील आय.टी.आय. निदेशकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या निवारणासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर येथे एक महत्त्वपूर्ण सहविचार सभा संपन्न झाली. या बैठकीत आमदार सुधाकर अडबाले व प्रादेशिक सहसंचालक मोडघरे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.



या सहविचार सभेमध्ये निदेशकांच्या पुढील महत्त्वाच्या समस्या मांडण्यात आल्या व तत्काळ उपाययोजनांसाठी सूचना करण्यात आल्या : रिक्त असलेली गटनिरीक्षक पदे तात्काळ पदोन्नतीद्वारे भरावीत. अनेक निदेशकांचे वेतन मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. प्रशिक्षणासाठी संस्थांच्या मागणीप्रमाणे आवश्यक कच्चा माल वेळेवर उपलब्ध करून द्यावा. प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणारे विद्या वेतन व शिष्यवृत्ती वेळेवर अदा करावी. सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ तात्काळ वितरित करावेत. या संदर्भात आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रादेशिक कार्यालयाला ठोस पावले उचलण्याचे निर्देश दिले. या बैठकीस महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटनेचे अध्यक्ष प्रेमानंद बैसारे, सचिव सचिन माळीचकर, विभागीय संपर्कप्रमुख शिवाजी ढुमणे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, नागपूर महानगर कार्यवाह अविनाश बडे, कार्याध्यक्ष अरुण कराळे, मार्गदर्शक संजय मस्के, धनंजय पाटील, उपाध्यक्ष जितेंद्र टोंगे, खजिनदार मुकेश मेश्राम, सहसचिव विपिन मेश्राम, सदस्य धीरज सव्वालाखे, अपील रंगारी, महिला सदस्य माधुरी बालपांडे, माजी सचिव धनंजय पाटील, माजी अध्यक्ष अविनाश गभणे यांच्यासह नागपूर विभागातील विविध जिल्ह्यांतील आय.टी.आय. निदेशक उपस्थित होते.

## तडीपार गुंडास अटक

**नागपूर:** वाडी पोलिसांनी गस्ती दरम्यान एका तडीपार गुंडाला विना परवानगी शहरात फिरताना अटक केली. सूरज उर्फ मूसा मोरेश्वर वानखेडे (39) रा. आंबेडकरनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मूसा हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. गेल्या वर्षी 28 नोव्हेंबरला परिमंडळ क्र. 1 च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला दोन वर्षांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. सोमवारी सायंकाळी वाडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मूसा विना परवानगी आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी घरी आला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. त्याच्याविरुद्ध तडीपारीचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला.

# भोसला इन्स्टिट्युट देणार प्रशासकीय सेवा मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी भोसला इन्स्टिट्युट सुरू करीत असून त्याद्वारे प्रशासनिक सेवा मार्गदर्शन केले जाणार असल्याची घोषणा सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शैलेश जोगळेकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.




राष्ट्र सर्वप्रथमचे या मूल्यांना पुढे नेत सीएचएमईएस नागपूर, महाराष्ट्र व जवळच्या राज्यांमधून प्रशासनिक लोकसेवा परीक्षेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी भोंसला इन्स्टिट्युट सुरू करीत आहे. भोंसला ईंस्टिट्यूटचे ध्येय म्हणजे भविष्यातील प्रशासकांचा एक कॅडर तयार करण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण, विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य निर्माण, राष्ट्र प्रथम दृष्टिकोनाला प्रोत्साहन, उच्च शिक्षणाला वास्तविक जगाशी जोडणे, पूर्णपणे समर्पित अनुभवांशी एकरूप होण्यासाठी, क्षमता बांधणीद्वारे भविष्यातील नेते, प्रशासक, प्राध्यापक तयार करण्यासाठी व जीवनाच्या सर्व क्षेत्रात राष्ट्र उभारणीत सहभागी होण्यासाठी तरुणांना तयार करणे आहे, असे शैलेश जोगळेकर म्हणाले. मुख्य समन्वयक कविता जाधव यांनी सांगितले की, भोंसला ईंस्टिट्यूट 7 जुलैला 293, सीताराम स्मृती, वेस्ट हायकोर्ट रोड, धरमपेठ येथे ही संस्था राहील. वातानुकूलित वर्ग, व्याख्यान व चर्चा कक्ष, ग्रंथालय राहील.

शनिवारी 14 जूनला रामदासपेठेतील हॉटेल सेंटर पॉइंटमध्ये सायंकाळी 5.30 वाजता मोफत व्याख्यान होईल. प्रथम येणाऱ्या 200 जणांना प्रवेश राहील. त्यासाठी दुपारी 4.30 वाजता नोंदणी करावी लागेल. ईंस्टिट्यूट प्रवेश प्रकिया धरमपेठेत सोमवारी 16 जूनला सुरू होईल. प्रवेश परीक्षा राहील. ती उत्तीर्ण करणाऱ्या गुणवत्तेनुसार 25 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे तरुण पटेल व राहुल दीक्षित पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

संस्थेत प्रशिक्षणाचे चार मॉड्युल रहातील. पहिल्या मॉड्युलमध्ये बारावी उत्तीर्ण किंवा दहावी ते बारावीत शिकणाऱ्यांना प्रवेश राहील. यांच्यासाठी 3 महिन्यांचा फाऊंडेशन कोर्स राहील. दुसऱ्या मॉड्युलमध्ये पदवीधरांना प्रवेश राहील. त्यांना 10 महिन्यांचा प्रिपरेशन फॉर प्रिलिमिनरी एक्झामिनिशन हा अभ्यासक्रम राहील. तिसऱ्या मॉड्युलमध्ये पदवीच्या अंतिम वर्षात शिकत असलेले तसेच पदवीधर, पदव्युत्तर किंवा नोकरी करीत असलेल्यांना प्रवेश राहील. त्यांना 15 महिन्यांचा प्रिलिमिनरी व मेन एक्झामिनिशन अभ्यासक्रम राहील. चवथ्या मॉड्युलमध्ये पदवीच्या अंतिम वर्षात शिकत असलेले तसेच पदवीधर, पदव्युत्तर किंवा नोकरी करीत असलेले आणि यूपीएसी व एमपीएससीसाठी झोकून दिलेले विद्यार्थी यांना प्रवेश राहील. त्यांना 16 महिन्यांचा प्रिलिमिनरी व मेन एक्झामिनिशन व मुलाखत अभ्यासक्रम राहील.

# सोनबानगरात बिरसा मुंडा यांना अभिवादन

## आदिवासी समाजाच्या हक्कासाठी लढणाऱ्या क्रांतिवीराला मानाचा मुजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १३ :

लाव्हा ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या सोनबा नगरातील जननायक बिरसा मुंडा यांच्या १२५ व्या स्मृतिदिनानिमित्त जय बिरसा आदिवासी महिला बचत गटाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात पुतळ्यासमोर अगरबत्ती व मोमबत्ती प्रज्वलित करून करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य शारदा मरसकोल्हे व मुरली कंगाले यांनी पुतळ्याचे पूजन करून हार अर्पण केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार बोरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुरली कंगाले व माधुरी गोडांगे यांची उपस्थिती होती. शारदा मरसकोल्हे यांनी प्रास्ताविक केले. संचालन जगदीश मरकाम यांनी तर आभार मनीष उके व मुरली कंगाले यांनी मानले.

या प्रसंगी बोलताना अध्यक्ष बोरकर म्हणाले, धरतीचे आबा बिरसा मुंडा यांनी जल, जंगल, जमीन यावर आदिवासींच्या हक्कासाठी वयाच्या विसाव्या वर्षीच ब्रिटिश सत्तेच्या विरोधात उभं राहत लढा दिला आणि वयाच्या २५ व्या वर्षी शहीद झाले. त्यांचे जीवन हे आजच्या बहुजन समाजातील एससी, एसटी, ओबीसी युवकांनी आदर्श मानावे.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माला नेताम, सत्यभामा शिंदे, जयश्री धुर्वे, दुर्गा मळावी, माधुरी गोडांगे, गीता श्रीरामे, कौशिक बंगाले, विशाल गोडांगे, आयुष नेताम यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाला आदिवासी समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते, यामुळे स्मृतिदिनाला भावपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरण लाभले.

# रेल्वे प्रवाशांचा आता डिजिटल पेमेंटवर भर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील रेल्वे प्रवासी आता क्यूआर कोड स्कॅन करून तिकिटे काढण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे गेल्या सहा महिन्यांत डिजिटल व्यवहार २२ टक्क्यांवर पोहोचला आहे. मध्य रेल्वेचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा महिन्यात २२.१० टक्के ग्राहक रांगेत उभे राहून काढण्यापेक्षा क्यूआर कोड किंवा मोबाइल वरच्या यूटीएस ॲपच्या माध्यमातून तिकिटा काढत असल्याने रांगेतील गर्दी कमी झाली आहे. मुख्यतः ग्राहकांनी आता रांगेत उभे राहून तिकीट काढण्यात वेळ घालविण्यापेक्षा क्यूआर कोड स्कॅन करून तिकिटे काढण्याला महत्व दिल्या जात आहे. मध्यवर्ती नागपूर रेल्वे स्थानकांवरील तिकीट काउंटरवर तासनतास उभे तिकिटे काढण्याचा प्रकार कंटाळवाणा आणि त्रासदायक ठरत असल्याने प्रवासी वैतागून जातात. मध्य रेल्वेने गेल्या वर्षी प्रत्येक स्थानकावरच्या बुकिंग काउंटरवर आरक्षित किंवा अनारक्षित तिकीट क्यूआर कोडची व्यवस्था प्रवाशाची सुविधा झाली आहे.

## ओएचईची दुरुस्ती केल्यामुळे रेल्वे मार्ग सुरुळीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील येलखेड-अकोलादरम्यान वादळामुळे एक मोठे झाड ओव्हरहेड इलेक्ट्रिक वायरवर (ओएसई) कोसळले. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी मुंबई-नागपूर रेल्वेमार्गावरील वीजवाहिनीत अडथळा झाला. परिणामी, काही गाड्या शेगाव व अन्य स्थानकांवर थांबविण्यात आल्या तर काही गाड्या नागपूर स्थानकावर विलंबाने दाखल झाल्या. मध्य रेल्वेकडून तातडीने दुरुस्ती केल्यामुळे हा मार्ग सुरुळीत करण्यात आला आहे. बुधवारी दुपारी ३.०५ वाजता येलखेड स्थानकाचे डिप्टी स्टेशन मास्तर यांना वादळामुळे येलखेड-अकोला दरम्यान रेल्वेमार्गावर झाड ओएचईवर कोसळल्याची माहिती मिळाली. यानंतर कर्मचारी त्वरित घटनास्थळी दाखल झाले. रेल्वे प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करून टॉवर वॅगनच्या साहाय्याने दुरुस्तीचे काम सुरू केले. सायंकाळी ओएचईचे दुरुस्तीकार्य पूर्ण करून रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात आली. दरम्यान काही गाड्या शेगाव व अन्य स्थानकांवर थांबविण्यात आल्या होत्या.

# विहिरीत पडलेल्या बिबट्याला रेश्क्यु टिमने दिले जीवनदान



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १३ :

तालुक्यातील देवळी पेंढरी शिवारातील रमेश उईके यांच्या शेतातील विहीर मध्ये बिबट्या पडला. त्याला वनविभागाच्या रेस्क्यु टिमने सुखरूप बाहेर काढुन जीवनदान दिले.

आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास शेतकऱ्यांना हे बिबट दिसले. याची माहिती माजी सरपंच पंकज तेलंग यांना कळताच त्यांनी कवडस वनविभागाला माहिती दिली. आरएफओ शालीनी शिरपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एच. डी भेंडे, एच. एन. भुरे, टीटीसीचे डॉ. प्रियल चौरागडे, व वनविभागाच्या इतर कर्मचारी यांनी मोठ्या प्रयासाने दुपारी तीन वाजताच्या सुमारास बिबट्याला सुखरूप बाहेर काढले. त्याच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार करून रात्री उशिरा नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी एक अस्वल आपल्या दोन पिलांना घेवून नदीजवळ आली होती. कदाचित त्यांच्या पाठलाग करताना सदर बिबट विहीरीत पडला असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र शेतात या वन्यप्राण्यांच्या वावराने गावकरी घाबरले आहेत.

# ६५ कुटुंबांना एकत्र आणून संस्कृती आणि मूल्यांचा आनंदोत्सव केला साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल, नागपूर व नवोदय माजी विद्यार्थी कल्याण यांच्या सहकार्याने त्यांच्या अत्याधुनिक कॅम्पसमध्ये जागतिक कुटुंब दिनानिमित्त स्तुत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कुटुंबे, मित्र आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सामायिक मूल्ये, आठवणी आणि आयुष्यभराच्या नात्यांचा एक हृदयस्पर्शी उत्सव साजरा केला.




एकूण ६५ कुटुंबे आणि १६० हून अधिक उपस्थितांच्या उत्साही सहभागासह, दिवसभर चाललेल्या या उत्सवात सर्व वयोगटातील लोकांना सहभागी करून घेण्यासाठी डिझाइन केलेल्या मनोरंजक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे एक उत्साही मिश्रण होते. यावेळी उपस्थितांनी टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, संगीत खुर्च्या, जादूचा कार्यक्रम आणि उत्साही फ्लॅश मॉब यासारख्या उत्साही कार्यक्रमांचा आनंद घेतला. कार्यक्रमात विविध स्पर्धांमधील सहभागींच्या प्रयत्नांना आणि प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांमध्ये पुरुषांच्या संगीत खुर्चीत स्वप्नील जंगले, मनोज कांबळे आणि सिद्धांत सोमकुवर, महिला गटात रोली कांबळे आणि शैली शेंडे यांचा सहभाग आहे.

तर, टेबल टेनिसमध्ये संतोष साटिंग, निखिल पारताके आणि झुबेर खान, कॅरममध्ये शशिकांत घुटे, पवन तोहगावकर आणि गोविंदा पाल, तसेच बॅडमिंटनमध्ये कतरिना अँथनी, आयुषी आणि कोमल मुंदडा यांचा समावेश होता. या कार्यक्रमाने जवाहर नवोदय विद्यालयातील (जेएनव्ही) माजी विद्यार्थ्यांना पुन्हा जोडण्याची, त्यांच्या सुरुवातीच्या वर्षांची आठवण करून देण्याची, एकता, विविधता आणि समुदायाला परत देण्याच्या चिरस्थायी मूल्यांचा उत्सव साजरा करण्याची अर्थपूर्ण संधी दिली. प्रगतीशील, मूल्यांवर आधारित शैक्षणिक मॉडेलसाठी ओळखले जाणारे जीआयआयएस नागपूर, या महत्त्वपूर्ण मेळाव्याचे आयोजन करताना अभिमानास्पद आहे. शाळेची जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा, उबदार आदरातिथ्य आणि सामुदायिक सहभागासाठी खोलवर रुजलेली वचनबद्धता यामुळे या कार्यक्रमाला एक विशेष आयाम मिळाला. आम्हाला हा संस्मरणीय उत्सव आयोजित करण्याचा सन्मान मिळाला आहे, असे जीआयआयएस लावा, नागपूरच्या प्राचार्या निधी गुप्ता म्हणाल्या. या कार्यक्रमाने आयुष्यभर शिक्षण, सांस्कृतिक संबंध आणि सहयोगी वाढीवरील आमचा विश्वास सुंदरपणे प्रतिबिंबित केला, असे त्या पुढे म्हणाल्या. आयोजकांनी सहभागी झालेल्या सर्व कुटुंबांचे, सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करणाऱ्या समर्पित स्वयंसेवकांचे आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांच्या दृढ पाठिंब्याबद्दल जीआयआयएस नागपूर व्यवस्थापनाचे मनापासून आभार मानले.

# परदेशात उच्च शिक्षणासाठी मिळणार शिष्यवृत्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने खुल्या प्रवगार्तील गुणवंत मुला- मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुला-मुलींकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतात, अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

त्याबाबतचे निकष उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निश्चित केले आहे. ३१ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून दिनांक ४ ऑक्टोंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरून ३० व पीएचडी करिता १० विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची शाखा निहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ४० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे. २०२५-२६ करिता ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया संचालनालयाच्या या संकेत स्थळावरून सुरू करण्यात आलेली आहे. दिनांक ६ ऑगस्ट २०२४ नुसार या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेली पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी तसेच पीएचडी अभ्यासक्रमासाठी असलेली गुणांची अट ६० टक्के भरून शिथिल करून ५५ टक्के करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अध्यायावत सन २०२५ मधील क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.

या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अहर्ता मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपद्धती इत्यादी माहिती तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर शासन निर्णय उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरण्याची अंतिम तारीख २५ जून २०२५ तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक विभागीय कार्यालयात २७ जून २०२५ सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत सादर करावयाची आहे.

# अवैध चिकन मटन मार्केट हटविले नाही तर आम्ही झोन ऑफिस मध्ये येऊन चिकन विक्री करू : मनसेचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

मनसेच्यावतीने वारंवार निवेदन देऊन विनंती करूनही महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांना सहकार नगर जयप्रकाश नगर येथील नागरिकांच्या भावना कळत नसेल व अवैध चिकन मटन मार्केटच्या लोकांशी लक्ष्मी नगर झोन क्रमांक एक च्या अधिकारी व कर्मचारी यांचे काही लागेबांधे असतील तर आजपासून एक आठवड्याचा अल्टिमेटम देतो, जर अवैध मार्केट हटविले नाही तर या झोन ऑफिस मध्ये येऊन आम्ही चिकन विक्री करू असा निवेदनाद्वारे इशारा मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत गडकरी व शहर उपाध्यक्ष तुषार गिऱ्हे यांच्या नेतृत्वाखाली मनसे शिष्टमंडळाने झोन क्रमांक 1 च्या सहाय्यक आयुक्त यांना दिला.



गेल्या अनेक वर्षांपासून खामला सोनेगाव मार्गावरील जयप्रकाश नगर व सहकार नगर च्या प्रारंभी अवैध चिकन व मटन मार्केट मनपाच्या आशीवार्दाने सुरू आहे, हे मार्केट फुटपाथवर असून या अवैध दुकानां समोर बेवारस कुत्र्यांची फौज उभी असते, त्यामुळे परिसरात दुर्गंधी सोबतच सतत होणारे अपघात, काही वेळा भीषण अपघात होऊन लोकांना अपंगत्व आले, तरीही मनपाच्या लक्ष्मी नगर झोन ने या गंभीर विषयावर दुर्लक्ष केले. मनसेच्या शिष्टमंडळाने पुरावे सादर करून सहाय्यक आयुक्त चौधरी साहेब व निरीक्षक केळझरकर यांना निवेदन व विस्तृत माहिती दिली. त्यासोबतच हे चिकन व मटन विक्रेते कोण आहेत ? कुठल्या भागातील नागरिक आहेत ? याची माहिती मनपाकडे उपलब्ध आहे का ? असा सवालही केला. शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य सरचिटणीस हेमंत गडकरी, नागपूर शहर उपाध्यक्ष तुषार गिऱ्हे यांचे सोबत महिला सेना नागपूर शहर अध्यक्षा रोशनीताई खोब्रागडे, विभागअध्यक्षा प्रिया बोरकुटे, विभाग संघटक चेतन शिराळकर, विभाग उपाध्यक्ष रामोजी खोब्रागडे, अंजिक्य मिश्रा, व्यापारी सेना विभाग संघटक चेतन बोरकुटे प्रामुख्याने उपस्थित होते.

## १.२० लाखांच्या मालावर हातसाफ

**नागपूर :** कळमना ठाण्यांतर्गत चोरांनी घरफोडी करून 1.20 लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी पोलिसांनी राहुल मधुकर बिसेन (42) रा. तुकारामनगर, जुना कामठी रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 7 जून रोजी राहुल घराला कुलूप लावून कुटुंबासह रामटेक येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी मागच्या दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेले. या दागिन्यांची किंमत 1 लाख 20 हजार रुपये आहे. राहुल घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# तीन दिवसीय चित्रपट आणि नाट्य विषयावरील अभिनय कार्यशाळेचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर ललित कला विभाग व छंद मंदिर तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३ दिवसीय अभिनय कार्यशाळेचा समारोप, दि. १२ जून २०२५ रोजी पार पडला. गुरुनानक भवन येथील समारोपय कार्यक्रमात प्र-कुलगुरु डॉ. कोंडावार मार्गदर्शन केले.




कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. सुभाष कोंडावार यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा येथील डॉ. विधू खरे दास, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांची यावेळी उपस्थिती होती.

तीन दिवसाच्या कार्यशाळेत अभिनय कौशल्य प्राप्त केलेल्या सहभागी प्रतिनिधींनी अल्पावधीत प्राप्त केलेल्या कलागुणांचे उत्कृष्टपणे केलेले सादरीकरण यावेळी पहावयास मिळाले असे प्र-कुलगुरू डॉ. कोंडावार पुढे बोलताना म्हणाले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक क्षेत्रात अंगीभूत असलेल्या कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे.

कौशल्य विकास तसेच नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमांची सुरुवात एनसीपी २०२० नुसार करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमधील कलागुणांचा विकास करण्यासाठी तसेच कौशल्य वृद्धीसाठी पीएम उषाअंतर्गत निधी प्राप्त होतो. या अनुषंगाने घेण्यात आलेली अभिनय कार्यशाळा महत्वपूर्ण असल्याचे डॉ. कोंडावार यांनी सांगितले.

आत्मविश्वास वाढवणारी कार्यशाळा - डॉ. दास यांनी व्यक्त केले. कार्यशाळेत अभिनेत्री राधिका देशपांडे डॉ. सदानंद चौधरी, अमन बैस, पियुष धुमकेकर, विजय जथे यांना प्रमाणपत्र देत सन्मानित करण्यात आले. यावेळी सहभागी कलावंतांना प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सह समन्वयक वैदेही चवरे यांनी केले तर आभार विजय जथे यांनी मानले.

# रामदासपेठेतील मोर हिंदी शाळेत क्रीडा सुविधा उपलब्ध होणार

## नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन आयुक्तांनी दिले निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

रामदासपेठ परिसरातील नागपूर महानगरपालिकेच्या बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्या निकेतन (मोर हिंदी शाळा) च्या मैदानामध्ये क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

या शाळेच्या आवारात पुरेशी जागा उपलब्ध असल्याने येथे खेळासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्या, अशी परिसरातील नागरिकांची मागणी होती. यामोठ्या मैदानात मनपातर्फे क्रीडा सुविधा उपलब्ध करण्यात याव्या याकरिता आयुक्तांनी शुक्रवारी (ता.१३) रोजी शाळा परिसराची पाहणी केली.



याप्रसंगी मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, धरमपेठ झोनच्या सहायक आयुक्त श्रीमती स्नेहलता कुंभार, क्रीडा अधिकारी. डॉ. पियुष आंबुलकर, अधीक्षक अभियंता श्री. मनोज सिंग, श्री. नरेश गद्रे, उपशिक्षणाधिकारी संजय दिघोरे, उपअभियंता मोखाडे, विज्ञान केंद्र एच सी एल फाऊंडेशनचे श्री.पियुष वानखेडे, श्री.अजिंक्य कुलकर्णी यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्या निकेतन (मोर हिंदी शाळा) काही वर्षांपासून बंद आहे आणि सध्या या इमारतीमध्ये एचसीएल फाऊंडेशनतर्फे अत्याधुनिक यंग कलाम विज्ञान केंद्र चालविण्यात येत आहे.

तसेच एका इमारती मध्ये धरमपेठ झोन कार्यालय व शिक्षण विभागाचे जुने साहित्य तसेच कोव्हीड काळातील काही साहित्य आणि अतिक्रमण मोहिमेत जप्त करण्यात आलेले साहित्य ठेवण्यात आलेले आहेत. धरमपेठ झोन कार्यालयामार्फत या जुन्या साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी एका कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून, तो पुढच्या आठवड्यात परिसर रिकामा करेल, असे झोनच्या सहायक आयुक्त स्नेहलता कुंभार यांनी सांगितले.

आयुक्तांनी सर्वप्रथम संपूर्ण परिसराची पाहणी केली आणि त्वरित परिसर मोकळा करण्याचे निर्देश दिले.त्यांनी क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांना क्रीडा सुविधा तयार करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देशही दिले. क्रीडा विभागातर्फे या मैदानात स्केटिंग रिंग, बॅडमिंटन आणि पिकेल बॉलची सुविधा प्रस्तावित करण्यात येईल, असे डॉ. पियुष आंबुलकर यांनी सांगितले. तसेच खेळाडूंसाठी उत्तम स्वच्छता गृह उपलब्ध करण्याचे निर्देशही आयुक्तांनी यावेळी दिले.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसंबंधी विशेष बैठकीचे आयोजन

## आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी, सावनेर, दि. १३ :



सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्रातील सर्व नगर परिषद व जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्तेसंबंधी उपाययोजनेसंदर्भात 17 जूनला एका विशेष बैठकीचे आयोजन करावे, या विषयाला अनुसरून आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्याशी 12 जूनला चर्चा करून त्यांना यासंबंधी एक निवेदन दिले.

नगर परिषद व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या हेतूने शिक्षकांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता वाढ, विद्यार्थ्यांचा शारिरिक, बौध्दिक व खेळाडुवृत्ती विकास, मध्यान्ह भोजनाचा दर्जा, प्रत्येक विद्यार्थ्यांना अत्युच्च गणवेश, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकाचे समुपदेशन, सीबीएसई पॅटर्न राबविणे, राष्ट्रीय शिक्षण नितीमुळे होणारे बदल व इतर विषयांकित उद्देशाने आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी हे निवेदन दिले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर, मुख्याधिकारी नगर परिषद, सावनेर/खापा/कळमेश्वर/मोहपा, शिक्षणाधिकारी नगर परिषद सावनेर /खापा/कळमेश्वर/ मोहपा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती सावनेर/कळमेश्वर परिषद, शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सावनेर / कळमेश्वर यांनी या महत्त्वाच्या बैठकीत उपस्थित रहावे, असे या निवेदनात म्हटले आहे.

या बैठकीबाबत तातडीने पावले उचलत जिल्हाधिकाऱ्यांनी यासंबंधी निर्देश दिले आहेत. मंगळवार, दिनांक 17 जून 2025 रोजी दु. 3.00 वा. नगर परिषद, खापा, ता. सावनेर येथे या बैठकीस आवर्जून उपस्थित रहावे, अशा आशयाचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्व संबंधितांना 13 जूनला पाठविण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागाच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत कुठेही मागे राहू नये, यासाठी ही बैठक महत्त्वाची आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या महत्त्वाच्या बैठकीसाठी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी केले आहे.

# कुलरचा करंट लागून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नरखेड, दि. १३ :



नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथे एक दुर्दैवी घटना गुरवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली. घरी कुलरमध्ये पाणी टाकताना करंट लागून मनोज रामभाऊ कपले वय वर्ष ५२ रा जलालखेडा यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

मनोज कपले दररोज आपल्या मित्रांसोबत पहाटे ५ वाजता सोमेश्वर मंदिर किल्ला देवस्थान येथे पूजा करायला जात होते. गुरवारी सुद्धा पहाटे ५ वाजता आपल्या मित्रान सोबत सोमेश्वर मंदिर येथे पूजा करायला गेले तिकडून ते जवळपास ७ च्या सुमारास घरी पोहचले व घरी अंगणात ठेवलेल्या कुलरमध्ये पाणी टाकायला गेले असता त्यांना करंट लागला. त्याचा ओरडण्याचा आवाज आल्या बरोबर घरच्यांनी त्यांच्याकडे धाव घेतली व लगेच कुलरचा प्लग बाहेर काढला असता मनोज कपले खाली पडले लगेच त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली असता त्यांना मृत घोषित केले. त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शव विच्छेदन गृहात ठेवण्यात आला असून पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.

मनोज कपले नरखेड तहसीलमध्ये कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते. अतिशय चांगलं व सदैव इतराना मदत करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या या अशा अचानक जाण्याने गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे.

# कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्या ६ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

## तीन ॲन्ड्राईड मोबाईल, रोख रक्कम सह एकुण ३२,७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १३ :

कन्हान शहरातील पटेल नगर पिपरी येथे विजु शेंडे याचे घरासमोर कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार अड्डयावर कन्हान पोलीसांनी धाड मारुन सहा आरोपींना अटक करुन तीन ॲनड्राईड मोबाईल आणि रोख रक्कमे सह एकुण ३२,७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त माहिती नुसार बुधवार (दि.११) रोजी दुपारी १:३० वाजता च्या दरम्यान पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे, अमोल नागरे, अश्विन गजभिए, जीवन विघे, मोहित झाडे, महिला पोहवा नालंदा पाटील सह आदि पोलीस कर्मचारी अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि, काही इसम मौजा पटेल नगर, पिपरी येथे विजु शेंडे याचे घरासमोर कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे.

अश्यामिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस-ांनी घटनस्थळी पोहचुन पाहणी केली असता काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी मनोज वसंतराव कांबळे (३५), विजु भिकाजी शेंडे (४९), बाळकृष्ण महादेव हावरे (६०), पारस कवडुनाथ नानवटकर (३२) सर्व राहणार कन्हान, अभिषेक मारोती मोहोड (२१ वर्षे) रा.पाटनसावंगी, अनुप पांडुरंग वैदय, (४५) रा.शितलवाडी हे घटनास्थळी मिळुन आले. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून रोख रक्कम, तीन ॲन्ड्रॉईड मोबाईल, दोन कोंबडे, दोन लोखंडी धारदार काती असा एकूण ३२,७८० रुपयांचा मुदेमाल जप्त केला. सदर प्रकरणा बाबत कन्हान पोलीसांनी आरोपी विरुद्ध १२ मजुका अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# आशीनगर झोन अंतर्गत मालमत्ता कर वसुली शिबीर आज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपालिकेच्या आशीनगर झोन अंतर्गत मालमत्ता कर वसुली शिबिराचे आयोजन शनिवार १४ जून रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत नक्ष मेडीकल स्टोर्स धम्मदिप नगर, बिनाकी नागपूर येथे करण्यात आले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या आशीगनर झोन कर व कर आकारणी विभागाच्या वतीने कर दात्यांना त्यांच्या थकित मालमत्ता कर व चालू कर भरण्याची सुलभता उपलब्ध करून देण्यासाठी या शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व कर दात्यांनी शिबीराच लाभ घेत ऑनलाईन पद्धतीने कराचा भरणाकरीत 15 टक्के सूट मिळवा असे आवाहन झोनचे सहाय्यक आयुक्त श्री. हरीश राऊत यांच्यातर्फे करण्यात आले आहे. या वर्षाचा मालमत्ता कर येत्या ३० जूनपर्यंत ऑनलाईन भरल्यास त्यावर करदात्यांना थेट १५ टक्के कर सवलत तात्काळ प्राप्त होणार आहे. महानगरपालिकांच्या कार्यालयांमध्ये जाऊन काऊंटवर कराचा थेट भरणा केल्यास करदात्यांना १० टक्के सवलतीचा फायदा मिळणार आहे.

# शासकीय वस्तीगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**नागपूर** : मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, रामटेक जि. नागपूर येथे सन 2025-26 या सत्राकरिता प्रवर्गनिहाय मोफत प्रवेश देणे सुरू आहे.

शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींना शासनामार्फत मोफत निवास, दुध, फळ, नास्ता, जेवन, बिछाना साहीत्य, पुस्तके व स्टेशनरी साहित्य व गणवेश, ग्रंथालय, संगणक कक्ष, दरमाह निर्वाह भत्ता रू. 500 रुपये व स्वच्छता प्रसाधन 100 रुपये व इतर सवलत प्रदान केल्या जातात. तरी गरजु विद्यार्थीनीना खालील पत्त्यावर येवुन संपर्क साधावा.

# शाळेसमोरील वाहतूक समस्याचे समाधान करून तोडगा काढा

## युवा जागर संघटनेचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

युवा जागर संघटनेचे अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्या मार्गदर्शनात व सौरभ चट्टे सचिव यांच्या नेतृत्वात सर्व सभासदांनी डीसीपी यांना निवेदन दिले. जून महिन्यात जवळपास महाराष्ट्रातील सर्व शाळा सुरू होतात पावसाळ्याच्या या ऋतूमध्ये विद्यार्थी सुट्ट्या संपून शाळेत येतात. नागपुरातील मध्यभागी मध्ये नागपुरात व महाल परिसरात बहुतांश शाळा या सुरू झाल्या कि वाहतुकीची खूप मोठी कोंडी चा सामना करताना नागरिक दिसतात. सामान्य नागरिक शाळेसमोरील वाहतुकीच्या कोंडीने निश्चित त्रासलेला असतो. तितकाच त्या शाळेतील विद्यार्थी व पालक हे देखील त्रासलेले असतात. प्रत्येक शाळेत भेटी दिल्यानंतर वाहतुकीची समस्या हा सगळ्यात मोठ प्रश्न शाळेच्या समोर उपस्थित झालेला दिसला.



महाल परिसरातील टाटा पारसी ही मुलींची शाळा आहे. येथील प्राचार्यांनी आपल्या वेदना मांडताना सांगितले की,आम्ही निरंतर वाहतूक पोलीस निरीक्षकाला निवेदन दिली आहेत तरी देखील समस्या जैसे थे आहे. शाळा सुरू होण्याची वेळ व शाळा संपल्यानंतर आमच्या शाळेतील ६०% कर्मचारी वाहतुकीच्या समस्या सोडवण्याकरता रस्त्यावर उभा असतो. पोलिसांची एकही गाडी इकडे न फिरल्याने पालक व सामान्य नागरिक यात वाद होताना नेहमी दिसतात. या समस्यांचे समाधान पोलिसांच्या वाहतुकीची गाडी राजेंद्र हायस्कूल सिपी ॲन्ड बेरार डी डी नगर बेझांनी महाविद्यालय व्ही एम व्ही कॉलेज व इतर शाळेसमोर फिरल्याने होऊ शकते. लोक जरी शिस्तीचे पालन नाही करत पण त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हायला लागली की ते नियमाचे पालन करतील. अशी अपेक्षा सगळ्याच शाळेच्या प्राचार्यांनी मांडली. प्रशासनाने यावर लक्ष केंद्रित करून शाळा सुरू झाल्यानंतर जवळपास एक महिना दंडात्मक कारवाईची कारवाई जर केली तर नक्कीच समस्याच्या समाधान होईल ही मागणी आज युवा जागर संघटनेने केली आहे. याप्रसंगी वैभव मेश्राम,जितेंद्र मांडवकर, लकी लांजेवार, विनोद धामणकर, मोनिका कुंभारे, मीनाक्षी गुरव,सिमरन मस्कर, निवेदन देताना उपस्थित होते.

# कांदाचाळ व लसून साठवणूक गृह योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

राज्यात कांदा पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवून ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्यगुणवत्ता राखली जाऊन शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत 2025-26 या आर्थिक वर्षामध्ये कमी खचार्ची कांदाचाळ व लसून साठवणूक गृह या घटकाचे मापदंड सुधारित करण्यात आले असून 5 ते 25 मेट्रीक टन 25ते 500 मेट्रीक टन व 500 ते 1000 मेट्रीक टन क्षमतेच्या कांदा चाळी व लसून साठवणूक गृह उभारणीसाठी अनुदान अनुज्ञेय आहे. कमी खर्चाचे कांदाचाळ व लसून साठवणूक गृहासाठी खर्च मर्यादा 7 हजार प्रति मेट्रीक टन असून सर्वसाधारण व अनुसूचित क्षेत्राकरीता 5 ते 1 हजार मेट्रीक टनक्षमतेसाठी ग्राह्य भांडवली खर्चाच्या 50 टक्के देण्यात येईल.

# मनपाकडे जीर्ण इमारतींची माहितीच नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :





महापालिकेकडून आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येतो. त्यामध्ये धोकादायक इमारती, नदीच्या काठावरील धोकादायक वस्त्या, पावसाळ्यात पाणी साठून धोकादायक परिस्थिती निर्माण झालेल्या वस्त्या आदींची माहिती संकलित करून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित पुस्तिका प्रकाशित केली जाते. त्यासाठी आवश्यक असलेली धोकादायक इमारतींची माहिती महापालिकेकडे झोनकडून उपलब्ध झाली नसल्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या पुस्तिकेची प्रिंटिंग व त्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना संदभार्तील नियोजन रखडले आहे.

शहरात जवळपास 200 च्या वर धोकादायक इमारती असल्याची माहिती आहे. दरवर्षी पावसाळ्यात जीर्ण झालेल्या धोकादायक इमारती कोसळण्याच्या घटना घडतात. गेल्या वर्षी तेलीपुरा बुरड गल्लीतील जीर्ण इमारतीचा भाग कोसळला होता.

सुदैवाने या घटनेत कोणतीही प्राणहानी झाली नाही. विशेष म्हणजे सर्वात जास्त जीर्ण इमारती गांधीबाग झोनमध्ये आहेत. विभागाकडून धोकादायक इमारतींना नोटीस बजावण्यात येते. इमारतींची दुरुस्ती अथवा इमारती धोकादायक स्थितीत असल्यास इमारत तोडण्याचा निर्णय घेतला जातो मात्र त्यासाठी मनपाकडे जीर्ण झालेल्या इमारतींची माहिती असणे आवश्यक असते. मे महिन्यातच अग्निशमन विभागाने सर्व झोनला पत्र पाठवून जीर्ण इमारतींची माहिती मागितली होती. मात्र धरमपेठ, नेहरूनगर व सतरंजीपुरा झोनकडूनच माहिती पुरविण्यात आली. जून महिन्यातील विभागाने झोनला पत्रव्यवहार केला पण माहिती मिळालेली नाही.

# वीज मीटर अडवाल तर ...

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :



महावितरणतर्फे सध्या राज्यात सर्वत्र आधुनिक टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. महावितरणच्या नव्या वीजदर प्रस्तावात ग्राहकाने वीज कधी वापरली त्या वेळेनुसार दरात सवलत देण्यात येणार आहे. टीओडी मीटर असल्याशिवाय ही सवलत मिळू शकणार नाही.

राज्यातील ग्राहकांची मागणी ध्यानात घेऊन मुख्यमंत्र्यांनी प्रीपेड मीटर बसवू नयेत असे जाहीर केले. सध्या पोस्टपेड मीटर बसविण्यात येत आहेत.

त्यामुळे पहिल्यासारखेच विजेचा वापर केल्यावर बिल येणार आहे. आधुनिक मीटर असल्यामुळे अचूक रिडिंग आणि सातत्याने मोबाईलवर विजेचा वापर समजण्यासारख्या नव्या सुविधा मिळतील. मुख्य म्हणजे महावितरणकडून ग्राहकांकडे हा मीटर मोफत बसविण्यात येत आहे.

इतके सगळे असूनही काहीजण नवे मीटर बसविण्यास विरोध करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ग्राहकाची लेखी परवानगी घेतल्यानंतरच मीटर बसवावेत. हा मुद्दा कायदेशीरदृष्ट्या चुकीचा आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग या विद्युत क्षेत्रावर देखरेख करणाऱ्या स्वतंत्र संस्थेने २०२१ साली नियम जाहीर केले.

त्यातील मुद्दा २.२ च्या नुसार, वीज ग्राहकाच्या घरात किंवा कार्यालयात मीटरनंतर फ्यूजपासून त्याची मालमत्ता असते तर पॉईंट ऑफ सप्लाय अर्थात फ्यूजपर्यंत महावितरणची यंत्रणा असते. त्यामध्ये महावितरणने बसविलेला मीटरही समाविष्ट आहे.

तसेच द इलेक्ट्रिसिटी ॲक्ट २००३ च्या कलम ५५ नुसार वीज पुरवठा करताना त्याचे अचूक मोजमाप करण्यासाठी वीज वितरण कंपनीने मीटर बसविणे बंधनकारक आहे. अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानावर आधारित मीटर बसवून महावितरण कायदेशीर कर्तव्य पार पाडत आहे.

जरी खासगी जागेवर बसविला असला तरी मीटर ही महावितरणची मालमत्ता आहे आणि महावितरण स्वतःच्या मर्जीने तो कधीही बदलू शकते. त्यासाठी ग्राहकाच्या परवानगीची गरज नाही. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे की, विजेचा मीटर ही महावितरणची मालमत्ता असल्याने मीटर बदलण्यास विरोध केला तर तो सरकारी कामातील अडथळा ठरेल. मीटरची नासधूस केली तर ती सरकारी मालमत्तेची नासधूस ठरेल. हे दोन्ही गुन्हे दखलपात्र आहेत आणि त्यासाठी अटक व तुरुंगवास होऊ शकतो.

वीज मीटर बसविण्यासाठी ग्राहकाची परवानगी घेतली नाही, असे सांगून जे राजकारणी ग्राहकांना भडकावत आहेत, त्यांच्यापासून ग्राहकांनी सावध रहावे, त्यांच्यामुळे तुम्हाला तुरुंगवास होऊ शकतो.

# कारस्वार तरुणांजवळ मिळाली तलवार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

कळमना पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर एक कारची झडती घेतली असता तलवार मिळाली. कारमध्ये तीन तरुण बसलेले होते. पोलिसांनी तलवार आणि कार असा 8 लाखांचा मुदेमाल जप्त करून तिन्ही तरुणांना अटक केली. शहबाज इसाक पठाण (20), अल्फाज खान गनी खान (19) आणि समशेर शेख सत्तार शेख (29) तिन्ही रा. आदिवासी प्रकाशनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

बुधवारी सायंकाळी कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत चिखली परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान एनआयटी क्वॉर्टरजवळ एक सोनेरी रंगाची कार उभी असून त्यात बसलेल्या तरुणांजवळ तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिस परिसरात पोहोचले असता एमएच-31/सीपी-8020 क्रमांकाची कार संशयास्पद स्थितीत उभी दिसली. पोलिसांनी कारला घेराव टाकत तिन्ही तरुणांना बाहेर निघण्यास सांगितले. पोलिसांनी तलवार आणि कार जप्त करून तिन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# आईच्या डोळ्यांसमोर धावत्या ट्रेनमधून पडला चिमुकला

# आरपीएफच्या तत्परतेने मिळाले जीवनदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :



रेल्वे प्रवासात एक क्षणाचा निष्काळजीपणा किती महागात पडू शकतो, याचा प्रत्यय सोमवारी सायंकाळी आला. कुर्ला-शालीमार एक्स्प्रेसमधून (गाडी क्र. 18029) प्रवास करणाऱ्या एका आईसमोर तिचा चार वर्षांचा चिमुकला सागनिक बेरा अचानक धावत्या गाडीतून खाली पडला. ही घटना डोंगरगड-जटकन्हार रेल्वेमार्गावर घडली. एका आईच्या आक्रोशाने गाडी थांबली आणि सुरू झाला जीवन वाचवण्याचा शर्थीचा प्रयत्न.

आई आनंदिता बेरा ह्या आपल्या लहानग्याबरोबर खडकपूरच्या दिशेने जात होत्या. त्या वरच्या बर्थवर चढत असताना सागनिक अचानक आपत्कालीन खिडकीतून खाली पडला. रडत-ओरडत असलेल्या आईचा आवाज ऐकून प्रवाशांनी त्वरित चेन पुलिंग करून गाडी थांबवली.

या संपूर्ण घटनेवर रेल्वे सुरक्षा बल नागपूर मंडळाचे सतर्क कर्मचारी लक्ष ठेवून होते. प्रधान आरक्षक टी.एन.एस. चौहान आणि महिला आरक्षी ज्योती बाला यांनी तत्काळ कृती करत बाळाला आणि त्याच्या आईला डोंगरगड येथील रुग्णालयात दाखल केले. पुढे सहायक उपनिरीक्षक अर्जुन सिंह आणि प्रधान आरक्षक एस. के. मिश्रा यांनी मुलाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला राजनांदगाव व नंतर रायपूरच्या डी.के.एस. रुग्णालयात हलवले.

या मोहिमेचे मार्गदर्शन मंडल सुरक्षा आयुक्त दीपचंद आर्य यांनी स्वतः केले. सतत संपर्कात राहून त्यांनी प्रशासन, वैद्यकीय यंत्रणा आणि स्थानिक आरपीएफ पथकांमध्ये समन्वय साधला. डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे सागनिकच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून आता त्याला इमर्जन्सी वॉर्डमधून सामान्य वॉर्डमध्ये हलवले आहे.

मुलाचे सर्व सामान, आवश्यक औषधे, अन्न, आणि अन्य साहित्य देखील रेल्वे सुरक्षा बलाने आईपर्यंत सुरक्षित पोहोचवले. एका आईच्या डोळ्यांतील अश्रूंना आधार देत, आरपीएफच्या तत्परतेने एका निष्पाप जीवाचे प्राण वाचवले. "हा केवळ एक अपघात नव्हता, ही एका आईसाठी होणारी जगण्याची लढाई होती - आणि ती लढाई रेल्वे सुरक्षा बलाने जिंकली."

रेल्वे सुरक्षा बल नागपूर मंडल सर्व नागरिकांना आवाहन करत आहे की, धावत्या गाडीतून चढण्या-उतरण्याचे प्रकार टाळावेत, आणि मुलांना खिडक्यांपासून दूर ठेवावे. ही घटना केवळ शहाणपण शिकवणारी नाही, तर 'रेल्वे सुरक्षा बल' ही केवळ एक सुरक्षा संस्था नसून - ती आपत्कालीन काळात तुमचं कुटुंब बनते, हे अधोरेखित करणारी आहे.

**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**९४२२१२५६५६**